


# कृषीवल

रायगड, गुरुवार, दि. १९ फेब्रुवारी २०२६

किंमत ४ ₹

## बनावट विदेशी मद्यावर कारवाई

**पनवेल :** राज्य उत्पादन शुल्क विभागाने पनवेल येथील जुना मुंबई-पुणे महामार्गावरील पोयंजे गावानजिक सापळा रचुन एका चारचाकी वाहनाची तपासणी केली. यावेळी या वाहनात वेगवेगळ्या ब्रँडच्या उच्च प्रतीच्या बनावट विदेशी मद्याच्या १२ बाटल्या, २ मोबाईल व एक चारचाकी वाहन असा एकूण ५ लाख ६० हजार ३९० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. तसेच, अधिक तपास केला असता खालापूर-तुपगाव येथील एका शेतातील घरामध्ये छापा टाकण्यात आला. त्या ठिकाणी वेगवेगळ्या उच्च प्रतीच्या बनावट विदेशी मद्याच्या ५० बाटल्या, विदेशी मद्याच्या •➤ पान २ वर

## तीन वर्षाच्या अबोलीची शिवगर्जना

**। चौल । प्रतिनिधी ।**

अवघ्या तीन वर्षांची चिमुरडी अबोली किशोर कडव हिने १९ फेब्रुवारी रोजी साजऱ्या होणाऱ्या शिवजयंतीच्या पार्श्वभूमीवर महाराजांची 'शिवगर्जना' सादर केली. ही शिवगर्जना ऐकून उपस्थित सर्वजण अक्षरशः भारावून गेले. नावात 'अबोली' असली तरी तिच्या बोलण्यात मात्र कमालीचा आत्मविश्वास आणि धाडस दिसून येते. विशेष म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्याविषयी ती इतक्या ओघवत्या शब्दांत आणि भरभरून बोलते की ऐकणाऱ्यांच्या अंगावर शहारे येतात.



### बोबड्या बोलानी वेधले सर्वांचे लक्ष

> "इतक्या लहान वयात तिला छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल एवढे प्रेम आणि आकर्षण आहे, याचा आम्हाला मनापासून अभिमान आहे. आम्ही फक्त तिला योग्य संस्कार देण्याचा प्रयत्न करतोय; तिची ही जिद्द आणि आत्मविश्वास पाहून आनंद होतो."
> – किशोर कडव, अबोलीचे वडील

> "अबोलीला लहानपणापासूनच छत्रपती शिवाजी महाराजांच्या गोष्टी ऐकायला खूप आवडतात. ती स्वतःहून शिवगर्जना म्हणते, हे पाहून खूप आनंद होतो. तिच्या बोबड्या बोलांतून व्यक्त होणारे हे शिवप्रेम आमच्यासाठी अभिमानाचा क्षण आहे."
> – स्नेहल कडव, अबोलीची आई

तीन वर्षांच्या या गोजिऱ्या मुलीचे बोबडे बोल आणि त्यातील जोश सर्वांना चकित करून गेले. इतक्या लहान वयात इतिहासाची जाण, शब्दांची स्पष्टता आणि भावपूर्ण सादरीकरण यामुळे अबोलीने सर्वांची मने जिंकली. 'बाळाचे पाय पाळण्यात दिसतात', ही म्हण तिच्या बाबतीत अगदी खरी ठरते. तिच्या सादरीकरणातून तिच्या उज्ज्वल भवितव्याची झलक स्पष्टपणे दिसून येते.

अबोलीची आई पनवेल येथील नामांकित शाळेत शिक्षिका असून वडील एका कंपनीत नोकरीला आहेत. घरातून मिळालेल्या संस्कारांची आणि सातत्याने मिळालेल्या प्रोत्साहनाची हीच फलश्रुती तिच्या सादरीकरणातून जाणवते. लहान वयातच संस्कृती, इतिहास आणि शौर्यपरंपरेची ओळख करून देण्याचे कार्य तिच्या कुटुंबीयांनी प्रेमाने केले आहे. शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त अबोलीने व्यक्त केलेले हे प्रेम आणि अभिवादन सर्वांसाठी प्रेरणादायी ठरले आहे. आधुनिक युगातही आपल्या परंपरेचा अभिमान बाळगणारी आणि ती ठामपणे व्यक्त करणारी नवी पिढी •➤ पान २ वर

## वेधक

### डंपरच्या अपघातात क्लिनरचा मृत्यू

**नागोठणे :** वाकण-पाली रस्त्यावरील वजरोली गावाजवळ भरधावा डंपरचा भीषण अपघात झाल्याची घटना घडली आहे. या अपघातात एकाचा मृत्यू झाला असून दोघेजण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.हा अपघात हा मंगळवारी (दि.१७) मध्यरात्री दीड वाजण्याच्या सुमारास घडला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, डंपरचालक सविनय •➤ पान २ वर

### डस्टबिन टाकण्यावरून चाकूने वार

**नवीन पनवेल :** केतन गोंधळी याचे १६ फेब्रुवारी रोजी ॲमेझॉन कॉल्ड स्टार किरवली गोडाऊन मधील एका मुलासोबत डस्टबिन टाकण्यावरून वाद झाला. यावेळी या गोडाऊन मधील शोएब फय्याज शेख (२२) आणि इतर तीन साथीदारांनी ऋषिकेश वावेकर, केतन गोंधळी आणि राहुल माळी यांना शिवीगाळ करत मारहाण केली. तसेच, त्यातील एकाने ऋषिकेश वावेकरच्या डोक्यावर चाकूने वार केले. त्यात तो गंभीर जखमी झाला. या प्रकरणी तिघांवर तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### आंबेवाडी बाजारपेठेत ट्रेलरला आग

**कोलाड :** मुंबई-गोवा महामार्गावरून पोस्को कंपनीकडे कॉईल घेऊन जाणाऱ्या ट्रेलरने मंगळवारी (दि.१७) सकाळच्या सुमारास आंबेवाडी बाजारपेठेत अचानकपणे पेट घेतला. ही आग ट्रेलरच्या केबिनमध्ये लागली. वाहन चालकाच्या लक्षात येताच त्याने प्रसंगावधान दाखवत या आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी येथील चहाच्या स्टॉल मधून पाणी आणुन ही आग विझाविण्यासाठी प्रयत्न केले. काही प्रयत्नांत ही आग आटोक्यात आणली. त्यामुळे मोठा अनर्थ टळला.

## छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त
# जिल्ह्यात 89 मिरवणुका

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**


छत्रपती शिवाजी महाराज यांची आज (दि.१९) जयंती असून जिल्ह्यामध्ये २३८ ठिकाणी जयंती साजरी केली जाणार आहे. या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यात मिरवणुका व ऐतिहासिक सांस्कृतिक कार्यक्रमांचा जल्लोष असणार आहे. या कार्यक्रमांच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार नागरिकांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न वेगवेगळ्या संस्था, संघटनांच्या माध्यमातून होणार आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या पराक्रमाने मराठा साम्राज्याचा भक्कम पाया रचला. त्यांच्या विचारांना प्रेरित होऊन जिल्ह्यामध्ये जयंती उत्सव ठिकठिकाणी साजरी केली जाते. दरवर्षी जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम घेतले जातात. छत्रपती शिवाजी महाराज यांची आज जयंती आहे. महाराजांचे विचार घराघरात पोहचविण्याबरोबरच त्यांच्या विचारांचा वारसा जपण्याचा प्रयत्न सामाजिक व सांस्कृतिकांच्या माध्यमातून केला जाणार आहे. रायगड जिल्ह्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांची २३८ ठिकाणी जयंती साजरी केली जाणार आहे. अलिबागसह काही ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास व काही ठिकाणी प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन केले जाणार आहे. हा सोहळा जल्लोषात साजरा करण्यासाठी शिवप्रेमी सज्ज झाले आहेत. मावळा प्रतिष्ठानसह वेगवेगळ्या संस्था, संघटना व शिवप्रेमींच्यावतीने जिल्ह्यामध्ये ठिकठिकाणी मिरवणुका, बाईक रॅली व अन्य रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. आज जिल्ह्यामध्ये ८९ ठिकाणी रॅली आणि मिरवणुका निघणार आहेत.

अलिबागमध्ये गाज फाऊंडेशन आणि मनस्वीनी चॅरिटेबल ट्रस्टच्यावतीने 'प्रताप गड' हा आगळा वेगळा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. जिल्ह्यामध्ये अन्य ठिकाणीदेखील सांस्कृतिक कार्यक्रम साजरे केले जाणार आहेत. एकूण १३ ठिकाणी •➤ पान २ वर

### अलिबागमध्ये शिवजन्मोत्सव

आज छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त अलिबागमध्ये मावळा प्रतिष्ठान आयोजित शिवजन्मोत्सव सोहळा साजरा होणार आहे. यानिमित्त विविध कार्यक्रम होणार आहे. यावेळी शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांच्यासह मावळा प्रतिष्ठानचे मार्गदर्शक तथा अलिबागचे वीज व सार्वजनिक बांधकाम समितीचे सभापती प्रशांत नाईक, रघुजी राजे आंग्रे व अलिबागच्या उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे आदी मान्यवर उपस्थित असणार आहेत. अलिबाग शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे १८ फेब्रुवारी रोजी मध्यरात्री १२.०० वाजता गारद होणार असून १९ फेब्रुवारी रोजी सकाळी ६.०० वाजता, चरणस्नान, दुपारी ३.०० वाजता शहरातील ब्राह्मणआळी येथील श्रीराम मंदिर येथे मावळे फेटे बांधणी, त्यानंतर सायंकाळी ४.०० वाजता मिरवणूक काढण्यात येणार आहे. सायंकाळी ७.३० ते ८ या वेळेत •➤ पान २ वर



## रायगड पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या

### प्रशासकीय कारणास्तव अकरा जणांना केले कार्यमुक्त

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

पोलीस दलातील वेगवेगळ्या विभागात व पोलीस ठाण्यात कार्यरत असणाऱ्या पोलीस निरीक्षकांसह सहाय्यक पोलीस निरीक्षक असे एकूण ११ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी मंगळवारी (दि.१७) हा आदेश काढला आहे. त्यात ३ महिला पोलीस अधिकारी यांचा समावेश असून प्रशासकीय कारणास्तव या बदल्या झाल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

रायगड पोलीस दलातील कोलाडपासून दिघीसागरी व अलिबाग अशा विविध पोलीस ठाण्यात तसेच भरोसा सेल, जिल्हा वाहतूक शाखा नियंत्रण कक्ष अशा अनेक विभागात कार्यरत असणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्याचे आदेश काढण्यात आले आहेत. जिल्हा स्तरावरील पोलीस



आस्थापना मंडळाच्या मान्यतेनुसार, एकाच पोलीस ठाण्यामध्ये २ वर्षांचा कालावधी पुर्ण झाल्याने प्रशासकीय कारणास्तव पोलीस अधिकारी यांच्या बदल्या करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. या बदलीमध्ये ८ सहाय्यक पोलीस निरीक्षक व ३ पोलीस निरीक्षक यांचा समावेश असून त्यामध्ये ३ महिला पोलीस अधिकारी आहेत.

कोलाड पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन मोहिते यांची खोपोली पोलीस ठाण्यात बदली करण्यात आली आहे. दिघी सागरी पोलीस ठाण्यातील सहाय्यक •➤ पान २ वर

## बहुचर्चित ई-स्पीड बोट निराशेच्या गर्तेत

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

मागील वर्षभरापासून आश्वासनांच्याच मुहूर्ताच्या हिंदोळ्यावर हेलकावे खाणारी जेएनपीएची बहुचर्चित ई-स्पीड बोट सेवा अद्यापही सुरूच झालेली नाही. त्यामुळे निराशेच्या गर्तेत सापडलेल्या आणि टिकेचे धनी ठरलेल्या जेएनपीएने माझगाव डॉक बिल्डर्स लिमिटेड कंपनीला बोटी पुरवठा व हाताळणीच्या कामाचे कंत्राट आणि ३७ कोटी ८९ लाख ९४ हजार १९० रुपये खर्चाची तरतूदही रद्द करण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत, अशी माहिती जेएनपीए अधिकाऱ्यांकडून देण्यात आली.

उरण-नेरुळ रेल्वेमुळे जेएनपीए-मुंबई सागरी मार्गावरील प्रवासी संख्या मोठ्या प्रमाणावर घसरली आहे. त्यामुळे जेएनपीएला



- **माझगाव डॉक शिप बिल्डर्सचे अपयश**
- **जेएनपीएकडून कंत्राट रद्द करण्याच्या हालचाली**


जेएनपीए-मुंबई या सागरी प्रवासी मार्गावरील लाकडी प्रवासी बोट सेवेचा खर्च परवडेनासा झाला. तसेच, प्रवासी वाहतूकसाठी वापरण्यात येणाऱ्या जुनाट लाकडी बोटीही खार्चिक व सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातूनही उपयुक्त नसल्याने जेएनपीएचे माजी अध्यक्ष उन्मेष वाघ यांनी तासाचा •➤ पान २ वर

## ३०९ कंटेनरमधील सुकामेवा जप्त

**। उरण । प्रतिनिधी ।**

जेएनपीए न्हावा शेवा बंदरात केंद्रीय डीआरआय आणि मुंबई सीमा शुल्क विभागाने संयुक्त कारवाई करत इराणमधून आलेल्या ३०९ कंटेनरमधील सुकामेवा जप्त केला आहे. या आयातीतून सुमारे ५० कोटी रुपयांचे सीमाशुल्क बुडविण्याचा प्रयत्न झाल्याचा पर्दाफाश झाला असून याप्रकरणी एका आरोपीला अटक करण्यात आली आहे.

कोमोरोस देशाचा ध्वज असलेले 'वीव रियफा' हे मालवाहू जहाज इराणच्या बंदर अब्बास येथून ३०९ कंटेनर घेऊन जेएनपीए बंदरात दाखल झाले होते. गुप्त माहितीच्या आधारे डीआरआयने जहाजाला दोन आठवडे •➤ पान २ वर






कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। RGD/016/2026-2028



# वन विभागाच्या जमिनीवर अतिक्रमण

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरान शहरातील मध्यवर्ती भागातील बाजारपेठ परिसरात वन विभागाचा मोकळा भूखंड आहे. त्या मोकळ्या जमिनीवर मोठ्या प्रमाणात केर कचरा टाकण्यात येतो. तसेच, तेथे असलेल्या बोहरी समाज हॉलमध्ये सुरू असलेले अनधिकृत बांधकाम त्वरित थांबवण्यात यावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्या रेखा बेलोसे यांनी केली आहे. या पार्श्वभूमीवर माथेरान पालिकेचे अधिकारी आणि वन विभागाचे कर्मचारी यांनी संबंधित वन जमिनीवरील अतिक्रमण यांची पाहणी केली.



माथेरान शहराच्या मध्यवर्ती भागात रेल्वे स्थानकाच्या समोर बोहरी समाज हॉल आहे. या दुमजली हॉलमध्ये नवीन कामे सुरू असून माथेरानमध्ये कोणत्याही नवीन कामांना परवानगी नाही. असे असतानाही नवीन कामे सुरू असून त्या हॉलच्या मागील बाजूस वन विभागाचा राखीव भूखंड आहे.त्या भूखंडावर सध्या एका कोपऱ्यात स्वच्छता गृहाची पेटी पडलेल्या अवस्थेत आहे. त्या ठिकाणी अन्य कोणत्याही प्रकारचे बांधकाम अथवा अतिक्रमण नाही.

मात्र, बोहरी समाज हॉलचे वाढीव आणि अनधिकृत बांधकाम करण्यासाठी वापरले जाणारे आणि खराब साहित्य हे वन विभागाच्या जागेत अस्ताव्यस्त टाकण्यात आले आहे. त्यासाठी वन विभागाची कोणत्याही प्रकारची परवानगी घेतलेली नाही. तसेच, हॉलची कामे रात्री उशिरापर्यंत सुरू राहत असून परिसरातील शांतता भंग करण्याचे कार्य सुरू असल्याचे स्थानिकांमधून बोलले जात आहे.

यावेळी रेखा बेलोसे यांनी प्रतिक्रिया देताना, माथेरान हे इको सेन्सिटिव्ह झोन असताना रात्रीच्या वेळी कर्कश आवाजात बांधकाम केले जात असल्याने पशु-पक्षी यांचे काय झाले असेल, असा सवाल उपस्थित केला. त्यामुळे येथील बांधकाम त्वरित बंद करून संबंधितांनी कायदा मोडला असेल तर त्यांच्यावर कारवाई व्हायलाच हवी, अशी मागणी केली. त्यानंतर बुधवारी (दि.१८) सकाळी माथेरान पालिकेच्या पथकाने नगर अभियंता यांच्यासोबत पालिकेचे विरोधी पक्षनेते आणि अन्य नगरसेवक यांच्या बरोबर वन भूखंड येथे जाऊन पाहणी केली. त्यावेळी अभियंता करुणा बांगर यांनी बोहरी समाज हॉल परिसरात सुरू असलेल्या बांधकामाची पाहणी करीत आपला अहवाल तत्काळ मुख्याधिकारी यांना सादर केला जाईल, असे आश्वासन विरोधीपक्षनेते सीताराम कुंभार यांना दिले.

# म्हसळ्यातील गतिमान विकासकामांना ब्रेक

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

म्हसळा तालुका शहराच्या सर्वांगीण विकासासाठी खा. सुनिल तटकरे आणि मंत्री आदिती तटकरे यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध झाला आहे. या निधीच्या जोरावर शहराच्या विकासकामांना वेग प्राप्त झाला होता. त्यामुळे नागरिकांमध्ये विकासाबाबत सकारात्मक अपेक्षा निर्माण झाल्या होत्या. त्यातील प्रमुख प्रकल्पांमध्ये हिंगुलकरणी देवी पर्यटन स्थळ विकास, छत्रपती शिवाजी महाराज स्मारक उभारणी, म्हसळा नगर पंचायत व पोलीस ठाण्याची नवीन शासकीय इमारत, तसेच पाणी पुरवठा योजना आणि डंपिंग ग्राउंड उभारणी या महत्त्वाच्या कामांचा समावेश आहे. या सर्व कामांचे भूमिपूजन पार पडून प्रत्यक्ष कामांना सुरुवातही झाली होती. प्रामुख्याने विकास कामांमध्ये पाणी पुरवठा योजना आणि डंपिंग ग्राउंडचे काम प्रगतीपथात आहे. नव्याने काही विकास कामे सुरू झाल्यानंतर नगर पंचायत स्तरावर अचानक निर्माण झालेल्या राजकीय स्थित्यंतरामुळे विकास प्रक्रियेला धक्का बसल्याचे चित्र दिसत आहे. काही प्रकल्पांबाबत स्थानिक नागरिकांकडून आक्षेप व अडथळे निर्माण झाल्याची चर्चा देखील सुरू आहे. परिणामी, कामांचा वेग मंदावल्याचे निदर्शनास येत आहे.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे शिरसे, ता.कर्जत, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे मालक दिलीप आत्माराम कांबळे यांचेकडून मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.पॉ | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| १८ | ५ | ०-१२-१० | २-१९ |

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसांचे आत खालील सही करणार अॅडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- १९/०२/२०२६

**अॅड. समीर आर. सावंत**
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता-गाळा नं.०९,कोर्ट व्हयू बिल्डींग,
तळ मजला, दिवाणी व फौजदारी
न्यायालयासमोर, कर्जत,
ता.कर्जत,जि. रायगड
मो.नं ९१५८३१३७३३

# अंगणवाडी सेविका-मदतनिसांचा भव्य मोर्चा

**। रायगड । प्रतिनिधी ।**

राज्यातील अंगणवाडी सेविका व मदतनिसांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी कृति समितीच्यावतीने मंगळवारी (दि.२४) रोजी सकाळी साडेदहा वाजल्यापासून आझाद मैदान येथे भव्य मोर्चा आणि तीव्र निदर्शने आयोजित करण्यात आली आहेत. राज्यभरातील सुमारे २ लाखांहून अधिक अंगणवाडी कर्मचारी या आंदोलनात सहभागी होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

कृति समितीने मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तसेच महिला व बालविकास विभागाच्या मंत्र्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या न्याय्य मागण्यांकडे वारंवार लक्ष वेधूनही समाधानकारक निर्णय झालेला नाही. त्यामुळे अखेर राज्यव्यापी आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागत आहे. मोर्चापूर्वी शासनाने चर्चा करून मागण्या मान्य कराव्यात, अशी विनंतीही करण्यात आली आहे. राज्य शासनाने ऑक्टोबर २०२४ पासून अंगणवाडी सेविकांच्या मानधनात ३ हजार रुपये आणि मदतनिसांच्या मानधनात २ हजार रुपयांची वाढ जाहीर केली होती. तसेच, कामावर आधारित प्रोत्साहन भत्ता देण्याची घोषणाही करण्यात आली होती. मात्र, अनेक ठिकाणी हा भत्ता नियमित मिळत नसल्याची तक्रार कर्मचाऱ्यांनी केली आहे. प्रोत्साहन भत्ता नियमित मानधनात समाविष्ट करून सेविकांना दरमहा १५ हजार रुपये आणि मदतनिसांना ८ हजार ५०० रुपये मानधन देण्याची मागणी करण्यात आली आहे.

सर्वोच्च न्यायालयाने २५ एप्रिल २०२२ रोजी अंगणवाडी कर्मचाऱ्यांना ग्रॅच्युइटीचा हक्क असल्याचा निर्णय दिला असतानाही राज्यात त्याची अंमलबजावणी झालेली नाही. ग्रॅच्युइटी आणि सेवासमाप्ती लाभ स्वतंत्रपणे देण्यात यावेत, अशी समितीची भूमिका आहे. तसेच, सेवानिवृत्तीनंतर दरमहा पेन्शन योजना लागू करण्याची मागणी अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. तसेच, अंगणवाडी केंद्रांना देण्यात आलेले मोबाईल फोन व ॲप्स योग्यरीत्या कार्यरत नसल्याने कामात अडथळे येत असल्याची तक्रार आहे. सुसंगत उपकरणे उपलब्ध करून देण्यासह डेटा रिचार्जसाठी दरमहा निधी द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच, विविध योजनांची अतिरिक्त पडताळणी व इतर खातेबाह्य कामे अंगणवाडी सेविकांकडून करून घेतली जात असल्याबद्दल नाराजी व्यक्त करण्यात आली आहे.

# कर्जतची डिजिटल शेतीकडे वाटचाल

## ‘एआय’ तंत्रज्ञानाचा वापर

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

शेतीमधील शेतकऱ्यांच्या अडचणी दूर व्हाव्यात, यासाठी ‘एआय’ तंत्रज्ञानाचा वापर सुरू झाला आहे.कर्जत तालुक्यात महाविस्तार अभियानामध्ये एआयकडून शेतकऱ्यांना मदत मिळू लागली आहे. त्यामुळे शेतकरी देखील डिजिटल शेतीकडे वळल्याचे आशादायक चित्र पाहायला मिळत आहे.

कर्जत तालुका कृषी क्षेत्रात नेहमीच प्रगत मानला जातो. पारंपरिक शेतीसोबत आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारण्याची तयारी येथील शेतकरी वर्गाने वेळोवेळी दाखवून दिली आहे. या पार्श्वभूमीवर राबविण्यात येत असलेले महाविस्तार एआय अभियान हे डिजिटल परिवर्तनाच्या दिशेने टाकलेले ठोस आणि परिणामकारक पाऊल ठरत आहे. माहिती तंत्रज्ञानाचा वेगाने होणारा विस्तार आणि स्मार्टफोनचा वाढता वापर लक्षात घेता कृषी क्षेत्रात डिजिटल साधनांचा वापर अपरिहार्य बनला आहे. पूर्वी शेतीविषयक माहिती मिळविण्यासाठी शेतकऱ्यांना कृषी कार्यालय, बाजार समिती किंवा तज्ज्ञांच्या भेटीवर अवलंबून राहावे लागत आहे. अनेकदा योग्यवेळी योग्य माहिती न मिळाल्याने नुकसान सहन करावे लागत असते. महाविस्तार एआय अॅपमुळे शेतकरी आणि त्यांना भेडसावणाऱ्या अडचणी यांच्यातील दरी कमी होण्यास मदत मिळत आहे.

कर्जत तालुक्यात तालुका कृषी अधिकारी दिनेशकुमार कोळी यांच्या नेतृत्वाखाली महाविस्तर एआय अभियान राबविण्यात येत आहे.कृषी विभागाचे कृषी सहायक,पर्यवेक्षक यांच्या माध्यमातून नियोजनपूर्वक हे अभियान राबविले जात असून गावोगावी डिजिटल साक्षरता कॅम्प आयोजित करण्यात येत आहेत.या कॅम्पमध्ये शेतकऱ्यांना अॅप डाउनलोड करून प्रत्यक्ष वापर शिकविला जातो. डिजिटल माध्यमाची भीती दूर करून आत्मविश्वास निर्माण करणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. महाविस्तार अॅपमधील बाजारभाव सुविधा शेतकऱ्यांसाठी क्रांतिकारी ठरत आहे.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार मनाहेर अर्जुनराव साबणे यांनी मौजे वदप आदिवासीवाडी, ता.कर्जत, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतींचे मालक मिलिंद दिनकर कोर यांचेकडून मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे. आर. पॉ | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| १६ | २ | एकुण क्षेत्र ०-४१-५० पैकी विकत देणार यांचे मालकीचे क्षेत्र ०-२२-०० | ३-६४ |
| १६ | ६ | ०-२९-३० | ३-०० |
| १७ | ३/क | ०-१३-०० | ०-०९ |

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार अॅडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- १९/०२/२०२६

**अॅड. समीर आर. सावंत**
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता-गाळा नं.०९,कोर्ट व्हयू बिल्डींग,
तळ मजला, दिवाणी व फौजदारी
न्यायालयासमोर, कर्जत,
ता.कर्जत,जि. रायगड
मो.नं ९१५८३१३७३३

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे कशेळे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती जमिन मिळकतीचे मालक श्री. सुनिल किसन जाधव यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे :-

| सर्व्हे नं | प्लॉट नं | क्षेत्र (आर.चौ.मी) | आकार (रू.पै) |
|---|---|---|---|
| १४२ | ९४८ | १-९५-०० | १९-५० |

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : १९/०२/२०२६

**अॅड. राकेश भरत भोईर**
ऑफीस-कशेळे, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८१४९९४१८५२

**पान १ वरून**

## तीन वर्षांच्या अबोलीची ‘शिवगर्जना’

घडत असल्याचे हे सुंदर उदाहरण आहे. अबोलीच्या कंठातून दुमदुमलेली महाराजांची शिवगर्जना ही केवळ सादरीकरण नव्हे, तर तिच्या हृदयातील शिवप्रेमाची साक्ष आहे.

**मला शिवाजी महाराज आवडतात**

मला शिवाजी महाराज खूप आवडतात मी मोठी होऊन त्यांच्यासारखी धाडसी होणार! असे अबोली आनंदाने सांगते. छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल बोलताना तिच्या चेहऱ्यावरचा उत्साह आणि चमक सर्वांचे मन जिंकून घेते.

## रायगड पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या

पोलीस निरीक्षक हनुमंत शिंदे यांची बदली अलिबाग पोलीस ठाण्यात केली आहे. गोरेगावमधील सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय सुर्वे यांची बदली मांणगाव पोलीस ठाणे येथे केली आहे. माथेरानचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल सोनोने यांची बदली कर्जत पोलीस ठाण्यात केली आहे. अलिबाग पोलीस ठाण्यातील सहाय्यक पोलीस निरीक्षक सरिता मुसळे यांची माथेरानमध्ये प्रभारी अधिकारी म्हणून बदली करण्यात आली आहे. खालापूरचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष आवटी यांची दिघी सागरी पोलीस ठाण्यात प्रभारी अधिकारी म्हणून बदली केली आहे. माणगावचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नरेंद्र बेलदार यांची गोरेगाव पोलीस ठाण्यात प्रभारी अधिकारी म्हणून बदली केली आहे. अलिबाग पोलीस ठाण्यातील सहाय्यक पोलीस निरीक्षक भारत फार्णे यांची कोलाड पोलीस ठाण्यात प्रभारी अधिकारी म्हणून बदली केली आहे. जिल्हा वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक अभिजीत भुजबळ यांची रसायनी पोलीस ठाण्यात प्रभारी अधिकारी म्हणून बदली केली आहे. भरोसा सेलमधील पोलीस निरीक्षक सरिता चव्हाण यांची जिल्हा वाहतूक शाखेत बदली केली आहे. तसेच, नियंत्रण कक्षातील सहाय्यक पोलीस निरीक्षक स्मिता पाटील यांची भरोसा सेल अलिबागमध्ये प्रभारी अधिकारी म्हणून बदली करण्यात आली आहे. या अधिकाऱ्यांनी प्रलंबित गुन्हे, अर्ज, प्रकरणी कामे लेखी स्वरुपात पोलीस ठाण्यातील अन्य पोलीस अधिकारी यांच्याकडे सुपूर्द करून नवीन नेमणूकीच्या ठिकाणी तात्काळ कार्यमुक्त करावे, अशी लेखी सुचना देण्यात आली आहे.

## ३०९ कंटेनरमधील सुकामेवा जप्त

रोखून धरत सखोल तपासणी केली. तपासात कंटेनरमधील सुका मेवा, विशेषतः आक्रोड हा अफगाणिस्तानचा नसून अन्य देशातील असल्याचे स्पष्ट झाले. मात्र, आयात शुल्कात सवलत मिळवण्यासाठी तो अफगाणिस्तानचा असल्याचे खोटे कागदपत्र सादर करण्यात आल्याचे उघड झाले. दक्षिण आशियाई मुक्त व्यापार करार (एसएएफटीए) अंतर्गत अफगाणिस्तानातून येणाऱ्या मालावर शून्य आयात शुल्क लागू होते. याच तरतुदीचा गैरफायदा घेत बनावट ट्रान्झिट कागदपत्रे, बिल ऑफ लॅडिंग आणि ई-संचित प्रणालीवर खोटी माहिती अपलोड करून मालाची मूळ ओळख लपविण्यात आल्याचे तपासात निष्पन्न झाले. बंदर अब्बास ते जिबेल अली (यूएई) या प्रवासाचेही बनावट दस्तऐवज तयार करण्यात आले होते. या कारवाईनंतर सीमा शुल्क विभागाने संबंधित आयातदारांकडून मालाच्या किमतीएवढी बँक हमी मागितली आहे. दरम्यान, या कारवाईविरोधात एका आयातदाराने मुंबई हायकोर्टात दाद मागितली आहे.

## जिल्ह्यात ८९ मिरवणूका

या कार्यक्रमाच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याची ओळख सर्व स्तरातील घटकांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

महाराष्ट्राचे आराध्य दैवत म्हणून ओळखले जाणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त होणारे कार्यक्रम आनंदात व उत्साहात साजरे व्हावे, यासाठी रायगड पोलिसांनीदेखील कंबर कसली आहे. कायदा व सुव्यवस्था बिघडू नये म्हणून जिल्ह्यामध्ये ६३२ हून अधिक पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचा बंदोबस्त ठिकठिकाणी ठेवला आहे. त्यामध्ये ७६ पोलीस अधिकारी, ४८८ पोलीस अंमलदार, ६८ वाहतूक पोलीस कर्मचारी तसेच आरसीपीचे ३ पथकांचा समावेश असणार आहे.

## अलिबागमध्ये शिवजन्मोत्सव

कार्यक्रम होणार आहे. लाठीकाठी व मर्दानी खेळ इत्यादी कार्यक्रम होणार आहेत. तसेच, गाज फाऊंडेशन व मनस्वीनी चॅरिटेबल ट्रस्ट आयोजित ‘प्रतापगड पर्व’ हा कार्यक्रम होणार आहे.

## बहुचर्चित ई-स्पीड बोट निराशेच्या गर्तेत

प्रवास अगदी ३५-४० मिनिटातच होणाऱ्या ई-स्पीड बोटीचा पर्याय निवडला होता. प्रदुषणविरहित इलेक्ट्रॉनिक बॅटरीवर चालणाऱ्या अत्याधुनिक तंत्रज्ञान व सोयी सुविधांनी सुसज्ज असलेल्या दोन ई-स्पीडबोटींचे कंत्राट माझगाव डॉक बिल्डर्स लिमिटेड कंपनीला बोटी पुरवठा व हाताळणीचे काम देण्यात आले होते. १० वर्षं ई-स्पीडबोटींची सेवा पुरवण्यासाठी जेएनपीएने ३७ कोटी ८९ लाख ९४ हजार १९० रुपये खर्चाची तरतूदही केली आहे. उन्हाळी हंगामात २०-२५ प्रवासी व पावसाळी हंगामात १०-१२ क्षमतेच्या दोन स्पीडबोट बोटी फेब्रुवारी २०२५ पासुनच प्रवासी वाहतूकीसाठी जेएनपीटीच्या सेवेत दाखल होणार असल्याची घोषणा जेएनपीएने केली होती. मात्र स्पीडबोटींचा वेग, प्रवासी वाहतूकीची क्षमता, तांत्रिक अडचणी आणि वारंवार करण्यात आलेल्या चाचण्यानंतरही मागील वर्षभरापासून ई-स्पीडबोट सेवा सुरूच झालेली नाही. त्यामुळे प्रतिक्षेत असलेल्या प्रवाशांचा भ्रमनिरास झाल्याने प्रवासीवर्गातुन नाराजी व्यक्त करीत जेएनपीएवरच टीकेची झोड उठवली आहे. त्यानंतर वारंवार टिकेचे धनी ठरलेल्या संतप्त झालेल्या जेएनपीएनेही माझगाव डॉक बिल्डर्स लिमिटेड कंपनीला दोन ई-स्पीड बोटी पुरवठा व हाताळणीच्या कामाचे कंत्राट आणि ३७ कोटी ८९ लाख ९४ हजार १९० रुपये खर्चाची तरतूदही रद्द करण्याच्या हालचाली सुरू केल्या असल्याची माहिती जेएनपीए अधिकाऱ्यांनी दिली.

## डंपरच्या अपघातात क्लिनरचा मृत्यू

पटेल (२१) हा आपल्या ताब्यातील डंपर वाकण-पाली रस्त्यावरून घेऊन जात असताना वजरोली गावाजवळ त्याचा डंपरवरील ताबा सुटल्या. त्यामुळे हा डंपर रस्त्याच्या बाजूला असलेल्या एका झाडाला धडकला. हा अपघात इतका भीषण होता की, त्यात डंपरचा क्लिनर सूर्यप्रकाश पटेल याचा गंभीर जखमी झाल्याने जागीच मृत्यू झाला. तर, चालक सविनय पटेल व सहकारी विरेनकुमार सिंग हे गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार करण्यात आले. त्यांनतर अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. या प्रकरणी डंपर चालक सविनय पटेल यांच्या विरोधात नागोठणे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## मोबाईल, रिकाम्या बाटल्या

मोबाईल, रिकाम्या बाटल्या, बनावट बुचे, बनावट कागदी लेबल व इतर साहित्य असा एकूण ५ लाख ७८ हजार ४४० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. दोन्ही ठिकाणी मिळून एकूण १९ लाख ३८ हजार ८३० इतक्या किमतीचा मुद्देमाल जप्त करून बिन्नु कल्लूर, विनेश्वर एथ, एस, बिजू उरवा यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## बनावट विदेशी मद्यावर कारवाई

१७ बाटल्या, देशी मद्याच्या ४ बाटल्या, २

सिडको
शहरांचे शिल्पकार

## नोटीस-१

साडेबावीस टक्के योजनेअंतर्गत वाटप भूखंडाचे हस्तांतरण ‘‘ना हरकत पत्र’’ मागणी अर्जानुसार नोटीस सर्व गणेश वसंत भगत, जयेंद्र वसंत भगत, गंगाबाई वसंत भगत, कांता वसंत भगत, सर्व राहणार - गव्हाण, पो. उलवे, ता. पनवेल, जि. रायगड-४१० २०६ (अर्जदार).

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदारांनी खाली उल्लेखीत २२.५% योजनेअंतर्गत त्यांना वाटप करण्यात आलेल्या भूखंडाचे मे.रॉस बिल्डकॉन तर्फे भागीदार १) राजेश चंद्रकांत पोळ २) गिरीश शेखर खंडागळे ३) राहुल गणेश मेहता ४) खटाऊ भेरूलाल गोमानी यांचे नावे हस्तांतरण करण्याकरीता ‘‘ना हरकत प्रमाणपत्रासाठी’’ मागणी अर्ज केला आहे. त्यामधील समाविष्ट भूखंडाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| हस्तांतरण अर्ज क्रमांक | अर्जाचा दिनांक | हस्तांतरण करावयाच्या मालमत्तेचा तपशील | | | | वाटप दिनांक | भाडेपट्टा करारनामा तथा भाडेपट्टा करारनामा नोंदणी दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नोड | सेक्टर | भूखंड क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) | | |
| २१५५ | ०५.०२.२०२६ | पुष्पक नोड | २७ | ६० | ११४०.०० चौ. मी | १९.०९.२०२५ | ०४.१२.२०२५ ०५.१२.२०२५ |

या नोटीसद्वारे सदर हस्तांतरणाबाबत कोणत्याही हितसंबंधित व्यक्तीस / संस्थेस हरकत / तक्रार नोंदवण्याची असल्यास नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या मुदतीमध्ये लेखी स्वरूपात आवश्यक त्या पुराव्यासहीत **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन), १ ला मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर** यांचे कार्यालयात सादर करण्यात यावी. उक्त १५ दिवसांच्या मुदतीमध्ये कोणतीही हरकत लेखी स्वरूपात या कार्यालयात प्राप्त न झाल्यास, सदर ‘‘ना हरकत प्रमाणपत्र’’ देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरण्यात येईल व हस्तांतरणाची पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/५०६/२०२५-२६

MAHAGENCO
Maharashtra State Power Generation Co. Ltd.

## E-TENDER NOTICE (REFLOAT)

**Tender Specification No.** Civil-III/KGSC Pophali/Rfx No.3000066091, 3000066094, 3000066097, 3000066100, 3000066101, 3000066102, 3000066103, 3000066104, 3000066105, 3000066106, 3000066114/FY-2025-26

**Name of work:**

1) Providing and fixing concrete trench covers, at T.Y., Switchyard, stage III at KGSC, Pophali.
2) Construction of security Chaukies at various locations in Powerhouse premise at KGSC, Pophali.
3) Construction of bituminous road at Pedhambe switchyard, Stage III Power House at KGSC, Pophali.
4) Construction of Box Culvert at stage III switchyard road, at KGSC, Pophali.
5) Upgradation of control room at Stage-III, KGSC, Pophali.
6) Providing, laying Kotah flooring at machine hall, generator floor of St. III, Power house, KGSC Pophali
7) Construction of bituminous internal roads at Pedhambe switchyard stage -III, KGSC, Pophali.
8) Work of raising compound wall at switchyard stage -III, KGSC, Pophali.
9) Construction of new Kitchen otta and toilet units at Sr. bungalow buildings at KGSC, Pophali.
10) Construction of Bituminous approach road to weigh bridge at KGSC, Pophali.
11) Providing wooden badminton court with mat at recreation club building, KGSC, Pophali.

**Sale period :-** 19.02.2026 at 11:00 Hrs. to 05.03.2026 up to17:00 Hrs.
**Submission Date :-** 06.03.2026 up to17:00 Hrs.

Kindly see the company's website https://eprocurement.mahagenco.in. For detailed tender notice.

**Contact person-** Executive Engineer (c), O/o Chief Engineer (Civil) -III, M.S.P.G. Co. Ltd., Mumbai **Fax :**( 022)26581469 **Tel.No.**022-26474211 extn. 2590, 26472131

दिनांक : १९ फेब्रुवारी २०२६

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालका कडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे-आंबिवली त कोतलखलाटी, ता.कर्जत, जि.रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर-पॉ. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| जनार्दन अनंत घोसाळकर | ५५ | २/क/१ | ०-२५-९० | १ | २२ |
| | ५५ | २/क/२ | ०-२६-०० | १ | २२ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे,
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता.कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही / -
**अॅड.भुपेश तानाजी पेमारे**
मो.नं. ९१५८२७७७२८
दिनांक :- १९/०२/२०२६

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे चौल, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) किरण प्रभाकर भगत २) प्रसाद प्रभाकर भगत ३) सिमा राजन भगत ४) रश्मी अरविंद रावते ५) मैथिली पंकज कदम यांचे कडुन कायम मालकी हक्कने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै) |
|---|---|---|---|
| चौल, ता.अलिबाग | ११७७ | ०-१७-९० जिरायत<br>०-०१-५० पो.ख.<br>०-१९-४० एकुण | ४.८८ |

वर वर्णन केलेली जमिन मिळकत सदर नोटीसीचा नोटीसीचा विषय आहे.

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ (चौदा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी स्वरूपात आणून देण्यात यावे. मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

ठिकाण - अलिबाग
दिनांक : १८/०२/२०२६

**अॅड विराज शरद अंबुकर**
मु.हनुमानवाडी, थेरोंडा, पो.चौल,
ता.अलिबाग, जि.रायगड
मोबा. क्र. ९०२८८५१२८०

# महाराजांचे विचार पेरणारा ''मावळा''

**रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

**हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्वराज्याच्या रक्षणासाठी संपूर्ण आयुष्य वेचले. महाराजांच्या विचारांना प्रेरित होऊन निर्माण झालेल्या अलिबागमधील मावळा प्रतिष्ठानने अलिबाग तालुक्यासह संपूर्ण रायगड जिल्हयात छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार घराघरात पोहोचविण्याचे काम केले. महाराजांच्या काळातील गडकिल्ल्यांचे संवर्धन करण्याबरोबरच शालेय स्तरापासून छत्रपती महाराजांचा इतिहास आपल्या उपक्रमातून पोहोचविण्याचा प्रयत्न केला. मावळा प्रतिष्ठानला आज एक तप म्हणजे १२ वर्षे होत आहे. त्यामुळे महाराजांचे विचार पेरणारा मावळा म्हणून या प्रतिष्ठानला बोलणे वावगे ठरणार नाही. छत्रपती शिवाजी महारांजाची जयंती निमित्त मावळा प्रतिष्ठानच्या कार्याच्या घेतलेला आढावा.**












१९ फेब्रुवारी १६३० मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म पुणे जिल्ह्यातील शिवनेरी किल्ल्यामध्ये झाला. शालेय जीवनात असताना पुस्तकातून छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास शिकायला मिळाला. ज्यांनी मुघल आणि आदिलशाहाला आव्हान देऊन हिंदवी स्वराज्य स्थापन केले.परकीय सत्तांच्या जुलमी राजवटीला विरोध करून रयतेचे राज्य निर्माण केले. छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती संपूर्ण महाराष्ट्रात साजरी केली जाते.१९ फेब्रुवारी हा दिवस प्रत्येक शिवभक्तांसाठी एक आनंदाचा आणि गौरवाचा दिवस म्हणून मानला जातो.

महाराजांच्या विचारांना प्रेरित झालेले अलिबागमधील आकाश राणे, यतिराज पाटील, सिध्दार्थ नाईक, कपिल अनुभवणे, निखील चव्हाण,मयुरेश कुथे, अर्थव पाटील, आकाश पाटील, आदित्य नाईक, वैभव भालकर, ऋषीकेश चिंदरकर, मानस कुंटे, विवेक जोशी, संग्राम घरत, आणि स्व. तुषार सावणेकर या तरुणांसह असंख्य तरुणांनी एकत्र येऊन महाराजांची जयंती एक वेगळ्या पध्दतीने साजरी करण्याचा प्रयत्न १४ वर्षापूर्वी केला होता. या पाच जणांनी अलिबाग शहरासह आजूबाजूच्या गावांतील तरुणांना एकत्र आणून शिवजयंतीनिमित्त बाईक रॅली काढण्याचा निर्णय घेतला आहे. महाराजांच्या जयंतीनिमित्त आयोजित केलेला हा उपक्रम यशस्वी झाला. त्यांच्या या उपक्रमाची चर्चा शहरासह अलिबाग तालुक्यात अनेकांच्या घराघरात पोहचली. वेगवेगळ्या क्षेत्रातील मंडळींकडून या पाच जणांचे कौतुक करण्यात आले. महाराजांचे विचार लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला होता.

एका विचाराचे असंख्य तरुण एकत्र आले. असे उपक्रम होणे गरजेचे आहे, असे सांगण्यात आले. या जाणकार मंडळींकडून मिळालेल्या प्रोत्साहनात महाराजांच्या नावाची एक संस्था निर्माण करण्याचा निर्णय घेतला. संस्थेचे नाव काय ठेवायचे असा प्रश्न निर्माण झाला होता. अखेर अलिबागमधील देवेन सोनावणे यांनी नाव सुचविण्यावर प्रोत्साहित केल्यानंतर मावळा प्रतिष्ठान नावाची संस्था सुरु करण्याचा निर्णय घेतला. २०१४ मध्ये मावळा प्रतिष्ठान नावाची संस्था सुरु करण्यात आली. संस्थापक अध्यक्ष तथा कार्याध्यक्ष आकाश राणे यांच्या पुढाकाराने निर्माण झालेल्या या मावळा प्रतिष्ठानमार्फत वेगवेगळे उपक्रम राबविण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराजाची जयंती साजरी होत असताना या निमित्ताने वेगवेगळे उपक्रम सुरु करण्यात आले. अलिबाग नगरपरिषदेचे वीज व बांधकाम सभापती प्रशांत नाईक हे मावळा प्रतिष्ठानसाठी कायमच मार्गदर्शक ठरले आहेत. संस्थेच्या पाठीशी ठामपणे ते उभे राहत आहेत. संस्थेचे सल्लागार ॲड. एम.एम. पारकर आहेत.

रक्तदान शिबीर राबवून सामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रयत्न केला. पर्यावरणाचा समतोल राखण्याबरोबरच प्रदुषण मुक्तीसाठी वृक्षारोपण गरजेचे आहे, ही भावना घराघरात रुजविण्यासाठी वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला. शिक्षणाचे महत्व पटवून देण्यासाठी गरीब, गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप कार्यक्रम घेण्यात आले आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांनी रायगड जिल्ह्यासह महाराष्ट्रात गड किल्ल्यांची निर्मिती केली. आजही हे गड किल्ले महाराजांच्या पराक्रमासह इतिहासाचे साक्षीदार आहेत.मावळा प्रतिष्ठान गेल्या अनेक वर्षापासून या गडकिल्ल्यांच्या संवर्धनासाठी पुढाकार घेत आहे. गडकिल्ल्यांमध्ये स्वच्छता मोहीम राबविण्यापासून स्वच्छता राखण्यासाठी जनजागृतीदेखील करण्याचे काम मावळा प्रतिष्ठानने केले आहे. अलिबाग समुद्र किनाऱ्यापासून काही अंतरावर शिवकालीन कुलाबा किल्ला आहे. या किल्ल्यामध्ये सिध्दीविनायक मूर्ती आहे. या किल्ल्यामध्ये माघी गणेशोत्सव दरवर्षी साजरा केला जातो. हजारोच्या संख्येने गणेशभक्त या ठिकाणी दर्शनासाठी येतात. भक्तांना योग्य पध्दतीने दर्शन घेता, यावे म्हणून मावळा प्रतिष्ठानचे पदाधिकारी, सदस्य स्वयंसेवकाची भूमिका बजावून गडकिल्ल्यांचे संवर्धन व जतन करण्यासाठी जनजागृती करतात. अलिबागच्या समुद्रात खांदेरी किल्ला आहे. या किल्यामध्येदेखील स्वच्छता मोहीम राबविण्याचे काम या मावळा प्रतिष्ठानच्या मार्फत केले जात आहे. लहान वयापासून गडकिल्ल्यांचे महत्व व संवर्धन याची जाणीव जिल्ह्यातील घराघरात रहावी म्हणून मावळा प्रतिष्ठानच्या मार्फत गेल्या अनेक वर्षापासून गडकिल्ले तयार करण्याची स्पर्धा भरविली जाते. या सुरु केलेल्या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद आजही मिळत आहे. दरवर्षी दिवाळीमध्ये शहरी भागासह ग्रामीण भागातील मुले माती, विटा गोळा करून गडकिल्ले तयार करतात. काहीजण सोशल मिडीयाचा आधार घेत त्यानुसार गडकिल्ले तयार करीत असतात. छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार आणि त्यांनी निर्माण केलेले गड किल्ल्यांचे महत्व रुजविण्याचा प्रयत्न मावळा प्रतिष्ठानद्वारे करण्यात आला आहे.

वेगवेगळे उपक्रम राबवित असताना व्याख्यानाच्या माध्यमातूनही महाराजांचे विचार पोहचविण्याचा प्रयत्न मावळा प्रतिष्ठानने केला आहे. ॲड. ठोसर, पुरंदरच्या प्राजक्ता झेंडे यांचे व्याख्यान अलिबागमध्ये ठेवण्यात आले आहेत. आज मावळा प्रतिष्ठान १२ व्या वर्षात पदार्पण करीत आहे. एक तप कार्य करणाऱ्या मावळा प्रतिष्ठानच्या वतीने यावर्षी १९ फेब्रुवारीला महाराजांची जयंती साजरी केली जाणार आहे. या निमित्ताने अलिबागमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे.

रात्री बारा वाजता गारद होणार आहे. सकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास महाराजांचे चरण स्नान होणार आहे. दुपारी चौकामध्ये शिवभक्तांचा सन्मान केला जाणार असून गोड पदार्थ देऊन उत्सव साजरा केला जाणार आहे. सायंकाळी चार वाजता अलिबाग शहरातील श्रीराम मंदिर येथून भव्यदिव्य अशी मिरवणूक काढण्यात येणार आहे. सायंकाळी साडेसात वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे मिरवणुकीचा समारोप होणार आहे. त्यानंतर शिवकालीन मर्दानी खेळ खेळविले जाणार आहेत. त्यामध्ये लाठीकाठी या खेळाचा समावेश असणार आहे. तसेच रात्री आठ वाजता, एक वेगळा उपक्रम हाती घेतला आहे. गाज फाऊंडेशन आणि मनस्वीनी चॅरिटेबल ट्रस्ट विद्यमाने, मावळा प्रतिष्ठानच्या वतीने सरखेल कान्होजी आंग्रे यांचे वंशज रघुजी आंग्रे व अलिबागच्या उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे यांच्या पुढाकाराने प्रतापगड पर्व हा कार्यक्रम होणार आहे.

अलिबागच्या भूमीत प्रतापगड पर्व या कार्यक्रमातून इतिहासाला वर्तमानात जोडण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. सह्याद्रीचा आत्मविश्वास आणि सागराची विशालता याचा संगम या कार्यक्रमातून साकारला जाणार आहे. युवा पिढीला शौर्य, संघटन, शिस्त आणि राष्ट्र प्रेम याची प्रेरणा या कार्यक्रमातून देण्याचा उपक्रम निश्चितच समाजासाठी दिपस्तंभ ठरणार आहे, असे मावळ्यांचे विचार आहेत. या कार्यक्रमानंतर इतिहासात प्रतापगड आणि कुलाब्याची भेट रुढ होणार आहे. हा सांस्कृतिक सोहळा नसून तो ऐतिहासिक विचार आणि मूल्यांचा संवाद असणार आहे. सह्याद्री आणि समुद्र यांच्या साक्षीने स्वराज्याची प्रेरणा पुन्हा जगविण्याचा प्रयत्न, भविष्यातील स्वराज्याची स्वप्ने, तरुणाच्या जाज्वल्य अभिमानाने सत्यात उतरेल असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

जयंती निमित्त दरवर्षी अलिबाग शहरातून मिरवणूक काढली जाते. मिरवणुकीत स्वयंस्फुर्तीने सहभाग घेऊन शीत पेय आणि ज्यूस देण्याची व्यवस्था त्यांच्या मार्फत केली जाते. त्यामुळे या मिरवणुकीत हिंदू-मुस्लीम ही एक मताची भावना दिसून येते, असे मत मावळा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष, कार्याध्यक्ष आकाश राणे यांनी व्यक्त केले आहे.

# शिवछत्रपतींची लोककल्याणकारी दृष्टी

प्रा. डॉ. वि. ल. धारुरकर

युगप्रवर्तक राज्यकर्ते आणि कुशल प्रशासक म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांची इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंद आहे. शिवचरित्रावर शिवाजी अँड हिज टाईम्स म्हणजे शिवाजी आणि शिवकाल हा अजोड व अभिजात ग्रंथ लिहिणारे सर जदुनाथ सरकार या ग्रंथाच्या अंतिम उपसंहारात असे प्रतिपादन करतात की, छत्रपती शिवाजी महाराज हे मध्ययुगीन भारताच्या इतिहासातील महान, कर्तृत्ववान राजे होऊन गेले. आधुनिक काळात कल्याणकारी राज्य म्हणून जी काही मौलिक कार्ये बजावली जातात अशा सर्व कार्यांमध्ये त्यांनी श्रेष्ठ असे आदर्श निर्माण केले. सर जदुनाथ सरकार यांनी काढलेला हा निष्कर्ष अनेक दृष्टीने महत्त्वाचा आहे. शिवछत्रपतींची लोककल्याणकारी दृष्टी ही त्यांच्या राजमुद्रेतून स्पष्ट होते.

**प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता।।**
**साहसूनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते।।**

ही संस्कृत भाषेतील राजमुद्रा छत्रपती शहाजी महाराजांच्या बंगळुरु येथील दरबारातील जयराज पिंडे या विद्वानाने तयार केली होती. या राजमुद्रेचा अर्थ असा होतो की, प्रतिपदेच्या चंद्रकोरीप्रमाणे वाढत जाणारे शहाजी राजांचे पुत्र छत्रपती शिवाजीराजे यांचे राज्य विश्ववंद्य व सर्वमान्य आहे आणि हे राज्य जनतेच्या कल्याणासाठी सतत कार्यरत राहणारे आहे. या राजमुद्रेचा खराखुरा अर्थ महाराजांनी आपल्या राज्यकारभारातून अभिव्यक्त केलेला दिसून येतो. ही राजमुद्रा शिवरायांनी तोरणा घेतला आणि स्वराज्याचे तोरण बांधले तेव्हापासून त्यांच्या पत्रव्यवहारात रुढ असल्याचे दिसून येते. याचा अर्थ असा होतो की, पुण्यामध्ये प्रतिकात्मक सोन्याचा नांगर फिरवून त्यांनी महसुली व्यवस्थेला उत्तम स्वराज्याची जोड दिली, तेव्हापासून त्यांच्या प्रशासकीय कारभाराचे प्रतिबिंब पहावयास मिळते. वर्तमानकाळात पुणे, सुपे, इंदापूर या सर्व परिसरात शिवरायांनी आपली पहिली छाप उमटवली. त्यांच्या प्रारंभिक कारकिर्दीस त्यांनी प्रशासकीय व्यवस्था विकसित करताना त्यांना राजमाता जिजाऊंचे यथोचित मार्गदर्शन लाभले.

डॉ. अ. रा. कुलकर्णी यांनी म्हटल्यानुसार, शिवाजी महाराजांनी रयतेची महसूल व्यवस्था विकसित केली आणि ती त्यांनी प्रथमतः पुणे परिसरात अमलात आणली. शिवरायांनी एकाहून एक गडकोट आपल्या ताब्यात घेतले आणि शिवाय स्वतंत्रपणे गडकोटांची उभारणीही केली. त्यांच्या नावाने ३०० गडकोटांच्या निर्मितीची नोंद करण्यात आली आहे. गडकोटांचे प्रशासन असो की, लोकांचे कल्याणकारी प्रशासन असो या प्रशासनामध्ये त्यांचा लोकाभिमुख दृष्टिकोन दिसून येतो. वि. का. राजवाडे यांनी मराठ्यांच्या इतिहासाची साधने या संग्रहामध्ये १८ खंडांमध्ये दिलेली पत्रे अत्यंत महत्त्वाची आहेत. त्यामध्ये त्यांनी कारभार ऐसे करावा की रयतेच्या भाजीच्या देठास ही हात न लावणे. नाहीतर मुघल मुलखात आले त्याहूनही अधिक तुम्ही। ऐसा तळतळाट होईल। पणतीतील वाती उंदिर पळवतील, गंज कोठीस दगा होईल. त्यामुळे डोळ्यात तेल घालून काळजी घ्यावी, अशा प्रकारे रयतेच्या भाजीच्या देठालाही हात लावू नये, हा शिवाजी महाराजांचा प्रशासकीय दृष्टिकोन स्वच्छ आणि पारदर्शक लोकप्रशासनाची प्रचिती आणून देतो. शिवाय त्यांनी लोकल्याणाची हमी देताना त्यावेळच्या महसुली व्यवस्थेतील कारकुनी कावा प्रकाशात आणला आहे. समाजातील लब्धप्रतिष्ठित मंडळी आपल्या अधिकारांचा गैरवापर करुन जनतेची लुबाडणूक कशी करतात, यावरही त्यांनी आपल्या पत्रांमधून प्रकाश टाकला आहे.

शिवकालीन पत्रांचा अभ्यास केला असता त्यातून प्रामुख्याने तीन सूत्रे समोर येतात. पहिले म्हणजे शिवरायांचे स्वराज्य हे लोककल्याणावर लक्ष केंद्रीत करणारे होते. दुसरे म्हणजे प्रशासनातील अधिकारी वर्गाने जनतेला जबाबदार राहून जनतेचे प्रश्न तत्परतेने सोडवले पाहिजेत यावर त्यांचा भर होता. तिसरे म्हणजे आपल्या प्रशासनातून त्यांनी आर्थिक न्याय तर दिलाच; पण त्याचबरोबरीने धार्मिक आणि सांस्कृतिक शोषणापासूनही लोकांची मुक्तता केली. तसेच पर्यावरण रक्षणाचाही संदेश दिला. मुघलकाळात ज्यापद्धतीची विषमता होती त्या विषमतेविरुद्धही त्यांनी झुंज दिली; पण आपल्या ध्येयधोरणाची अमलबजावणी करताना त्यांनी धर्मावरुन प्रजेमध्ये फरक केला नाही. सुरतेच्या लुटीच्या वेळी त्यांनी कल्याणकारी कार्ये करणाऱ्या डच आणि काही ख्रिश्चन मिशनऱ्यांना अभय दिल्याचे दिसून येते. शिवाय कुराणाबाबत आदर करण्याविषयीच्या सूचनाही ते करतात.

शिवरायांच्या धार्मिक धोरणांमध्ये सर्व प्रकारच्या प्रार्थना स्थळांना, धार्मिक संस्थांना दिवाबत्तीची सोय उपलब्ध करुन देण्याची सूचना होती. शिवाय त्यांना समान सांस्कृतिक न्यायही राजांनी मिळवून दिला. शिवकाळातील ५० संतांची सूची अभ्यासली असता त्यामध्ये त्यांनी सर्व संतांना समान दृष्टीने आणि अग्रक्रमाने वागवल्याचे दिसून येते. त्याकाळात मोरया गोसावी, संत तुकाराम आदींच्या कार्याचा सन्मान शिवाजीराजांनी केल्याचे दिसून येते.

छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या कार्यकाळामध्ये धार्मिक आणि सामाजिक न्याय तर दिलाच; पण त्याबरोबरीने कल्याणकारी दृष्टीने अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. त्यांनी दुष्काळाच्या निर्मूलनासाठी जलसाठवणुकीची स्वतंत्र योजना आखली. शिवकाळामध्ये महाराष्ट्रातील खेडी अत्यंत संपन्न होती आणि या खेड्यांमध्ये काबाड कष्ट करणाऱ्या शेतकऱ्यांना चांगल्या प्रकारे अभय दिले जात होते. शेतीच्या मालाची विक्री, ने-आण तसेच व्यापारी वस्तूंची विविध बाजारपेठांतील सुरक्षित देवाणघेवाण या सर्व गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या आहेत, असे अ. रा. कुलकर्णी यांनी महाराष्ट्रा इन द एज ऑफ शिवाजी या ग्रंथात म्हटले आहे. सभासदाच्या बखरीमध्ये तत्कालीन आर्थिक जीवनावर प्रकाश टाकण्यात आला आहे. त्याकाळात हुंडी देण्याची पद्धत रुढ होती. त्यास वापी असे म्हटले जात असे. होन, शिवराई अशी सोन्याची नाणी प्रचलित होती. राजा शिवछत्रपती अशी अक्षरे असलेल्या सोन्याच्या नाण्यांचा विनिमय दर महत्त्वाचा होता. विजयनगरच्या हिंदू साम्राज्यानंतर स्वतंत्रपणे सोन्याची नाणी पाडणारे छत्रपती शिवाजी महाराज हे एकमेव भारतीय सम्राट दिसून येतात. त्यांच्या नाण्यांचा प्रभाव इतका प्रचंड होता की पुढे चालून मुघलांनी ही नाणी वितळून टाकण्याचा सपाटा लावला. तथापि, सध्या महाराष्ट्रामध्ये शिवकालीन सुवर्णनाणी उपलब्ध आहेत. या नाण्यांच्या अभ्यासावरुन तत्कालीन नाण्यांचा विनिमय दर, त्यांची मांडणी, सजावट याबाबतीतील श्रेष्ठता लक्षात येते. ज्यावेळी प्रशासन व अर्थकारण संपन्न आणि समृद्ध असते त्याच वेळी सोन्याची नाणी चलनामध्ये येतात. शिवरायांनी राज्याभिषेकावेळी सोन्याच्या या नाण्यांचा प्रभाव इतका पाडला होता की, त्यांची किर्ती जगभर पसरली.

**सबंध मध्ययुगामध्ये तत्कालीन जगातील राज्यकर्त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा तौलनिक आढावा घेतला असता असे दिसते की, छत्रपती शिवाजी महाराजांचे राज्य हे त्या काळातील युरोपीय आणि सर्व आशियाई राज्यांपेक्षा श्रेष्ठ होते. शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकापूर्वी चार वर्षे आधी प्रकाशित झालेल्या लंडनमधील गॅजेट या साप्ताहिकाच्या पहिल्या पानावर एका वृत्तांतामध्ये शीर्षस्थानी शिवाजी : द हिंदू किंग ऑफ इंडिया असा मथळा असलेला लेख आढळून येतो. त्यामध्ये शिवाजी महाराजांनी केलेल्या कल्याणकारी कार्याची महती विषद करण्यात आली आहे. हेन्री ऑक्झिंडर, फ्रान्सिस जर्मिन यांच्या प्रवासवर्णनावरुनही आपणास शिवरायांच्या दूरदृष्टीचे प्रतिबिंब उमटल्याचे दिसून येते. रयतेच्या भाजीच्या देठालाही हात लावू नये हा शिवाजी महाराजांचा प्रशासकीय दृष्टिकोन स्वच्छ आणि पारदर्शक लोकप्रशासनाची प्रचिती आणून देतो.**



सबंध मध्ययुगामध्ये तत्कालीन जगातील राज्यकर्त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा तौलनिक आढावा घेतला असता असे दिसते की छत्रपती शिवाजी महाराजांचे राज्य हे त्या काळातील युरोपीय आणि सर्व आशियाई राज्यांपेक्षा श्रेष्ठ होते. शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकापूव चार वर्षे आधी प्रकाशित झालेल्या लंडनमधील गॅजेट या साप्ताहिकाच्या पहिल्या पानावर एका वृत्तांतामध्ये शीर्षस्थानी शिवाजीः द हिंदू किंग ऑफ इंडिया असा मथळा असलेला लेख आढळून येतो. त्यामध्ये शिवाजी महाराजांनी केलेल्या कल्याणकारी कार्याची महती विषद करण्यात आली आहे. हेन्री ऑक्झिंडेन, फ्रान्सिस जर्मिन यांच्या प्रवासवर्णनांवरुनही आपणास शिवरायांच्या दूरदृष्टीचे प्रतिबिंब उमटल्याचे दिसून येते. कॉस्मो दी गार्डा या पोर्तुगीज इतिहासकारांनी पहिल्यांदा शिवाजी महाराजांचे चरित्र लिहिले. या चरित्रातही शिवरायांच्या युद्धमोहिमांचे, त्यांच्या पराक्रमाचे, गनिमी काव्याचे, तसेच प्रशासकीय निपुणतेचे प्रतिबिंब उमटले आहे. शिवाजी महाराजांच्या वेगवान हालचाली, त्यांचे प्रशासकीय निर्णय आणि त्यांची व्यवहारातील दूरदृष्टी यांविषयी कॉस्मे दी गार्डा यांनी लिहिलेल्या पुस्तकातून मौलिक माहिती प्राप्त होते. सभासदांच्या बखरीमध्ये असे म्हटले आहे की, शिवछत्रपतींनी प्रत्यक्षात प्रतिसृष्टी निर्माण केली. चार पातशहा बुडवल्या आणि स्वराज्य उभे केले. या स्वराज्याचे श्रेष्ठत्व स्पष्ट करताना सभासदाने शिवरायांच्या गडकोटांच्या प्रशासनाची मुक्तकंठाने प्रशंसा केली आहे. शिवकालीन आरमार हा स्वतंत्र अभिमानाचा विषय होय. डी. एन. आपटे यांनी मराठा नेव्ही या ४०० पानांच्या सविस्तर ग्रंथामध्ये शिवरायांच्या आरमारी सामर्थ्याचे विश्लेषण केले आहे. अलीकडे प्राप्त झालेल्या माहितीनुसार, शिवाजी महाराजांनी अत्यंत मोक्याचे असलेले एडन हे व्यापारी बंदर ताब्यात घेऊन तेथे एक आरमारी तळ उभारण्याची योजना आखली होती. यावरुन महाराजांची दूरदृष्टी लक्षात येते. मुघल, विजापूरचा अदिलशाह, अहमदनगरची निजामशाही, इंग्रज,डच, पोर्तुगीज यांच्याशी लढताना शिवरायांनी जी व्यूहरचना केली त्यामध्ये परराष्ट्र धोरणाची बीजेही प्रकट होतात. आपल्या सबंध कल्याणकारी प्रशासन व्यवस्थेमध्ये हेर पद्धतीचा त्यांनी जाणीवपूर्वक केलेला विकास अत्यंत महत्त्वाचा आहे. बहिर्जी नाईक हे शिवरायांचे हेरप्रमुख होते. त्यांच्या हेरपद्धतीचा इतका विस्तार होता की त्याची तुलनाच करायची झाल्यास आज जागतिक पटलावरील आघाडीच्या गुप्तहेर संस्थांशी करावी लागेल. अफजलखानाचा वध असेल, लाल महालात शाहिस्तेखानाची बोटे छाटण्याचा प्रसंग असो किंवा सिद्धी जोहरने वेढा घालूनही पन्हाळगडाकडून विशाळगडाकडे केलेली कूच असो किंवा आग्ऱ्याहून सुटका असो, या सर्व कसोटीच्या प्रसंगी शिवाजीराजांना त्यांच्या निवडक मावळ्यांप्रमाणेच हेरपद्धतीनेही महत्त्वाचे समर्थन दिल्याचे लक्षात येते.

या सर्व चर्चेवरुन हे स्पष्ट होते की, मुद्रा भद्राय राजते म्हणजे शिवरायांचे स्वराज्य हे लोककल्याणासाठी होते. जनता किंवा रयत हा याचा केंद्रबिंदू होता. अधिकाधिक लोकांचे अधिकतम कल्याण करणे हे शिवरायांच्या स्वराज्याचे अंतिम उद्दिष्ट होते. शिवरायांच्या चरित्राचा वेध घेताना जदुनाथ सरकार यांनी त्यांची तुलना विशाल वटवृक्षाशी केली आहे. बनारस येथे गंगेच्या काठी असलेला एक महाकाय वटवृक्ष तोडून त्यावर एक महाकाय कढई जहाँगिर बादशहाने ठोकली होती. परंतु तो वटवृक्ष इतका सामर्थ्यशाली होता की, त्याने आपल्या ऊर्जेने कढई तोडली आणि पुन्हा आकाशाकडे झेप घेतली. त्याप्रमाणे सर्व प्रकारच्या प्रतिकारांशी आणि प्रतिकूल परिस्थितीशी संघर्ष करत महाराजांनी हिंदवी स्वराज्याचा वटवृक्ष दाही दिशांना विस्तारला. आधुनिक हिंदूंना त्यांनी कलाकलाने विकसित व्हायला शिकवले, असे जदुनाथ सरकार लिहितात. त्यांनी शिवाजीराजांच्या कल्याणकारी राज्यव्यवस्थेचे वर्णन करताना शिक्षण, महसूल तसेच हेरपद्धती, गडकोटांचे व्यवस्थापन आणि त्याहीपलीकडे जाऊन सहिष्णु धार्मिक धोरण अशा अनेक मुद्द्यांची चर्चा केली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे त्रिखंडात्मक चरित्र लिहिणारे डॉ. बाळकृष्ण हे छत्रपती राजाराम महाविद्यालयाचे पहिले प्राचार्य होते. त्यांनी शिवाजी द ग्रेट या ग्रंथात असे म्हटले आहे की, शिवाजी महाराजांनी अष्टप्रधान मंडळाची नियुक्ती करुन कार्यविभाजनाचा आदर्शक्रम तर मांडलाच; शिवाय अष्टप्रधानांना बहुमूल्य आणि समग्र वेतन देऊन त्यांना सर्व प्रकारच्या प्रलोभनांपासून दूर ठेवले. कार्यविभागणी आणि विशेषीकरण या तत्वावर त्यांचे अष्टप्रधान मंडळ कार्य करत होते. मध्ययुगामध्ये लोकशाही परंपरांची बीजे शिवाजीराजांनी रोवली. त्यामुळे मध्ययुगात भारतीय राष्ट्रवादाची बैठक निर्माण करण्याचे खरे श्रेय शिवाजी महाराजांकडेच जाते. त्यांच्या लोककल्याणकारी प्रशासनाची प्रशंसा सर जदुनाथ सरकार, त्र्यंबक शंकर शेजवलकर, रियासतकार गोविंद सखाराम सरदेसाई, ना. सी. बेंद्रे यांनी केली आहे. रिसायतकार सरदेसाई यांनी शककर्ता शिवाजी या ग्रंथात शिवकालीन प्रशासनाचे वर्णन पौर्णिमेचे शीतल चांदणे या शब्दांत केले आहे. नरहर कुरुंदकर यांच्या मते, छत्रपती शिवाजी महाराज हे काळाच्या पुढे असलेले राज्यकर्ते होते. त्यांचा लोककल्याणकारी दृष्टिकोन हा सर्वसमावेशक होता. त्यामुळे जगातील तत्कालीन मध्ययुगीन राज्यकर्त्यांपेक्षा शिवाजीराजे हे सर्वश्रेष्ठ ठरतात.

# ‘टिपू’वरून तलवारी

इतिहास म्हणजे कधीकाळचे वर्तमान असते. आणि कोणतेही वर्तमान हे गुंतागुंतीचे असते. त्यातील प्रमुख व्यक्तींबाबत दोन नव्हे तर अनेक प्रकारची मते असू शकतात. टिपू सुलतानाच्या बाबतीतही हेच खरे आहे. टिपू हा कर्नाटक, केरळ, तमिळनाडूच्या प्रांतातला त्या काळचा राजा होता. तो शूर होता व ब्रिटिशांनाही त्याने टक्कर दिली. पण मुस्लिम धर्माचा अभिमानी म्हणून त्याने हिंदू धर्मीयांच्या हत्या केल्या व त्यांची देवळे वगैरे पाडली असेही पुरावे काही जण देतात. या हत्या कोणत्या संदर्भातील होत्या हे पाहायला पाहिजे असे दुसऱ्या बाजूचे लोक म्हणतात. टिपूनेच अनेक देवळांना अनुदाने दिली होती असे या दुसऱ्या गटाचे म्हणणे असते. पेशव्यांच्या सेनेने शृंगेरीच्या शंकराचार्यांचा मठ लुटला तेव्हा शंकराचार्यांनी टिपूकडे मदत मागितली होती असा इतिहासाचा ठळक दाखला आहे. याचाच अर्थ शंकराचार्यांना टिपूकडे जाण्यास अडचण वाटत नव्हती आणि टिपूलाही त्यांच्या धार्मिक स्थानाबाबत आदर होता. टिपू समजा एरवी जे काही करीत असेल त्याबाबत शंकराचार्य आणि हिंदू धर्माचे तेव्हाचे मुखंड यांना फार त्रास होता असे दिसत नाही. भाजपच्या मोदी राजवटीतील हिंदू मात्र या टिपूबाबत फारच हळवे झाले आहेत. टिपू हयात असताना त्याच्या विरोधात जितक्या तलवारी चालल्या नसतील तितक्या आता उपसल्या जातात आणि मोदी-भक्त जनता या तीनशे वर्षांपूर्वी मरून गेलेल्या टिपूवर तुटून पडतात. अलिकडेच काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केलेल्या विधानावरून पुन्हा टिपू सुलतानावरून महाराष्ट्रात लढाई झाली. मुळात वाद सुरू झाला मालेगावात. तिथे नव्या उपमहापौरांच्या दालनात भिंतीवर केवळ टिपू सुलतान यांचीच प्रतिमा लावलेली असल्याने विरोधकांनी आक्षेप घेतला. या भिंतींचे रंगकाम सुरु असल्याने बाकीच्या राष्ट्रपुरुषांचे फोटो काढून ठेवलेले आहेत व हा एकच फोटो कोणीतरी लावला असा तपशील या वादात पुढे आला. विरोधक आणि टीव्ही वाहिन्या नसत्या तर त्या मालेगावातल महापालिकेतल्या लोकांना देखील हा प्रकार कळला नसता. पण भाजपवाल्यांना वातावरण पेटते ठेवायला असले विषय़ हवेच असतात. त्यांना तो मिळाला.

## आणि आता दगडफेकही

या वादात सपकाळ यांनी पडण्याचे तसे कारण नव्हते. पण पत्रकारांनी याबाबत प्रश्न विचारला असता टिपू सुलतान हे शिवाजी महाराजांच्या तोडीचे राजे होते व त्यामुळे त्यांचा फोटो लावायला काहीच हरकत नाही असे मत त्यांनी व्यक्त केले. टिपूचा पराक्रम व कामगिरी याविषयी सपकाळ यांचे एक मत आहे. तसे मत बाळगणारे अनेक जण आहेत. त्याला इतिहासाचाही आधार आहे. भाजपचे त्याबाबतचे आकलन वेगळे असू शकते. पण त्यांना विषय भरकटवायला कोणताही मुद्दा पुरतो. त्यानुसार, सपकाळ यांनी शिवाजीमहाराजांचा अपमान केला असल्याचा ओरडा त्यांनी सुरु केला. राज्यभर सपकाळ यांच्या प्रतिमांना जोडे मारण्यात आले. सपकाळांची जीभ कापून आणली तर बक्षिस मिळेल असे एका भाजपच्या आमदाराने जाहीर केले. पुण्यात तर कहर झाला. तिथे भाजपचे महापौर व इतर नेते यांनी काँग्रेस भवनासमोर निषेध आंदोलन केले. त्याला काँग्रेस कार्यकर्त्यांनी प्रत्युत्तर दिले. त्यावेळी भाजपच्या जमावात चक्क दगडफेक करण्यात आली. त्यात काही पत्रकार व पोलिसही जखमी झाले. भाजपच्या हातात सध्या अमर्याद सत्ता आहे. पण शांतता राखण्यासाठी आणि कायद्याचे राज्य निर्माण करण्यासाठी जनतेने ही सत्ता त्यांना दिली आहे. प्रत्यक्षात यांचे नेते वाट्टेल ते बोलतात, दहशत पसरवतात व प्रसंगी हल्ल्याचे प्रयत्नही करतात. २०२४ मध्ये याच पुणे शहरात असीम सरोदे, निखिल वागळे इत्यादींच्या कारवर हल्ला झाला होता. त्याला भाजपचे शहराध्यक्ष धीरज घाटे यांची चिथावणी कारणीभूत होती असे म्हणतात. आताही काँग्रेस व सपकाळांचा निषेध करणे इथपर्यंत ठीक आहे. पण मुद्दाम काँग्रेस हाऊससमोर जाणे व नंतर दगडफेक होऊ देणे हा खुनशीपणा आहे. पुण्यासारख्या ठिकाणी जर असा प्रकार होत असेल तर ग्रामीण भागात काँग्रेसच्या द्वेषातून याहूनही भयंकर प्रकार घडू शकतात. गृह खाते ज्यांच्याकडे आहे ते देवेंद्र फडणवीस हे याकडे केवळ पाहत राहणार का हा सवाल आहे.

## द्वेषाचे राजकारण

शिवाजीराजे, पेशवे किंवा टिपू हे मध्ययुगीन कालखंडातले नेते होते. त्यांची वेगवेगळी वैशिष्ट्ये होती. आपापल्या प्रदेशात ते राजे असले तरी इतर प्रांतातल्या लोकांची त्यांच्याविषयीची मते वेगळी असू शकत होती. महाराजांची सुरत लुटली तेव्हा सामान्य लोकांना नव्हे तर केवळ धनिक व्यापाऱ्यांनाच लुटले होते. पण प्रांताभिमानी गुजराती लोकांना पूर्वी हा आपला अपमान वाटत असे. त्याच धर्तीवर टिपू सुलतानाबाबत कर्नाटकाच्या अनेक भागात मोठा आदर आहे. तो त्यांना मोठा योध्दा तसेच ब्रिटीश सत्तेला रोखणारा वीर वाटतो. त्याचमुळे १९५० च्या राज्यघटनेच्या पहिल्या अधिकृत प्रतीमध्ये राष्ट्रपुरुष म्हणून इतर अनेकांच्या यादीत टिपू सुलतान याचेही चित्र समाविष्ट आहे. त्यावर बाबासाहेब आंबेडकर, नेहरू व त्या काळातील सर्व नेत्यांच्या सह्या आहेत. हे लक्षात न घेता टिपू निव्वळ धर्मांध गुंड टोळीवाला असल्याप्रमाणे त्याचे चित्र उभे करणे हे भाजपचे कृत्य गुन्हेगारी स्वरुपाचे आहे. शिवाय सपकाळांच्या बोलण्याचे निमित्त करून गुंडागर्दीचे राजकारण करणे हे, जे ज्यांच्या अपमानाबद्दल बोलत आहेत त्या शिवाजीमहाराजांनाच कमीपणा आणणारे आहे. सपकाळांची जीभ कापून आणणाऱ्याला बक्षिस देऊ असे म्हणणे तर कुठल्या तरी पुरातन रानटी समाजाचे प्रतीक आहे. वाईट बाब अशी की, शिवाजीमहाराज, फुले यांच्याविषयी वाईट उद्गार काढणाऱ्या भगतसिंग कोश्यारी यांना याच भाजपवाल्यांनी परवा पद्मश्री किताब दिला. कोल्हापूरचे इतिहासकार इंद्रजित सावंत यांना फोनवर धमकी देणारा प्रशांत कोरटकर याला आजतागायत शिक्षा झालेली नाही. हा कोरटकर भाजपशीच जोडलेला आहे. फडणवीसांच्या सरकारातले नितेश राणे तर मुस्लिम समाजाबाबत सतत आगलावी वक्तव्ये करीत असतात. तेव्हाच्या मुस्लिम शासकांशी प्रत्यक्ष लढाई केली त्या शिवरायांनीही कोणत्याही प्रसंगात अशी वक्तव्ये केलेली दिसत नाहीत. पत्रांमध्येही असे काही पुरावे सापडत नाहीत. उलट लढाईच्या मोहिमेतही मुस्लिमांच्या मशिदीला धक्का लावू नये असे त्यांचे निर्देश होते. त्या काळातही आपली लढाई हिंदू विरुद्ध मुसलमान अशी नाही याचे भान त्या संयमी महापुरुषाला होते. पण त्याच्या नावाने क्षुद्र राजकारण करणाऱ्या भाजपवाल्यांना मात्र ते नाही. किंवा असले तरी ते वेड पांघरून पेडगावला जाऊ पाहत आहेत. याच भाजपच्या कळपातल्या शरद पोंक्षे यांनी परवा सांगलीमध्ये बोलताना वाट्टेल ते तारे तोडले. प्लंबिंग, दुरुस्ती इत्यादी कामांसाठी मुस्लिम कारागीरांना अजिबात थारा देऊ नका, चार पैसे जास्त गेले तरी चालेल, पण हिंदूंनाच काम द्या असे आवाहन त्यांनी केले. वास्तविक हे भाषण सरळ सरळ हिंदू व मुस्लिम यांच्यात द्वेष पसरवणारे आहे. पण यावर फडणवीस सरकारने कोणतीही कारवाई अजून तरी केलेली नाही.

**विचार**

# छत्रपतींची युद्धनीती

***छत्रपती शिवाजी महाराजांचे इतिहासातील स्थान अढळ आहे ते अतिशय असामान्य, कर्तृत्ववान आणि धोरणी राजे होते. त्यांचे लढाईचे नैपुण्य, दूरदृष्टी, शक्ती आणि युक्ती यांचा वापर जगप्रसिद्ध आहे. ते सर्वसामान्याचे कैवारी, कार्यकुशल, शासनकर्ते होते. त्यांचे नेतृत्व जागतिक दर्जाचे होते. ते जाणता राजा होते. त्यांनी सर्वसामान्यांची हृदये जिंकली होती. असामान्य बुद्धीमत्ता, युद्धशास्त्राचे कौशल्य, तत्कालीन परिस्थितीला साजेशी युद्धयंत्रणा त्यावेळी तयार केली होती. अत्याचाराने दबलेल्या जनतेच्या मनात त्यांनी स्वराज्याची ज्योत निर्माण केली होती. अशा राजाधिराज कर्तव्यदक्ष छत्रपती महाराजांचे इतिहासातील स्थान हे अमर आहे. छत्रपती शिवराय हे युगपुरुष होते.***



**ब्रिगेडियर हेमंत महाजन**

रयतेला परक्यांच्या आक्रमणातून मुक्त करुन स्वराज्याचे स्वप्न साकारणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांची आज जयंती. १७व्या शतकामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी शत्रुला नामोहरम करुन पराजित केले आणि त्यानंतर पुढची शेकडो वर्षे मराठ्यांनी ते साम्राज्य टिकवले. शिवाजी महाराजांच्या काळात शत्रूचे आव्हान बहुआयामी होते. एकच शत्रू अशी परिस्थिती नव्हती. तसेच शत्रू समतुल्य नव्हता. तो सैन्य, धनदौलत अशा सर्वच बाजूंनी सशक्त होता. मात्र अशा शत्रूला महाराजांनी अत्यंत चाणाक्षपणाने, मुत्सद्दीपणाने आणि युद्धनीतीचा अचूक वापर करत पराभूत केले आणि स्वराज्याची उभारणी केली. यामध्ये गनिमी काव्याचा वापर अत्यंत महत्त्वपूर्ण आणि प्रभावी ठरला. गनिमी काव्याच्या डावपेचात शत्रूच्या रसद पुरवणाऱ्या मार्गावर हल्ला केला जात असे, ज्यात स्थानिकांची मदत मिळत असे. कौटिल्याच्या युद्धशास्त्रानंतर जवळपास २ हजार वर्षांनंतर शिवाजी महाराज्यांच्या तालमीत तयार झालेल्या रामचंद्रपंत अमात्य यांनी युद्धनीतीवर एक प्रबंध तयार केला होता.

त्याचा आजही अभ्यास करता येईल. सह्याद्रीचा डोंगराळ परिसर हा गनिमीकाव्यासाठी योग्य होता, तर महाराष्ट्राची जनताच महाराजांचे सैनिक होती. स्वराज्यातील शेतकरी गरज पडली तर मदत करणारे सैनिक होते. अनेक शेतकरी युद्धाप्रसंगी हातातील नांगर सोडून तलवार घेत होते. त्यांचा प्रत्येक नागरिक हा प्रथम सैनिक आणि गुप्तहेर असा होता. छत्रपतींनी त्या वेळच्या मराठी जनतेचा अभ्यास करून त्यांच्यामध्ये असलेल्या गुणावर आपले सैन्य उभारले होते. शिवाजी महाराजांनी मोगल सैन्याचा आणि त्यांच्या युद्धाच्या डावपेचांचा चांगला अभ्यास केला होता. त्याला योग्य प्रत्युत्तर म्हणून आपले सैन्य, युद्धाचे डावपेच, गुप्तहेर जाळे व नेतृत्व तयार केले होते. शिवाजी महाराज हे पहिले राज्यकर्ते होते त्यांनी समुद्री किल्ल्यांच्या मदतीने समुद्रात पण स्वराज्य निर्माण केले होते. अतिशय महत्त्वाच्या ठिकाणी छत्रपतींनी अनेक किल्ले बांधले. त्यासाठी अनेक ठिकाणी तटबंदी, मनोरे, खंदक तयार केले ज्यावर हल्ला करणे शत्रुंना कठीण होते. गनिमीकाव्यासाठी देखील हे किल्ले वापरले जात. मोगल सैन्य त्यावेळचे सर्वात प्रचंड ताकदवान सैन्य होते. हे सैन्य म्हणजे हलतेफिरते शहरच होते. त्यांचा चालण्याचा वेग दिवसाला ३०-३५ किलोमीटर होता. ते भारतात पसरलेले होते. मात्र हे सैन्य भाडोत्री आणि वेगवेगळ्या विचारसरणीचे होते. त्यांचे जास्त सैन्य स्वतःचे रक्षण करण्यातच वापरले जायचे. नंतर मोगलशाही वाढली तसे ते सैन्य आळशी, अत्याचारी झाले. छत्रपतींनी आपल्या सैन्याचा पाया घोडदळावर उभा केला. त्यांच्याकडे घोडदळ ४५ हजार बारगीर,६० हजार शिलेदार एकूण १०५ हजार घोडदळ होते. त्यांच्या घोडदळाचा वेग हा मोगलांच्या वेगापेक्षा तिप्पटीने अधिक होता. छत्रपतींचे पायदळ हे चपळ आणि काटक होते. अंगरक्षक शूर मावळे होते. छत्रपतींचे सर्वच सैन्य चपळ होते. गुप्तहेर खात्याचे प्रमुख बहिज जाधव होते. त्यांचे खाते शत्रुविषयी माहिती देत असे. अफजल खानावरचा हल्ला, सुरतेवरचा हल्ला हा गुप्तहेर माहितीच्या आधारेच केला गेला. लढाईमध्ये सर्वात महत्त्वाचा घटक सैनिक, त्यांची निष्ठा आणि त्याचे शौर्य. लढाई सैनिकांमुळे जिंकली जाते. प्रत्येकच लढाईमध्ये सैनिक कसे लढतात यावर हरणे आणि जिंकण्याचा फैसला होतो. आपण सुद्धा आपल्या भागात देशाचे सैनिक बनु या. आज पण प्रत्येक नागरिकाने, आपआपल्या भागात एक सैनिक, गुप्तहेर बनून गाव व शहर सुरक्षित ठेवण्याची गरज आहे. महाराजांचे नौदल हे जवळपास २५ ते ३० हजार एवढ्या संख्येचे होते. त्यांच्याकडे १०० हून अधिक गलबते आणि इतर लढाऊ जहाजे होती. १७ व्या - १८व्या शतकाचा इतिहास आपण ज्यावेळेस वाचतो तेव्हा या इतिहासात छत्रपती शिवाजी महाराज, मराठे सोडता बाकी सगळीकडे आपल्या देशातील राज्यकर्त्यांचा पराभव होत होता. त्या पराभवी व्रुत्तीला परतवण्यात छत्रपतींनी मोठे काम केले. पानिपतच्या लढाईनंतरही मराठी साम्राज्य संपले नाही. त्यानंतर त्यांनी दिल्लीचा कारभार आपल्या हाती ठेवला आणि शेवटी ब्रिटिशांना मराठ्यांना हरवल्यावर भारतात सत्ता मिळवता आली. छत्रपती दूरदृष्टीचे राज्यकर्ते होते. शत्रुचा कमजोर बाजू ओळखून, एकावेळी एकाच शत्रुशी लढणे, शत्रु बेसावध असताना हल्ला करणे ही छत्रपतींचे वैशिष्ट्य होते. युद्धशास्त्राचे तज्ज्ञ होते, कधी शत्रुवर हल्ला करायचा, कधी त्यापासून रक्षण करणे हे त्यांना चांगले माहित होते. त्यांचे सैन्य सह्याद्रीच्या कड्याकपारीतून युद्धाच्या वेळी एकत्र येत असे. किल्ल्यांचा वापर सुरक्षित स्थान म्हणून केला जात असे. मोगलांवरती एकाच वेळी दोन किंवा तीन दिशेने हल्ले व्हायचे. शत्रु सैन्याच्या हालचालींवर आणि रसद पुरवणाऱ्या मार्गावर गनिमी काव्याने हल्ला केला जायचा. मराठी सैनिक आजूबाजूच्या भागावर आपली गुजराण करायचे. त्यात स्थानिक नागरिकांची मदत व्हायची.ब्रिटिश, पोर्तुगीज इतिहासकारांनी छत्रपतींची तुलना ज्युलिअस सीझर, अलेक्झांडर, हनीबल या महायोद्ध्यांशी केली आहे. आज सुद्धा अमेरिकन सैन्य भारताची युद्धकला शिकण्यासाठी भारतीय लष्कराकडे येतात. भारतीय सैन्याची मराठा रेजिमेंट छत्रपतींचा वारसा पुढे चालवते. आज हिमालय, काश्मिर या डोंगराळ भागात युद्धे/दहशतवादी विरोधी अभियाने होतात. त्यावेळचे आपले किल्ले आणि आज पाकिस्तान, चीन सीमेवरील सैन्याची पिकेट यांची तुलना केली जाऊ शकते. जसा शाहिस्तेखानावर छत्रपतींनी अचानक हल्ला केला होता तशाच प्रकारचा सर्जिकल स्ट्राईक आपण पाकिस्तानमध्ये केला होता. पावनखींड जशी बाजीप्रभूंनी लढवली तसाच पराक्रम भारतीय सैन्याने काश्मिरमधील हाजीपीर खिंडीत गाजवला. सिंहगडावरचा हल्ला आणी कारगीलमध्ये टायगर हिलवर हल्ला याची तुलना होउ शकते. पुरंदर किल्ल्याने शत्रुपासून मराठ्यांचे रक्षण केले, तशीच लढाई १९७१ मध्ये राजस्थानमध्ये लोंगेवालामध्ये झाली होती. त्याचे चित्रण बॉर्डर चित्रपटात झाले होते.शिवाजी महाराजांनी आपल्या काळात ३०० ते ३५० किल्ले बांधले. त्यांनी सर्वात महत्त्वाचे किल्ले बांधले ते होते नरदुर्ग. किल्ल्यासारखी बुलंद, शूर, निष्ठावान, पराक्रमी माणसे. छत्रपती शिवाजी महाराजांचे अनुयायी नेताजी पालकर, तानाजी मालुसरे, बाजीप्रभु देशपांडे, येसाजी कंक, मुरारबाजी, प्रतापराव गुर्जर, हंबीरराव मोहिते असे सर्वच प्रतिशिवाजी होते. त्यांचे इतिहासातील स्थान अढळ आहे. अशा कर्तव्यदक्ष, स्वराज्यासाठी जीवाची बाजी लावणाऱ्या, सतर्क-सजग मावळ्यांची आज देशाला गरज आहे. थोडक्यात छत्रपती शिवाजी महाराजांचे इतिहासातील स्थान अढळ आहे ते अतिशय असामान्य, कर्तृत्ववान आणि धोरणी राजे होते. त्यांचे लढाईचे नैपुण्य, दूरदृष्टी, शक्ती आणि युक्ती यांचा वापर जगप्रसिद्ध आहे. ते सर्वसामान्याचे कैवारी, कार्यकुशल, शासनकर्ते होते. त्यांचे नेतृत्व जागतिक दर्जाचे होते. ते जाणता राजा होते. त्यांनी सर्वसामान्यांची हृदये जिंकली होती. असामान्य बुद्धीमत्ता, युद्धशास्त्राचे कौशल्य, तत्कालीन परिस्थितीला साजेशी युद्धयंत्रणा त्यावेळी तयार केली होती. अत्याचाराने दबलेल्या जनतेच्या मनात त्यांनी स्वराज्याची ज्योत निर्माण केली होती. अशा राजाधिराज कर्तव्यदक्ष छत्रपती महाराजांचे इतिहासातील स्थान हे अमर आहे. छत्रपती शिवराय हे युगपुरुष होते. आज सुरक्षेची अनेक आव्हाने देशासमोर आहेत. अशा वेळी छत्रपतींच्या रणनितीचा वापर करुन त्याला तोंड देऊ शकतो. इतिहास हा गतकाळाचा साक्षीदार आणि भविष्याचा वाटाड्या असतो. छत्रपतींचे काही गुण जरी आपल्या अंगात आले तरीही देश अधिक सुरक्षित करु शकतो. मराठा रेजिमेंटचे स्फुर्तिगीत म्हणजे ‘मर्द आम्ही मराठे खरे, दुश्मनांना भरे कापरे। देश रक्षाया, धर्म ताराया, कोण झुंजीत मागे सरेहा आपल्याला सदैव आपल्या कर्तव्याची जाणीव देतो. सगळ्या देशाने एकत्र येऊन देशासमोर असलेल्या आव्हांनांना तोंड देऊ या. छत्रपती शिवाजी महाराज की जय.

# शाळांच्या दुरुस्तीची गरज

**प्रमोद जाधव**



ग्रामीण भागातील मुले शिकली पाहिजे, त्यांचा सर्वांगिण विकास झाला पाहिजे यासाठी जिल्हा परिषदेच्या शाळेच्या माध्यमातून शिक्षण देण्याचा प्रयत्न केला जातो. वेगवेगळे उपक्रम राबवून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्याचा प्रयत्न केला जातो. शिक्षणाबरोबच दप्तराविना शाळा असे अनेक उपक्रम राबवून शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्याचा प्रयत्न केला जातो. परंतु जिल्ह्यातील अनेक शाळा आजही दूरुस्तीसह अन्य सुविधांपासून वंचित आहेत. शासनाकडून मिळणारा संयुक्त शाळा अनुदानही वेळेत मिळत नाही. त्यामुळे शाळांच्या दुरुस्तीसह इतर देखभाल खर्च करणे कठीण होत आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या शाळांच्या दूरुस्तीची गरज असून प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे.

जिल्हा परिषदेच्या शाळेतून शिक्षण घेऊन अनेक विद्यार्थी घडले आहे. राजकीय क्षेत्रासह सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रासह शासकीय सेवतही त्यांचे मोलाचे योगदान आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या शाळांचे महत्व आहे. रायगड जिल्हा परिषदेत शाळेत आम्ही शिक्षण घेतल्याचे अनेकजण अभिमानाने सांगतात. तळागाळातील घटकातील मुले, मुलींना शिक्षणाची दारे जिल्हा परिषदेच्या शाळेतूनच उघडली आहे. जिल्हा परिषदेच्या अडीच हजारहून अधिक शाळा आहेत. या शाळांमध्ये पुर्वी एक लाखहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत होते. जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांची पटसंख्या गेल्या काही वर्षात कमी झाला. पटसंख्ये अभावी अनेक शाळा बंद करण्यात आल्या आहेत. गावात शिक्षण घेणाऱ्या मुलांना दुसऱ्या गावातील शाळेत जाऊन शिक्षण घ्यावे लागत आहे. पटसंख्या टीकून राहवी, म्हणून जिल्हा परिषदेच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविले आहेत. शाळा व्यवस्थापन समितीसह माजी विद्यार्थी संघटना तसेच वेगवेगळ्या क्षेत्रातील मंडळींची मदत घेऊन पटसंख्या वाढविण्याचा प्रयत्न केला.

जिल्हा परिषद शाळेमध्ये विद्यार्थी संख्या वाढविण्याबरोबरच टीकून ठेवण्यासाठी जिल्हा परिषद शिक्षण विभागमार्फत खेळता खेळता शिक्षण, सुवर्ण हस्ताक्षर स्पर्धा, शाळा बाह्य विद्यार्थी, एक दिवस दप्तराविना अशा अनेक प्रकारचे उपक्रम राबण्यात आले. या उपक्रमातून पटसंख्या वाढविण्याचा प्रयत्न केला. ही कामगिरी जिल्हा परिषदेची कौतूकास्पद असली, तरी जिल्ह्यातील नादुरुस्त शाळांच्या दुरुस्तीसाठी निधी वेळेवर मिळत नाही, ही मोठी चिंतेची बाब आहे.

जिल्हा परिषद शाळेच्या किरकोळ दुरुस्तीसह स्वच्छता, स्टेशनरीसाठी सरकारकडून जिल्हा परिषदेमार्फत संयुक्त शाळा अनुदान म्हणून निधी वितरीत केला जातो. त्यामध्ये शालेय साहित्य, शाळेतील किरकोळ देखभाल दुरुस्ती आदी कामांचा समावेश आहे. शाळेच्या पटसंख्येनुसार १० हजार पासून ७५ हजार रुपयांचा निधी दिला जातो. जिल्ह्यात एक ते ३० पटसंख्या असलेल्या शाळा एक हजार ६८४, एक ते १०० पटसंख्या असलेल्या ७६३ शाळा, १०१ ते २५० पटसंख्या असलेल्या १८२ शाळा,२५१ ते एक हजार पटसंख्या असलेल्या २५ शाळा आहेत. यातील दोन हजार ४५६ शाळांची दुरुस्ती करण्यासाठी जिल्हा परिषद शिक्षण विभागाने शासनाकडे साडेचार कोटी रुपयांची मागणी केली होती. मात्र शासनाकडून फक्त सव्वा दोन कोटी रुपयांचा निधी दिला.अपूऱ्या निधीचे वितरण करताना, तारेवरची कसरत करण्याची वेळ जिल्हा परिषदेवर आली आहे. त्यामुळे शाळांची किरकोळ दुरुस्तीबरोबरच इतर खर्च करण्यास अडथळे निर्माण झाल्याची चर्चा जोरात सुरु आहे. संयुक्त शाळा अनुदानअंतर्गत हा निधी शाळांना पटसंख्येनुसार वर्ग करण्यात आला. परंतू अपूरा निधी शाळांना पुर्णपणे वर्ग करणे कठीण झाले.शासनाकडून अजून सव्वा दोन कोटी रुपयांचा निधी येणे बाकी आहे.

या निधीची प्रतिक्षा लागून राहिली आहे. निधी अभावी हजारो शाळांची दुरुस्ती रखडली आहे. शासनाच्या उदासनीतेचा फटका शिक्षण विभागाला बसत आहे. जिल्हा परिषद शाळेतील किरकोळ स्टेशनरी खर्चासह देखभाल दुरुस्तीसाठी संयुक्त शाळा अनुदानामार्फत निधी शाळांना दिला जातो. जो निधी शासनाकडून मिळतो. तो तुटपुंजा स्वरुपाचा आहे. तरीदेखील तो वेळेवर दिला जात नाही. जिल्हा परिषद शाळा टिकून राहण्यासाठी उपक्रमांसह शाळांच्या दुरुस्तीसाठी निधी मोठ्या प्रमाणात देण्यावर भर दिल्यास जिल्हा परिषद शाळेचे महत्व अधिक गतीमान होण्यास मदत होईल याकडे शासनाने लक्ष देणे गरजेचे आहे.

**लोकसंसद**

## आत्मसन्मान नसलेला देश

भारताने क्रिकेट सामन्यात पाकिस्तानला पुन्हा एकदा पराभूत केले. गेल्या दशकातील भारताने आत्म सन्मानाने केलेली प्रगती पाहून पाकिस्तान कोणत्याही क्षेत्रात भारताशी स्पर्धा करू शकत नाही याचे कारण म्हणजे विकास किंवा आत्मसन्मान या गोष्टी पाकने कधीच केल्या नाहीत फक्त मोठ मोठ्या वलग्ना केल्या. पाकचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांनी पाकच्या संसदेत अमेरिकेने पाकचा वापर टॉयलेट पेपर सारखा करून त्याला फेकून दिला आहे असे विधान केले. पाकिस्तान आणि अमेरिका यांचे नाते कधीही समान स्तरावरचे नव्हते. शीतयुद्धाच्या काळात सोव्हिएत युनियनला रोखण्यासाठी अमेरिकेला दक्षिण आशियात एक तळ हवा होता आणि पाकने आपली जागा आनंदाने दिली. १९८० च्या दशकात अफगाणिस्तान मध्ये रशिया विरुद्ध मुजाहिद्दीन म्हणजेच आतंकवादी उभे करण्यासाठी पाकिस्तानचा वापर प्रॉक्सी म्हणून केला गेला या बदल्यात पाकला डॉलर्सची रसद मिळाली होती.अमेरिकेला केलेल्या साह्यापोटी पाकला अब्जावादी डॉलर्सचे सैनिकी सहाय्य मिळाले असले तरी त्या बदल्यात पाक ने स्वतःच्या भूमीवर आतंकवादाचे पीक पेरले तोच आतंकवाद तहरीक ए तालिबान पाकिस्तान( टी टी पी )च्या रूपाने त्याच्याच गळ्याला नख लावत आहे. सामाजिक वीण विस्कटली असून अर्थव्यवस्था दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर आहे. आज पाक चीनच्या जवळ आहे पण तिथेही सीपेक च्या नावाखाली पाक कर्जाच्या खाईत ढकलला जात आहे. सीपेक एक प्रकारचे कर्ज जाळे आहे. पाकिस्तानची सर्वात मोठी चूक म्हणजे त्यांनी स्वतःची अर्थव्यवस्था भक्कम करण्याऐवजी स्वतःचे भौगोलिक क्षेत्र विकायला काढले याच कारणामुळे अमेरिका चीन साठी पाक टॉयलेट पेपर झाला आहे. या उलट गेल्या दशकात भारताने स्वतःचे सामाजिक महत्त्व इतके वाढवले आहे की आता अमेरिकेला पाकची आवश्यकता उरलेली नाही.

**– लीना मकरंद गाडगीळ, पनवेल**

**दिनविशेष**

# पुण्यवंत, सामर्थ्यवंत! नीतिवंत, जाणता राजा!

शिवरायांचा जन्म शिवनेरी किल्ल्यावर १९ फेब्रुवारी १६३० रोजी झाला. खरं तर त्यांच्या जन्म तारखेबद्दल बरेच वाद होते यावर महाराष्ट्र सरकारने तोडगा काढत २००१ या वर्षी १९ फेब्रुवारी ही जयंती शिवरायांची जन्मतारीख निश्चित केली आणि तेव्हापासून १९ फेब्रुवारीला शिवजयंती देशभरात उत्साहात साजरी केली जाते.

छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म १९ फेब्रुवारी १६३० रोजी शिवनेरी किल्ल्यावर झाला. त्यांच्या आई जिजाबाई आणि वडील शहाजीराजे यांनी त्यांना लहानपणापासूनच धर्म, नैतिकता, शौर्य आणि स्वराज्याची स्वप्ने दिली. वयाच्या अवघ्या १६व्या वर्षी त्यांनी तोरणा किल्ला जिंकून स्वराज्याच्या पायाभरणीला सुरुवात केली. मुघल, आदिलशाही, निजामशाही अशा बलाढ्य सत्तांविरुद्ध त्यांनी गनिमी काव्याची युद्धनीती अवलंबली आणि मराठ्यांचे स्वतंत्र राज्य उभे केले. शिवराय फक्त योद्धे नव्हते, ते एक दूरदृष्टी असलेले प्रशासक, कुशल राजकारणी आणि रयतेचे रक्षक होते. त्यांनी ‘अष्टप्रधान मंडळ’ स्थापन केले, न्यायव्यवस्था मजबूत केली, शेतकऱ्यांना संरक्षण दिले आणि स्त्रियांचा सन्मान केला. त्यांच्या राज्यात धर्म, जातीभेद नसता सर्वांना समान न्याय मिळत असे. अफझल खान, शायिस्तेखान, दिलेर खान अशा शत्रूंना त्यांनी धूळ चारली आणि ‘हिंदवी स्वराज्य’ हे स्वप्न साकार केले. आजच्या काळात शिवरायांचे विचार अजूनही प्रासंगिक आहेत. ते शिकवतात की: स्वाभिमान हा कधीही सोडू नये. एकता आणि संघटन यशाची गुरुकिल्ली आहे. न्याय आणि धैर्य नेहमी जिंकतात. आणि रयतेची सेवा हीच खरी राजसेवा आहे. महाराष्ट्राचेच नव्हे तर संपूर्ण भारताचे आराध्यदैवत असलेले छत्रपती शिवाजी महाराज यांची आज ३९६वी जयंती आहे. रयतेचा राजा कसा असावा याचा पायंडा छत्रपती शिवाजी महाराजांनी खूप उत्तमपणे रचला. हिंदवी स्वराज्याचे स्वप्न प्रत्यक्षात साकारून त्यांनी महाराष्ट्र घडवला. याच आपल्या राज्याचा आज जन्मदिवस.

छत्रपतींचे नाव डोळ्यासमोर आले एक वेगळीच प्रतिमा तयार होते ज्या राजाने त्याचे संपूर्ण आयुष्य जनतेसाठी रयतेसाठी वाहले त्या रयतेच्या राजाचे कौतुक करावे तितके कमी आहे. शिवरायांचा हिंदवी स्वराज्य निर्मितीचा ध्यास असो, महाराष्ट्र घडवण्याचा त्यांचे योगदान असो, मराठा साम्राज्याचा इतिहास असो, महाराजांचे कार्य आणि त्यांचे शौर्य सदैव प्रेरणादायी आहे. महाराष्ट्रावर गुलामगिरीचे सावट असताना आणि अन्यायाची पराकाष्ठा गाठलेली असताना छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म झाला. अवघ्या मराठा मुलखासाठी आजचा दिवस हा सुवर्णक्षण मानला जातो. दिल्लीच्या तखदापुढे महाराष्ट्राचा कणा कायम ताठ ठेवणारे छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य निर्मिती केली. युद्ध कौशल्य, रणनीती, दूरदृष्टीने त्यांनी हे रयतेचे राज्य निर्माण केले. छत्रपती शिवाजीराजांचे मानवतावादी तत्त्वज्ञान. आदिलशाही, निजामशाही आणि मुघल सत्ता किंवा स्वराज्यावर आलेल्या प्रत्येक संकटाला अत्यंत धैर्याने छत्रपती शिवाजी महाराजानी सामना केला आणि ते यशस्वी ठरले. छत्रपती शिवाजी महाराजांची गाथा अजरामर आहे त्यांनी त्यांचे संपूर्ण आयुष्य रयतेच्या सुखासाठी स्वराज्याच्या स्वप्नासाठी वाहले. शेवटच्या क्षणापर्यंत ते लढले. अखेर रायगडावर ३ एप्रिल १६८० रोजी महाराजांनी अखेरचा श्वास घेतला. एक दक्ष राजा रयतेला पोरका करून गेला. मात्र महाराजांचं कर्तृत्व पराक्रम अनंत काळासाठी अजरामर आहे, असे म्हणतात.

# बनावट औषधविक्रीचा पर्दाफाश

## ● अनेकांच्या जीवाशी खेळ; दोन वितरकांना अटक



| मुंबई | प्रतिनिधी |

उच्च रक्तदाबावर अत्यंत गुणकारी मानल्या जाणाऱ्या 'टेलमा एएम' या औषधाच्या बनावट गोळ्यांची विक्री करणाऱ्या रॅकेटचा डोंबिवलीच्या मनपाडा पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या प्रकरणी पोलिसांनी डोंबिवली आणि मुंबईतील दोन मोठ्या औषध वितरकांना अटक केली असून त्यांच्याकडून बनावट औषधांचा मोठा साठा जप्त केला आहे. प्रसिद्ध कंपनीच्या औषधाच्या नावे चक्क बनावट गोळ्या विकून रुग्णांच्या जिवाशी खेळ खेळला जात असल्याचे या कारवाईतून स्पष्ट झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, डोंबिवली आणि मुंबईत नामांकित कंपनीच्या नावे बनावट औषधविक्री चालू असल्याची माहिती मनपाडा पोलिसांनी गुप्त माहितीच्या आधारे मिळाली होती. या माहितीनुसार पोलिसांनी ही मोठी कारवाई केली आहे. डोंबिवलीतील श्री राम फार्माचा मालक पंकज उपाध्याये आणि मुंबईतील वितरक विवेक राय या दोघांना पोलिसांनी अटक केली आहे. आरोपींकडून नामांकित कंपनीचे हुबेहूब लेबल आणि पॅकिंग असलेल्या बनावट गोळ्या जप्त करण्यात आल्या आहेत. या औषधांमुळे रुग्णांना हृदयविकाराचा धोका असल्याची भीती अन्न व औषध प्रशासनाने व्यक्त केली आहे. प्रसिद्ध कंपनीच्या औषधाच्या नावे चक्क बनावट गोळ्या विकून रुग्णांच्या जिवाशी खेळ खेळला जात असल्याचे यातून स्पष्ट झाले आहे.

### रुग्णाला गंभीर धोका

अन्न व औषध प्रशासनाने या बनावट औषधांची तपासणी केल्यानंतर एक खळबळजनक बाब समोर आली आहे. या बनावट गोळ्या शरीरात गेल्यानंतर वेळेवर विरघळत नाहीत. त्या विरघळण्यास अत्यंत उशीर लागतो. रक्तदाब नियंत्रित करण्यासाठी रुग्णाला तातडीने औषधाची गरज असते. मात्र, हे औषध वेळेवर परिणाम करत नसल्याने रुग्णाला हृदयविकाराचा झटका किंवा ब्रेन स्ट्रोक येण्याचा गंभीर धोका निर्माण होऊ शकतो.

### बिहार कनेक्शन उघड

मनपाडा पोलिसांनी केलेल्या प्राथमिक तपासात या रॅकेटचे धागेदोरे बिहार राज्यापर्यंत पोहोचले असल्याचे समोर आले आहे. ही बनावट औषधे नेमकी कुठे तयार होतात आणि महाराष्ट्रात ती इतर किती शहरांमध्ये पोहोचली आहेत, याचा शोध आता पोलीस घेत आहेत. या रॅकेटमध्ये अजून काही बड्या वितरकांचा हात असल्याची शक्यताही वर्तवली जात आहे.

---

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**१९ फेब्रुवारी**

१) श्रीम.विनोदिनी विलास तेंडूलकर,
ता.अलिबाग, जि.रायगड
दि.१९-२-१९४८

२)श्री.शिवदास विश्वनाथ मेस्त्री
चेंढरे, अलिबाग
दि.१९-२-१९६१

३)श्रीम.मनश्री रोहिदास वासकर
चेंढरे, अलिबाग
दि.१९-२-१९५५

---

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे. **संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**सौ. प्रतीक्षा प्रकाश म्हात्रे, स्मरणार्थ, नागाव, खारगल्ली अलिबाग**

**सुशीला बाई, स्मरणार्थ**

**कै. पुरषोत्तम रामचंद्र भातखंडे, स्मरणार्थ, महाड**

**१९७६ एस.एस.सी बॅच इंडस्ट्रील हायस्कूल, अलिबाग**

---

## घरफोडीत दागिन्यांसह रोकड लंपास

**डोंबिवली :** डोंबिवली पूर्वेकडील देसलेपाडा भागातील आर.पी. रेसीडेन्सी गृहसंकुलात राहणारे अशिष रामधनी यादव हे आपल्या कुटुंबासह मूळ गावी उत्तरप्रदेश येथे लग्न समारंभासाठी गेले होते. याचा फायदा घेत चोरांनी घरातील सुमारे ५० हजार रुपयांची रोकड तसेच अंदाजे ४० तोळे सोन्याचे दागिने लंपास केल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी अज्ञात चोरट्यावर मानपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अज्ञात चोरांचा शोध घेत आहेत.

---



## 'वाहतूक सुरळीत ठेवा'

| आगरदांडा | प्रतिनिधी |

मुरुड शहरात दिवसेंदिवस वाहतूक कोंडीची समस्या वाढत आहे. ही कोंडी सुरळीत करण्यासाठी मुरुड पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे व रायगड जिल्हा वाहतूक शाखा पोलीस निरीक्षक अभिजीत भुजबळ यांनी शहरामधील मुख्य बाजारपेठेतील सर्व दुकानदारांना पत्रक काढून आपल्या दुकानात माल उतरविणाऱ्या वाहनांमुळे वाहतूक कोंडी होत आहे. तरी वाहनांमुळे निर्माण होणाऱ्या गंभीर वाहतूक कोंडीबाबत दुकानदारांनी योग्य दक्षता घेऊन वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांनी केले.

बाजारपेठेतील चालू दुकानांमध्ये माल पुरवठा करणारी वाहने सार्वजनिक रस्त्यावर वाहतूकीस अडथळा निर्माण होईल अशा ठिकाणी उभी करून माल चढविणे-उतरविणे करण्यात येत आहे. यामुळे सतत वाहतूक कोंडी होऊन नागरिकांना होणारा त्रास तसेच आपत्कालीन वाहनांच्या हालचालींना अडथळा निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले आहे. याबाबत तोंडी सुचना देऊनही हा प्रकार सुरुच असल्याने ही बाब गंभीर व कायद्याचे उल्लंघन करणारी आहे. तरी अंतिम सुचना असून आपण कोणत्याही परिस्थितीत सार्वजनिक रस्त्यावर रहदारीच्या ठिकाणी माल उतरविण्यासाठी वाहने उभी करु नयेत. तुम्हाला मला उतरविण्यासाठी नियोजित जागेत व अत्यल्प वेळेत पूर्ण करावी. गर्दीच्या वेळेत माल चढविणे, उतरविणे पुर्णतः बंद ठेवावे. या सुचनांचे पालन न केल्यास दंडात्मक व कायदेशीर कारवाई, वाहन जप्ती व दंड आकारण्यात येईल, यांची गंभीर नोंद घ्यावी.

वाहतूक सुरळीत ठेवणे हा सार्वजनिक हिताचा विषय असून यामध्ये कोणतीही तडजोड केली जाणार नाही. तरी दुकानदारांनी सहकार्य करावे, असे आवाहन रायगड जिल्हा वाहतूक शाखा पोलीस निरीक्षक अभिजित भुजबळ यांनी लेखी पत्राद्वारे करण्यात आले आहे.

---

## कारमध्ये आढळला तरुणाचा मृतदेह

**ठाणे :** उल्हासनगरमधील गोल मैदान परिसरात, कारच्या ड्रायव्हिंग सीटवर एका पुरूषाचा मृतदेह बेशुद्ध अवस्थेत आढळून आला. याबाबत माहिती मिळताच उल्हासनगर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेत तपास सुरू केला. सध्या कारच्या नोंदणीच्या आधारे तपास सुरू आहे. तसेच, गाडीतून एक मोबाईल फोनही जप्त करण्यात आला आहे. परंतु तो बंद असल्याने तो लगेच ओळखता आला नाही. सुरुवातीच्या तपासात मृत्यूचे कारण हृदयविकाराचा झटका असल्याचे मानले जात आहे. दरम्यान पोलिसांनी पुढील तपास सुरू केला आहे.

---



## खांदा वसाहत येथे परिवहन सेवा ठप्प

| पनवेल | प्रतिनिधी |

सायन पनवेल महामार्गावरील खांदा वसाहतच्या मुख्य रस्त्यावर बुधवारी (दि.१८) सकाळी अचानक परिवहन सेवा बंद पडल्याने चाकरमानींचे मोठे हाल झाले. कामावर जाणाऱ्या नागरिकांना बराच वेळ थांबावे लागले. बससेवा ठप्प झाल्याने रस्त्यावर खासगी वाहनांची गर्दी वाढून मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली. दररोज हजारो प्रवासी या मार्गावरून प्रवास करतात; मात्र प्रशासनाचे पुरेसे लक्ष नसल्याने अशी समस्या वारंवार उद्भवत असल्याची नागरिकांची तक्रार आहे. शालेय विद्यार्थी, महिला व ज्येष्ठ नागरिकांनाही गैरसोयीचा सामना करावा लागला. परिवहन व्यवस्थेतील ढिसाळपणाचा फटका सामान्य चाकरमानींना बसत असून सेवा सुरळीत कधी होणार, असा प्रश्न संतप्त नागरिक उपस्थित करत आहेत.

---

## क्रांतीज्योतीचे नागोठण्यात उत्स्फूर्त स्वागत

| नागोठणे | प्रतिनिधी |

देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात महत्त्वाची भूमिका बजाविणारे आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांच्या १४३ व्या पुण्यतिथीच्या निमित्ताने शिरढोण (ता. पनवेल) येथील क्रांतीज्योत मित्र मंडळ यांच्या वतीने सालाबादप्रमाणे आयोजित केलेल्या क्रांतीज्योतीचे नागोठण्यातील हायवे नाका येथे मंगळवारी (दि.१७) सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास आगमन झाले. त्यावेळी या क्रांतीज्योतीचे भव्य स्वागत करण्यात आले. त्यानंतर नागोठण्यातील छ. शिवाजी महाराज चौकात असलेल्या शिवस्मारकाजवळ क्रांतीज्योतीचे



आगमन होताच येथेही क्रांतीज्योतीचे उस्फुर्त स्वागत करण्यात आले. त्यानंतर ही क्रांतीज्योत शिरढोणकडे रवाना झाली. क्रांतीज्योतीच्या या स्वागत समारंभास नागोठणे हायवे नाका व छ. शिवाजी महाराज चौक या ठिकाणी नागोठणे पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सचिन कुलकर्णी, पो. ह. विनोद पाटील, पवन पोलसानी, सुधाकर जवके, राष्ट्रवादी काँग्रेसचे विभागीय अध्यक्ष संतोषभाई कोळी, कार्याध्यक्ष सचिनशेठ कळसकर, विजय धामणे, नागोठणे ग्रामपंचायतीचे उपसरपंच अखलाक पानसरे, ग्रामपंचायत सदस्य सचिन ठोंबरे, मुकेश दोशी, कुलदीप शहासने, शिवराज पोलसानी, डॉ. सौरभ पाटील, हरेश शिर्के, मोहित अग्रवाल, आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील शिक्षक व विद्यार्थ्यांसह नागरिक यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या क्रांतीज्योतीचे हे ४० वे वर्ष असून सुधागड तालुक्यातील विळे येथील कालकाई माता मंदिरातून ज्योत प्रज्वलित करून या क्रांतीज्योतीची सुरुवात करण्यात आली होती.

---

## बागायतदारांना नुकसान भरपाई द्यावी

### ● शौकत मुकादम यांची मागणी

| रत्नागिरी | प्रतिनिधी |

कोकणातील भात शेतीचे प्रचंड नुकसान होऊनही शासनाकडून पंचनामे करून अद्याप एकही रुपया नुकसान भरपाई शेतकऱ्यांना मिळालेला नाही. हा कोकणातील शेतकऱ्यांवर झालेला मोठा अन्याय असून, आता बागायतदारांवर दुसरे संकट ओढावले आहे, अशी तीव्र प्रतिक्रिया माजी सभापती व पर्यावरणप्रेमी शौकत मुकादम यांनी व्यक्त केली आहे. दूषित हवामानामुळे कोकणातील हापूस आंबा, काजू तसेच परस बागांमधील आंब्यांच्या झाडांवरील मोहर मोठ्या प्रमाणात करपून गेला आहे. पुढे ते म्हणाले की, कोकणामध्ये भात शेती व हापूस आंबा ही दोन प्रमुख पिके असून, येथील बहुतांश शेतकरी व बागायतदारांचा उदरनिर्वाह याच पिकांवर अवलंबून असतो. मात्र हापूस व काजूवरील करप्यामुळे शेतकऱ्यांवर आर्थिक संकट कोसळले आहे. त्यामुळे कृषी विभागामार्फत तात्काळ पंचनामे करून शासनाने कोकणातील आंबा व काजू बागायतदारांना नुकसान भरपाई जाहीर करावी, अशी मागणी मुकादम यांनी शासनाकडे केली आहे.

---

## समाजबंधातून महिलांच्या आरोग्याला साथ

| पाली/बेणसे | प्रतिनिधी |

समाजातील गरजू व्यक्तींना मदत करण्यासाठी आणि आदिवासी महिलांच्या आरोग्यासाठी समाजबंध संस्था व शेठ जे. एन. पालीवाला महाविद्यालय (पाली-सुधागड) यांच्या संयुक्त विद्यमाने एका स्तुत्य उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना कक्षातर्फे सोमवार दि.१६ ते शनिवार दि.२१ या कालावधीत जुने कपडे संकलन शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

या शिबिराद्वारे गोळा करण्यात आलेल्या कपड्यांचा




वापर समाजबंध संस्थेच्या कापडी सॅनिटरी पॅडनिर्मिती प्रकल्पासाठी केला जाणार आहे. सुती कपडे, होजिअरी आणि जीन्सपासून हे सॅनिटरी पॅड्स तयार केले जातात. तयार केलेले हे पॅड्स आदिवासी महिलांमध्ये मासिक पाळीबाबत जनजागृती करून त्यांना विनामूल्य वाटले जातात. तसेच, जे कपडे वापरण्यायोग्य असतील, ते थेट गरजूंपर्यंत पोहोचवले जाणार आहेत.

आयोजकांनी नागरिकांना आवाहन केले आहे की,

### महाविद्यालयात जुने कपडे संकलन शिबीर

आपल्याकडील जुने परंतु स्वच्छ आणि वापरण्यायोग्य कपडे, साड्या, तसेच जीन्स शेठ जे. एन. पालीवाला महाविद्यालय येथील संकलन केंद्रावर आणून द्यावेत. कपड्यांव्यतिरिक्त इतर शैक्षणिक साहित्याचीही गरज असून नागरिक खालील वस्तूही दान करू शकतात. ज्यामध्ये शैक्षणिक साहित्य (वह्या, पेन इ.), पेपर रद्दी यांचा समावेश आहे.

अधिक माहितीसाठी डॉ. सर्जेराव पाटील, डॉ. अनिल झेंडे आणि लिंताज ऊके राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी यांच्याकडे सपर्क साधावा.

---

**अभ्यासकांसह संशोधकांची उपस्थिती** | **पक्षी संवर्धनाला मिळणार नवी दिशा**

# रत्नागिरीत रंगणार पक्षीमित्र संमेलन

| रत्नागिरी | प्रतिनिधी |

रत्नागिरी जिल्ह्याच्या समृद्ध निसर्गवैभवात भर घालणाऱ्या पक्षीविश्वाला जागतिक स्तरावर ओळख मिळवून देण्यासाठी रत्नागिरी जिल्हा नियोजन समिती आणि वनविभागाच्या संयुक्त विद्यमाने २२ व २३ फेब्रुवारी रोजी भव्य पक्षीमित्र संमेलन आयोजित करण्यात आले आहे. या संमेलनामुळे कोकणातील विविध प्रजातींच्या पक्ष्यांच्या संवर्धनाला आणि अभ्यासाला नवी दिशा मिळणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी मनुज जिंदल यांनी दिली.

हॉटेल कोहिनूर येथे दि. २२ फेब्रुवारीला सकाळी १० वाजता उपस्थितांची नोंदणी होणार आहे. त्यानंतर ११ वाजता पक्षी संमेलनाचे उद्घाटन होणार आहे. यावेळी जंगलाचे शेतकरी याविषयावर पक्षीमित्र प्रतिक मोरे आपल्या व्याख्यानातून पक्ष्यांचे जंगलातील महत्त्व आणि त्यांच्या संवर्धनावर प्रकाश टाकणार आहेत. पक्षी अभ्यासक विराज आठल्ये यांचे सागरी आणि स्थलांतरित पक्षी विषयावर व्याख्यान होणार आहे. यातून ते कोकण किनारपट्टीवरील स्थलांतरित पक्ष्यांबाबत माहिती देतील. तर निकिता शिंदे रत्नागिरीतील पक्षांची विविधता याविषयावर मार्गदर्शन करणार आहेत.



संमेलनाच्या दुसऱ्या दिवशी पक्षी निरीक्षणासाठी जिल्ह्यातील महत्त्वाच्या ठिकाणी प्रत्यक्ष भेट दिली जाणार आहे. यामध्ये काजरघाटी, देवराई, सडामिऱ्या, नाचणे आणि कांदळवन क्षेत्राला भेट दिली जाणार आहे, अशी माहिती मनुज जिंदल यांनी दिली.

या पक्षीसंमेलनासाठी विभागीय वनअधिकारी गिरीजा देसाई आणि जिल्हा माहिती अधिकारी प्रशांत सातपुते यांनी विशेष मेहनत घेतली असल्याचे जिल्हाधिकारी मनुज जिंदल यांनी सांगितले.

### पर्यटनालाही मोठी चालना मिळणार

**या संमेलनाच्या यशस्वी नियोजनासाठी विभागीय वनअधिकारी गिरीजा देसाई आणि जिल्हा माहिती अधिकारी प्रशांत सातपुते यांनी विशेष मेहनत घेतली असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी नमूद केले. या संमेलनामुळे केवळ पक्षी अभ्यासकांनाच नव्हे, तर पर्यटनालाही मोठी चालना मिळणार आहे.**

> **"रत्नागिरी जिल्ह्यात पक्षांचा अधिवास मोठा आहे. या संमेलनाच्या माध्यमातून येथील पक्षांना एक वेगळी ओळख मिळेल आणि जनसामान्यांमध्ये निसर्ग संवर्धनाची जाणीव जागृत होईल."**
>
> **- मनुज जिंदल, जिल्हाधिकारी, रत्नागिरी**

---

# निवडक




## रुपाली तांडेल यांचा सत्कार

**तळा :** तळा विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे कला- वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय तळाच्या वतीने नवनिर्वाचित सदस्या रुपाली जगन्नाथ तांडेल यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे सचिव महेंद्र कजबजे, शाळा समितीचे चेअरमन श्रीराम कजबजे, सामाजिक कार्यकर्ते ज्ञानदेव तांडेल, माजी सरपंच जगन्नाथ तांडेल, महिला उपाध्यक्षा हिराबाई मेंदाडकर, माजी सरपंच पार्वतीबाई तांडेल, चंद्रकांत दुरे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी शाळा समितीचे चेअरमन श्रीराम कजबजे म्हणाले की, आजचा हा सोहळा द्विगुणित आनंद देणारा आहे. रूपाली जगन्नाथ तांडेल यांची पंचायत समिती सदस्य म्हणून झालेली निवड ही महिला सक्षमीकरणाचे एक उत्तम उदाहरण आहे. सत्तेचा वापर समाजकारणासाठी कसा करावा, हे तांडेल कुटुंबाकडून शिकण्यासारखे आहे. पंचायत समितीच्या माध्यमातून तळा तालुक्यातील शैक्षणिक आणि आरोग्य सुविधा अधिक बळकट होतील, अशी अपेक्षा व्यक्त केली. कार्यक्रमाचे निवेदन प्रा. सर्जे व्ही. बी. यांनी केले. यावेळी शिक्षक, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## आंगर आळीत शिवजयंतीचे आयोजन

**नागोठणे :** सरखेल कान्होजी आंग्रे यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या नागोठण्यातील आंगर आळी येथील सरखेल कान्होजी आंग्रे शिवप्रतिष्ठान मित्र मंडळाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही गुरुवार दि.१९ फेब्रुवारी रोजी सकळ हिंदुस्थानचे आराध्य दैवत आणि हिंदवी स्वराज्याचे संस्थापक श्री छ. शिवाजी महाराज जन्मोत्सव सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. छ. शिवाजी महाराज जन्मोत्सव सोहळ्याच्या निमित्ताने सरखेल कान्होजी आंग्रे शिवप्रतिष्ठान मित्र मंडळाच्या वतीने गुरुवार बुधवारी (दि.१८) सकाळी मंडळाचे पदाधिकारी व सदस्य रायगड किल्ल्याकडे रवाना झाले. गुरुवारी सकाळी ९ वाजता नागोठण्यात शिवज्योतीचे आगमन होणार आहे. त्यानंतर आंगर आळी येथील शिवस्मारकाजवळ शिवज्योत नेण्यात येईल. सकाळी ९.३० वाजता शिवज्योतीचे अभिषेक पूजन होणार आहे. त्यानंतर सायंकाळी ४ ते ६ वाजण्याच्या दरम्यान शिवज्योत प्रदक्षिणा व पालखी मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानंतर सायंकाळी ७.३० वाजता रोहा येथील इतिहास अभ्यासक सुखद राणे यांचे शिव व्याख्यान होणार आहे. रात्री ८.३० वाजल्यापासून भरतशेठ मांगीलाल परमार यांच्या स्मरणार्थ महाप्रसाचे आयोजन करण्यात आले आहे. आंगर आळी येथील हा शिवजयंती सोहळा यशस्वी होण्यासाठी सरखेल कान्होजी आंग्रे शिवप्रतिष्ठानचे पदाधिकारी, सदस्य, आंगर आळी ग्रामस्थ व महिला मंडळ मेहनत घेत आहेत.

## दामोदर केने यांचे निधन



**चिरनेर :** पनवेल तालुक्यातील चावंडोली येथील भजनीबुवा तथा सामाजिक कार्यकर्ते दामोदर पदू केने (७६) यांचे निधन झाले. त्यांच्या अंत्यदर्शनासाठी विविध क्षेत्रातील मान्यवरांसह नातेवाईक हजर होते. केने हे तालुक्यातील चावंडोली, चावणे, तुराडे, गुळसुंदे, मोहोपाडा, रसायनी पाताळगंगा परिसरातील विविध गावात मागील कित्येक वर्षे धार्मिक कार्यात भजनीबुवा म्हणून कार्यरत होते. त्यांचा या विभागातील प्रत्येक सामाजिक उपक्रमातही सहभाग होता. त्यांच्या निधनाने चावंडोली, तुराडे येथील केने कुटुंबीयांवर शोककळा पसरली आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, चार मुली, जावई, नातवंडे असा त्यांचा आप्त परिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी गुळसुंदे येथे दि.२३ फेब्रुवारी, तर उत्तरकार्य २६ फेब्रुवारी रोजी राहत्या घरी चावंडोली येथील होणार आहेत.

## अनोख्या पद्धतीने शिवजयंतीचे आयोजन

**मुंबई :** शैलेंद्र एज्युकेशन सोसायटी दहिसरच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त संस्थेच्या महाविद्यालय आणि शाळा शिवदुर्ग या दिमाखदार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराजाच्या ३९६ व्या जन्मोत्सवाचे औचित्य साधून युनेस्कोने २०२५ च्या जागतिक वारसा यादीसाठी नामांकन दिलेले १२ अभेद्य दुर्ग. महाविद्यालयातील व शाळेच्या ३५० विद्यार्थ्यांनी अहोरात्र मेहनत घेऊन या १२ किल्ल्यांच्या १० १० फूट आकाराच्या भव्य आणि हुबेहूब प्रतिकृती साकारणार आहेत. हिंदवी स्वराज्याचे सैन्य-सामर्थ्य आणि स्थापत्यशास्त्र जगासमोर मांडणारा हा एक अनोखा मराठा मिलिटरी लँडस्केपचा अविष्कार असेल. शिवदुर्ग या सोहळ्यात शिवकालीन शौर्याची आणि संस्कृतीची विविध वैशिष्ट्ये अनुभवायला मिळणार आहेत. या प्रदर्शनाचे मुख्य आकर्षण म्हणजे स्वराज्यातील अस्त्र-शस्त्रांचे शस्त्रागार आणि दुर्मिळ नाणी संग्रहालय. येथे शिवरायांनी चलनासाठी वापरलेले अमूल्य होण आणि शत्रूच्या उरात धडकी भरवणारा दांडपट्टा, फिरंग, वाघनखे व ढाली यांसारख्या ऐतिहासिक शस्त्रास्त्रांचा खजिना मांडण्यात येणार आहे. केवळ शस्त्रेच नव्हे, तर रणरागिणींचे युद्धकौशल्य ही या सोहळ्याची शान असेल. शिवकालीन युद्धकलेचे पुनरुज्जीवन करत महाविद्यालयीन तरुणी यावेळी चित्तथारक तलवारबाजी आणि मर्दानी खेळांचे थेट प्रात्यक्षिक सादर करून उपस्थितांच्या डोळ्यांचे पारणे फेडणार आहेत. इतिहासाच्या अभ्यासकांसाठी आणि जिज्ञासूंसाठी प्रश्नमंजुषा आणि कथाकथन यांसारख्या स्पर्धांतून इतिहासाची पाने पुन्हा उलटली जातील.



## निवडक

### ‘१०८ रूग्णवाहिकेचा वापर करा’



**कोर्लई :** अपघात झाल्यास प्रसंगी शासनाच्या आरोग्य विभागाच्या १०८ रुग्णवाहिकेचा वापर करा असे आपत्ती व्यवस्थापन तज्ञ प्रा. डॉ. जयपाल पाटील यांनी गुरु संत सेवालाल महाराज जयंतीनिमित्त अलिबाग तालुक्यातील बंजारा समाज कामगारांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना सांगितले. यावेळी अलिबाग नगराध्यक्ष नाईक, उपनगराध्यक्ष ॲड. मानसी म्हात्रे, माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक प्रशांत नाईक, प्रा. डॉ. जयपाल पाटील, अलिबाग पोलीस निरीक्षक साळी मान्यवर उपस्थित होते. यावेळी बंजारा समाजातर्फे प्रमुख मान्यवरांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी अलिबाग नगरपरिषदेचे सर्व नगरसेवक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गोरख राठोड, शंकर जाधव, अनिल राठोड, चंदर पवार, शिवराम जाधव यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रकाश राठोड यांनी केले तर नामदेव पवार यांनी आभार मानले.

### श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावर शुकशुकाट

**श्रीवर्धन :** सध्या दहावी व बारावीच्या परीक्षा सुरू झाल्यामुळे श्रीवर्धन तालुक्यात येणाऱ्या पर्यटकांची संख्या अत्यंत कमी झालेली पाहायला मिळत आहे. त्यामुळे श्रीवर्धनच्या समुद्रकिनाऱ्यावर पूर्णपणे शुकशुकाट पाहायला मिळत आहे. आता पर्यटक येतात ते फक्त शनिवारी आणि रविवारी. शालांत परीक्षा संपल्यानंतर पुन्हा पर्यटकांचा सीझन सुरू होईल. यावर्षी श्रीवर्धन तालुक्यात येणाऱ्या पर्यटकांकडून अनेक वेळा अपघात घडण्याचे प्रकार खूप मोठ्या प्रमाणावरती वाढले आहेत.



त्याचप्रमाणे पर्यटकांचा मद्यपीपणा देखील या अपघातांसाठी कारणीभूत ठरत असल्याचे अनेक वेळा दिसून आले आहे. यावरती पोलीस प्रशासनाने देखील कडक भूमिका घेतली असून श्रीवर्धनमध्ये येणाऱ्या पर्यटकांची फुंकर मारुन मशीनद्वारे तपासणी करण्यात येणार आहे. शनिवारी देखील श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावरती एका काजू विकणाऱ्या ७० वर्षाच्या आदिवासी महिलेला एका पर्यटकानी धडक दिल्याची घटना घडली होती. श्रीवर्धन पोलिसांनी त्यामुळे जागोजागी बंदोबस्त वाढविला असून शहरात सुरू असलेली अवजड वाहतूक देखील या ठिकाणी स्थानिक नागरिकांना डोकेदुखी ठरत आहे. जीवना बंदर व श्रीवर्धन दांडे या ठिकाणी सुरू असलेल्या जेट्टीच्या कामासाठी क्षमतेपेक्षा जास्त दगड भरून ओव्हरलोड वाहतूक श्रीवर्धन शहरातून केली जाते, त्यामुळे पर्यटक संख्या कमी झाली आहे.

### तुंबलेल्या गटारामुळे नागरिक त्रस्त

**तळा :** तळा शहरातील बँक ऑफ इंडिया शेजारी असलेल्या गटाराची अत्यंत दुरवस्था झाली असून हे गटार तुंबलेल्या अवस्थेत असल्याने याठिकाणी येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांना दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे.तालुक्यातील अग्रगण्य असलेल्या तळा बँक ऑफ



इंडियाच्या शाखेत तालुक्यातील बहुतांश नागरिकांची खाती असल्याने बँकेच्या कामानिमित्त याठिकाणी नागरिकांची ये-जा सुरू असते. समोरच घरगुती खाणावळ असल्याने ग्राहकांची देखील कायम वर्दळ असते. मात्र याठिकाणी गटार तुंबल्यामुळे सर्वत्र दुर्गंधीचे साम्राज्य पसरले असून येथील नागरिकांना नाकाला रुमाल बांधून ये जा करावी लागते. तसेच सदर गटार हे उघड्या अवस्थेत असल्याने रात्रीच्या वेळी पाय अडकून अपघात होण्याची भीती आहे. त्यामुळे नगरपंचायत प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन सदर गटाराची स्वच्छता करून त्यावर झाकण लावावे अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

### विंधणे येथे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**उरण :** बी.एस. पाटील इंग्लिश मीडियम स्कूल, विंधणे येथे शनिवारी (दि.१४) रोजी वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात साजरे करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी नृत्य, संगीत व नाट्य सादरीकरणाद्वारे आपली कला, सर्जनशीलता आणि आत्मविश्वास यांचे अप्रतिम दर्शन घडवले. त्यांच्या प्रभावी सादरीकरणामुळे उपस्थित प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले. कार्यक्रमाला संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कैलास पाटील, उपाध्यक्ष गितेश जोशी, सचिन जोशी, प्रदीप शेलके, सुनील ठाकूर, सुचिता जोशी, जयवंत पाटील, बळीराम नवाले, जयेश नवाले, जगन्नाथ चिल्लनपल्ले, राकेश घरत, राज घरत, सूर्यकांत कासकर, ऋषिकेश माळी तुषार थळी, संजय केणी, सुरेश पाटील, स्नेहल जोशी, जयवंत पाटील, बाळीराम नवाळे, जयेश नवाळे, जयेश पाटील, जगन्नाथ चितमपल्ले, राकेश घरत, राज घरत, सूर्यकांत कासकर, ऋषिकेश माळी, समीर जोशी, सदाब, रेहान खान, रुबिना, इंदुप्रभा राजभर, गायत्री पाटील, प्रिया पाटील, स्नेहल माळी, सुविधा नवाळे, गीतांजली पाटील, मोनिका जोशी, ज्योत्सना जोशी, नेहा कासकर, वंशिका कोळी, विश्रांती शेळके, अश्विनी नवाळे, निधी गौतम, पूजा ठाकूर, पूजा चिट्टमपल्ले, अक्षता पाटील, अफसरी, नूतन ठाळी, सीमा यादव, नम्रता पाटील, प्रिया पाटील, हीना भाटी, राधिका गाडरी, ममता देवाशी, सानिया, निहारिका ताम्रकार, नर्गिस, सुनीता जैस्वाल, हेमांगी नवाळे, भाग्यश्री घरत, दर्शना घरत, आरती पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

## क्लासिफाईड
**जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी**

- **ग्राफिक डिझाईन,** सोशल मीडिया हॅंडिन साठी अनुभवी मुलगी पाहिजे. मो.९९२१०७३९६३
- **पाहिजेत**–अलिबाग येथे ऑफीसमध्ये कॉम्प्युटर ऑपरेटर/ऑफीस असिस्टंट पाहिजे. संपर्क- श्री. मधुकर पाटील ९२७३२८९०१५/९४२०३२५१०६
- **हॉस्पिटलमध्ये काम करण्यास हवे आहेत.** १) नर्स ANM/GNM २) नर्स PRIVATE NURSING COURSE ३) मुले/मुली १२ वी पास ४)X-Rayसाठी मुले ५) मावशी/आयाबाई आधारकार्ड व अनुभव असल्यास प्रमाणपत्र आणावे. अंजली हॉस्पिटल अलिबाग. ७७४५०५००२५/९११९५६५०२२/९३२१३०३९३८
- **मंगलग्रेन स्टोअर्स, बाजारपेठ,** अलिबाग येथे Packing व डिलेवरी व इतर कामासाठी मुल, मुली पाहिजेत. संपर्क :- ७८७५९९००९२

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# सापे-वामने रेल्वेस्थानक समस्यांचे केंद्रबिंदू

- प्रवाशांच्या जीवाशी किती दिवस खेळणार
- प्रशासनाने वेळीच जागरुक व्हावे

**। महाड । प्रतिनिधी ।**

कोकण रेल्वेच्या अखत्यारीत येणारे महाड तालुक्यातील सापे-वामने हे महत्वाचे स्थानक असून महाड, पोलादपूर, मंडणगड येथून हजारो प्रवासी मोठ्या प्रमाणात याच स्थानकातून प्रवास करीत असून मूलभूत सुविधांच्या अभावामुळे समस्याचे केंद्रबिंदू ठरले असून सरकारच्या उदासीनतेमुळे, हलगर्जीपणामुळे जीवितहानी होऊ शकते. अशा दुर्घटना घडल्यास प्रशासन जबाबदारी घेणार आहे का? अशी आक्रमक मागणी स्थानिक ग्रामस्थ व प्रवाशांनी समाज माध्यमातून केली जात आहे. प्रवाशांच्या जीवाशी किती दिवस खेळणार? असा संतप्त सवाल प्रत्येक प्रवाशांकडून विचारला जात आहे.



**प्रवाशांचा मनस्ताप**

पुढील महिन्यात कोकणातील सर्वात मोठा शिमगोत्सव येत असून त्याकरिता प्रवासी वर्गाची मोठया संख्येने रेल्वेने ये-जा होणार आहे. जादा गाडया देखील रेल्वे खात्याने सोडल्या आहेत. मात्र दुदैवाने सापे-वामने रेल्वे स्थानकामध्ये चढण्या-उतरण्याकरिता प्रवाशांना मोठा मनस्ताप होतो. हा जीवघेणा प्रवास थांबणार कधी असा संतप्त सवाल स्थानिक नागरिकांकडून केला जात आहे.

सुरवातीला कमी गर्दी असलेले हे स्थानक आता हळूहळू गजबजू लागले आहे. मात्र सापे-वामने स्थानकाच्या पुनर्विकास प्रक्रियेनंतर येथील स्थानकाच्या समस्या अजूनच गंभीर झाल्या आहेत. यामध्ये या रेल्वे स्थानकावर एकच फलाट असून रेल्वे रूळ आणि फलाटातील अंतर जास्त असल्याने प्रवाशांना मोठी कसरत करावी लागत आहे. प्रामुख्याने प्लॅटफॉर्मची उंची अत्यंत कमी असल्यामुळे प्रवाशांना रेल्वेमध्ये चढणे-उतरणे जीवघेणे ठरत आहे. यामुळे जीवितहानी होण्याचे प्रसंग घडण्याची शक्यता प्रचंड वाढली असून ती नाकारता येत नाही.

स्थानकापर्यंत पोहोचणाऱ्या रस्त्याची अतिशय दुरवस्था झाली असून प्रवाशांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.


रेल्वे स्थानकांत विजेची कमतरता असल्याने रात्रीच्या वेळी प्रवाशांना तिथून बाहेर येताना अडचण निर्माण होत आहे. रेल्वे अवारात कोणतेही खाण्याकरिता व लहान बालकास काही खाऊ घेण्यास दुकान नसल्याचे दिसत आहे, स्थानिकांना तिथे रोजगारासाठी काही उपलब्ध करून द्यावी, यासोबतच स्थानिक भूमिपुत्रांना दुकान उभारावे असे स्थानिक प्रवासी वर्गांची मागणी होत आहे.

खा. सुनिल तटकरे, मंत्री भरत गोगावले, क्षेत्रीय रेल प्रबंधक शैलेश बापट, कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडचे आशुतोष श्रीवास्तव यांची कुणबी समाजोन्नती संघ (मुंबई) शाखा महाड-पोलादपूर संलग्न युवक मंडळ आणि महिला तसेच आम्ही सापे, वामने, नडगाव शेतकरी बहुविकासीय सामाजिक संस्था यांनी प्रत्यक्ष भेट घेऊन सदर समस्येसह स्थानक विकासासाठीच्या प्रमुख मागण्या सादर केल्या. त्यावर आजतागायत कोणतीही कार्यवाही झालेली पाहायला मिळत नाही.

## ना. भि. सोनवणे यांचा सत्कार

**। माथेरान । प्रतिनिधी ।**

निपुण भारत मिशनअंतर्गत महाराष्ट्रातील सर्व जिल्हा परिषद शाळांतून विद्यार्थी शैक्षणिक गुणवत्ता विकास साधला जात आहे. त्या अंतर्गत रायगड जिल्ह्यातील शैक्षणिक कार्यात यशस्वी आणि नाविन्यपूर्ण कार्य करणाऱ्या अधिकाऱ्यांचा सत्कार सोहळा भाग्यलक्ष्मी हॉल, अलिबाग येथे माननीय नेहा भोसले, मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला.




नारायण सोनवणे, शिक्षण विस्तार अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, कर्जत यांचा तालुक्यातील नाविन्यपूर्ण शैक्षणिक यशस्वी कार्याच्या योगदानाबद्दल कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद, ललिता दहीतुले, शिक्षण अधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद रायगड यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी सुनील भोपळे, संतोष शेडगे, शंकर पौळ अध्यक्ष, काकडे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात शैक्षणिक गुणवत्ता, निपुण महाराष्ट्र अंतर्गत कार्यवाही, आधार, अपार, कृतीयुक्त शिक्षण याबद्दल विशेष मार्गदर्शन उपस्थित माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी व सर्व मान्यवरांनी दिले. प्रथम एज्युकेशन फाऊंडेशनचे शैक्षणिक गुणवत्ता विकासामध्ये योगदानाबद्दल शंकर पौळ आणि त्यांच्या सहकारी अधिकारी यांचे मान्यवरांनी अभिनंदन केले.

## विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

**म्हसळा :** न्यू इंग्लिश स्कुल म्हसळा यांच्या दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ नुकताच पार पडला. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी समीर बनकर, महेश पवार, शशिकांत शिर्के, डि. आर. पाटील, सुनिल उमरठकर, केंद्र प्रमुख धामणस्कर, भाई बोरकर, अक्षय पूरी, करडे, शिर्के, मोरे, मांजरेकर, एकनाथ पाटील, तसेच सर्व शिक्षकवृंद, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थीत होते. यावेळी बनकर म्हणाले की, ज्ञानाची भूक ज्याला असेल आणि कुठलीही गोष्ट अर्ध्यातून जो सोडत नसेल, त्याला यश मिळाल्याशिवाय राहात नाही, परिक्षेचा बाऊ न करता आत्मविश्वासाने सामोरे जावे असे सांगितले.

## सांस्कृतिक स्पर्धेत मानिवली शाळेला यश

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील वंजारपाडा येथे माथेरान व्हॅली शाळेमध्ये सांस्कृतिक स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेतील तीन गटामध्ये मानिवली येथील जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांनी कमाल केली. माथेरान व्हॅली इंग्लिश मिडीयम स्कूल वंजारपाडा येथे झालेल्या सांस्कृतिक आणि क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेत हुतात्मा हिराजी पाटील यांचे जन्मगाव असलेल्या मानिवली शाळेच्या विद्यार्थ्यांनी सुयश मिळवले. शिक्षण विभागाच्या दहिवली माले या केंद्रातील सर्व शाळांना स्पर्धे साठी निमंत्रित करण्यात आले होते. सांस्कृतिक आणि क्रीडा अशा विविध स्पर्धेत ३०० हून अधिक



विद्यार्थी सहभागी झाले होते. महोत्सवात कला, क्रीडा प्रकारात मानिवली शाळेच्या विद्यार्थ्यांनी यश मिळवले. वक्तृत्व स्पर्धेतील मोठ्या गटात पूजा डायरे हिने प्रथम क्रमांक पटकावला. तर दोरी उडी क्रीडा स्पर्धेत समृद्धी गवळी हिने दुसरा, चमचा लिंबू क्रीडा स्पर्धेत दुर्वा डायरे हिने दुसरा क्रमांक पटकावला. तर सामूहिक स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी देखील तीन सांस्कृतिक प्रकारात तिसरे क्रमांक पटकावले.त्यात नाट्यस्पर्धा, समुहनृत्य गीतगायन, स्नेहल पाटील हे विजेते ठरले.

## धनंजय गोंधळी परिवाराचे सांत्वन

**चिरनेर :** ज्येष्ठ पत्रकार, धनंजय गोंधळी यांचे नुकतेच निधन झाले आहे. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच, उरण तालुका पत्रकार संघाच्या पदाधिकारी व सदस्यांनी बुधवारी (दि.१८) रोजी गोंधळी यांच्या चिरनेर कातळपाडा येथील निवासस्थानी जाऊन, संजय गोंधळी, बबन गोंधळी, प्रकाश गोंधळी, प्रथमेश गोंधळी, शेखर गोंधळी, सुहास गोंधळी, प्रतीक गोंधळी यांच्यासह त्यांच्या अन्य कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेतली.



● उन्हाळ्याची चाहूल लागताच अहमदाबादमधील रानमेवा पनवेलच्या जुन्या भाजी मार्केटमध्ये दाखल झाला आहे. (छायाचित्र- राजेश डांगळे)

## चिकित्सा शिबीर

**नवीन पनवेल :** डॉ. जी. डी. पोळ फाऊंडेशन व वायएमटी आयुर्वेदिक हॉस्पिटल यांच्या वतीने वेदनामुक्ती चिकित्सा शिबीर घेण्यात येणार आहे. मानदुखी, पाठदुखी, कंबरदुखी, गुडघेदुखी, खांदेदुखी, कोपराच्या वेदनांसाठी अधिवर्म, विद्धकर्म व मर्म चिकित्सा पद्धतीने उपचार करण्यात येणार आहेत. हे शिबिर शुक्रवार (दि. २०) ज्येष्ठ नागरिक सामाजिक संस्था, सेक्टर १६, खारघर येथे होणार आहे. रुग्णांनी पूर्वनोंदणीसह आवश्यक तपासणी अहवाल घेऊन उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## वनव्यांमुळे होतोय निसर्गाचा ऱ्हास

**। तळा । प्रतिनिधी ।**

सध्या सर्वत्र जंगलात लागणाऱ्या वनव्यांमुळे वनसंपदा धोक्यात आली असून यामुळे निसर्गाचा मोठ्या प्रमाणावर ऱ्हास होत आहे. हे वनवे वेळीच रोखणे गरजेचे आहे. हल्ली वणवे लागण्याच्या प्रमाणात वाढ झाली असून बऱ्याचदा हे वणवे नैसर्गिकरित्या कमी तर मानवनिर्मित जास्त असतात. अथक परिश्रम घेऊन शेतकरी आपल्या जागेत आंबा, काजूसह अनेक फळांच्या बागा फुलवितात. मात्र वनव्यांमुळे अशा अनेक बागांची काही क्षणात राखरांगोळी होते. मात्र, वणवे पेटवणाऱ्या किंवा वणव्यांना कारणीभूत असणाऱ्या व्यक्तींना या नुकसानीचे महत्त्व किंवा त्यामुळे होणारे नुकसान कधी कळणार, असा प्रश्न वनप्रेमीं कडून उपस्थित केला जात आहे.



अनेक गावांत सायंकाळी किंवा पहाटेच्या वेळी गवतासह झाडाचा पालापाचोळा जळून जाण्यासाठी काही नागरिकांकडून वणवे पेटवले जातात. मात्र, वाऱ्याच्या वेगात वणवा सर्वत्र पसरत असून, त्यातून पुढे अनेक दुर्दैवी घटना घडतात. बहुतांश गावातून शेतकरी भातपीक घेण्यासाठी तरवा तयार करतात. त्यासाठी गवत, पेंढा, कवळ, शेणाचा वापर करतात. यात कवळ तोडीचा फटकाही झाडांना बसत आहे. तसेच तरव्यासाठी वणवे पेटवले जात असल्याने त्याचा फटका येथील वनसंपदेला व शेतीला बसू लागला आहे. डोंगरातील अशा वणव्यांमुळे येथील विविध प्रकारची उपयुक्त वृक्षवेलीही नष्ट होऊ लागल्या आहेत. वणवा विरोधी कायदा असला तरी तो सक्षम पणे राबवला जात नसल्याने कायद्याचे भय वणवे पेटवणाऱ्या या मंडळींना उरले नाही.परिणामी, गेल्या काही वर्षांपासून वनव्याचे प्रकार वाढत असल्याचे वनप्रेमींचे म्हणणे आहे.

## शिवजयंती उत्सव समितीची कार्यकारिणी जाहीर

**नेरळ:** सार्वजनिक शिवजयंती उत्सव सोहळ्याचे हे ५६ वे वर्षे असून यावर्षी उत्सव समितीचे माध्यमातून शिवजन्मोत्सवाचा कार्यक्रम होणार आहे. दरम्यान, नेरळ सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीच्या कार्यकारिणीची निवड करण्यात आली असून अध्यक्ष म्हणून बंडू क्षीरसागर यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. उपाध्यक्ष म्हणून मुकुल दळवी, हर्षद पार्टे, म्हणून किरण मालप, गुरु क्षीरसागर, रमेश पवार, राहुल भाटकर यांची एकमताने निवडी करण्यात आली. उत्सवाचे नियोजनासाठी मिलिंद मिसाळ, संतोष पेरणे, प्रीतम गोरी, चिराग गुप्ता, अल्पेश मणवे, मंगेश मगर, सर्वेश गायकवाड, प्रमोद कराळे, यतीन यादव, नीलेश भवारे, सुमित क्षीरसागर, प्रतीक भिसे, हरेश भाटकर, दीप देशमुख, दीर्वांकुर पवार, सर्वेश मिसाळ, रोहन मिसळ, विघ्नेश लाड आदी उपस्थित होते.

## नागोठणे विभाग पत्रकार असोसिएशनचे पुरस्कार जाहीर

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील सामाजिक बांधिलकी जपणारी पत्रकार संघटना असलेल्या रायगड प्रेस क्लबशी संलग्न असलेल्या आणि गेली तेरा वर्षे सातत्याने आपला वर्धापन दिन दरवर्षी नित्यनियमाने साजरा करून नागोठणे शहर व ग्रामीण विभागात नावलौकिक मिळविलेल्या नागोठणे ग्रामीण विभाग पत्रकार असोसिएशनचा चौदावा वर्धापन दिन सोहळा लवकरच साजरा होत असून पत्रकार असोसिशनकडून देण्यात येणारे विविध पत्रकार पुरस्कार पत्रकार असोसिएशनच्या मंगळवारी (दि.१७) झालेल्या बैठकीत जाहीर करण्यात आले.

नागोठणे ग्रामीण विभाग पत्रकार असोसिएशनचा मानाचा पुरस्कार समजला जाणारा कै. तात्यासाहेब टके ज्येष्ठ पत्रकार पुरस्कार यशवंत बापू कांबळे यांना जाहीर करण्यात



यशवंत कांबळे | प्रशांत शेडगे | परेश शिंदे

आला. प्रशांत शेडगे यांना उत्कृष्ठ पत्रकार पुरस्कार जाहीर करण्यात आला. तर परेश शिंदे यांना युवा पत्रकार पुरस्कार जाहीर करण्यात आला.

नागोठणे ग्रामीण विभाग संघटनेचे मार्गदर्शक भाई टके यांच्या प्रमुख उपस्थितीत घेण्यात आलेल्या या बैठकीला पत्रकार असोसिएशनचे संस्थापक शामकांत नेरपगार, अध्यक्ष ॲड. महेश पवार, सचिव अनिल पवार, राजेंद्र जोशी, विनोद भोईर, दिनेश ठमके, राजेश पिंपळे, सुनील कोकळे, चेतन टके, सचिन नेरपगार, मंजुळा म्हात्रे, वर्षा सहस्त्रबुद्धे आदी उपस्थित होते.

**शेतकऱ्यांना मोबदला देण्याची मागणी | नुकसान थांबवावे अन्यथा काम बंद आंदोलन**

# नेरळ कळंब राज्यमार्ग रस्त्याचे रुंदीकरण

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ यांच्याकडून कर्जत तालुक्यातील नेरळ कळंब राज्यमार्ग त्याचे काँक्रीटीकरण आणि रुंदीकरण केले जात आहे. मात्र, त्यासाठी रस्त्याच्या बाजूची जमीन कोणतीही परवानग्या न घेता वापरली जात असून शेतकऱ्यांनी त्यास विरोध केला आहे. दुसरीकडे शेतकऱ्यांना शासनाने जमिनीच्या वापराबद्दल मोबदला द्यावा अशी मागणी शेतकरी करीत आहेत.



राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ यांच्याकडून कर्जत तालुक्यातील नेरळ कळंब राज्यमार्ग रस्त्याचे कॉंक्रिटीकरणाचे काम सुरु आहे. हा रस्ता ज्यावेळी प्रथम अस्तित्वातील रस्त्यापेक्षा जास्त लागणाऱ्या जागेचे मोबदला देण्यात आला नव्हता. त्याचवेळी सार्वजनिक बांधकाम खात्याकडून भुसंपादन देखील केलेले नाही. सदर रस्ता

**बाजार भावाप्रमाणे भरपाईची मागणी**

सरकार समृद्धी महामार्ग, शक्तीपीठ महामार्ग आणि रेल्वे मार्गासाठी जमिनी ताब्यात घेताना जमीन मालकांना बाजार भावाच्या पाच पट मोबदला देते आहे. मात्र, कर्जत तालुक्यातील या रस्त्यासाठी किमान जागा संपादन करून बाजार भावाप्रमाणे होणारी रक्कम जागेची किंमत म्हणून आर्थिक भरपाई देण्याबाबत गंभीर नाही.

कोणत्या सर्व्हे नंबर मधून रस्ता जात आहे, त्यातून किती जागा रस्त्यासाठी लागणार आहे याची माहिती संबंधित जागा मालकास देणे आवश्यक आहे. आहे असतांना संबंधित विभागाकडून तशी कोणतीही कार्यवाही झालेली दिसत नाही. नेरळ-कळंब रस्त्याची जमीन ही शेतकऱ्यांच्या मालकीची असताना देखील मोबदला देण्याबाबत कार्यवाही होत नाही. त्यामुळे संबंधित विभागाने आधी संबंधित जमिनीचे भुसंपादन करावे आणि नंतरच रस्त्याचे काम हाती घ्यावे. रस्त्याचे जे काम सुरु आहे त्यातही जनहितापेक्षा ठेकेदाराची तिजोरी कशी भरली जाईल असे अंदाजपत्रक तयार केले आहे असा आरोप काही तज्ञ व्यक्त करीत आहेत. संरक्षक भिंतीची कामे प्रास्तावित केली आहेत त्याची आवश्यकता होती काय? याचा विचार न करता शेतकऱ्यांच्या जमिनीवर बिलडोझर फिरवला जात आहे. त्यामुळे जमिनी रीतसर भुसंपादन न करता सुरू असलेली कामे तातडीने बंद करावीत अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. शेतकऱ्यांचे नुकसान थांबवावे अन्यथा रस्त्याचे काम होऊ देणार नाही अशी भूमिका शेतकऱ्यांनी घेतली आहे. दरम्यान शेतकरी संतप्त होत असून संबंधित विभागाने रस्त्याचे काम त्वरित बंद करावेत अशी मागणी शेतकरी करीत आहेत.

# जल अर्पण दिवस उत्साहात

**उरण :** ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला कायमस्वरूपी शुद्ध व पुरेसे पिण्याचे पाणी मिळण्यासाठी जल जीवन मिशन अंतर्गत योजना गावाला हस्तांतरित दिवस जल अर्पण दिवस म्हणून उरण तालुक्यातील दिघोडे येथे बुधवारी (दि.१८) डॉ. मनिष पाटील यांच्या हस्ते तसेच प्रियांका मढवी, सजैराव पाटील, किर्तीनीधी ठाकूर यांच्या उपस्थितीत उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी अविनाश पाटील, महेश काळे, रुपाली म्हात्रे, प्रशांत निकुंब, शैलेश पेडनकर, नितीन पोलेकर, जयदीप पाटील, कैलास म्हात्रे, अभिजित पाटील, अलंकार कोळी आदी उपस्थित होते.

दिनांक : १८/०२/२०२६

## नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे आरावघर, ता. मुरुड, जि. रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक अमृता कुमार सहस्त्रबुद्धे यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे

**मौजे आरावघर, ता. मुरुड, जि. रायगड**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|---|
| आरावघर ता.मुरुड | १०५/१ | क्षेत्र २-७८-०० पो.ख. ०-४४-०० एकुण क्षेत्र ३-२२-०० | १४.१७ |

दिनांक: १८/०२/२०२६
अशिलांची सही

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता : फ्लॅट नं.१०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट
जे.एस.एम कॉलेज जवळ, अलिबाग-रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे बोरगाव, ता. पेण, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या जमिन मिळकतीचे ७/१२ सदरी असणारे विद्यमान मालक यांचे कडून सदरहू मिळकतीचे ७/१२ सदरी त्यांचे खातेनिहाय व स्वतंत्र मालकी हक्कांत नमूद असणारे संपूर्ण क्षेत्र हे त्यांचे कडुन कायमस्वरुपी मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. व उपविभाग | एकूण क्षेत्र (हे.आर.प्रति) | आकार (रु.पै) |
|---|---|---|---|
| बोरगाव | १७७ | १-२७-०० | १८.७३ |

वर वर्णन केलेल्या सदरहू जमिन मिळकतीचे ७/१२ सदरी भोगवटादार व मालक म्हणून असणारे विद्यमान मालक त्यांचे वर्णन खालीलप्रमाणे

१. श्री. अनंता रामभाऊ ढाकवळ, श्री. जयंता रामभाऊ ढाकवळ, श्री. वसंता रामभाऊ ढाकवळ, श्री. यशवंता रामभाऊ ढाकवळ, श्रीमती. सिताबाई रामभाऊ ढाकवळ यांचे सामाईक हिश्शाचे मालकी हक्काचे स्वत्रंत असे ००-३१-०० (हे. आर. प्रति) एवढे क्षेत्र.

२. श्री. अलोक दिलीप ढाकवळ, सौ.अंकिता दिलीप ढाकवळ, सौ. दिपाली दिलीप ढाकवळ, यांचे सामाईक हिश्शाचे मालकी हक्काचे स्वत्रंत असे ००-२५-०० (हे.आर.प्रति) एवढे क्षेत्र.

३. श्री.शुभम झुंबर माने यांचे हिश्शाचे व मालकी हक्काचे स्वत्रंत असे ००-१८-०० (हे.आर.प्रति) एवढे क्षेत्र.

वरील प्रमाणे नमूद भोगवटादार व मालक यांचे स्वतंत्र मालकी हक्कांत नमूद असणारे संपूर्ण क्षेत्र हे प्रस्तुतच्या जाहीर नोटीसीचा विषय आहे. सदरची मिळकत ही वरील नमूद विद्यमान मालक यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचीही विक्री, गहान, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहित लेखी स्वरुपात आणून द्यावेत. सदर मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभात सोडुन दिला आहे असे गृहित धरुन आमचे अशिल सदरहू मिळकतीचे व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण- पेण
दि. १९/०२/२०२६

**ॲड. संदेश दिनकर गावंड**
रा.मु.दुरशेत, पो.बळवळी ता.पेण, जि.रायगड
मो.क्र.७०३०३३३६५४/८६०५४१४५६७

## जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक १) धर्मा गणू म्हात्रे, २) विठाबाई यशवंत म्हात्रे, ३) जितेंद्र यशवंत म्हात्रे, ४) वैशाली धिरज घरत, ५) यमुनाबाई पांडुरंग म्हात्रे, ६) श्याम पांडुरंग म्हात्रे, ७) नित्यानंद पांडुरंग म्हात्रे, ८) प्रणाली प्रभाकर देवळे, ९) पद्मावती विनायक ठाकूर, १०) प्रमिला परमानंद म्हात्रे, ११) प्रथमेश परमानंद म्हात्रे, १२) सारंग परमानंद म्हात्रे, १३) महादेव रामभाऊ पाटील, १४) काशीनाथ रामभाऊ पाटील, १५) अविनाश रामभाऊ पाटील, १६) शकुंतला बंधु ठाकूर, १७) मिराबाई नारायण पाटील, १८) कमलाबाई गोपाल म्हात्रे, १९) प्रफुल्ल गोपाळ म्हात्रे, २०) मनोज गोपाळ म्हात्रे, २१) सुधा गजानन म्हात्रे, २२) विजया जणार्धन भगत, २३) वृंदा गोपाळ म्हात्रे आणि २४) सायली संजय म्हात्रे यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या संदर्भात आम्ही विद्यमान मालकांचे मालकी हक्क तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहकाची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून ती विकण्याचा त्यांस हक अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या आशिलांना दिलेला आहे. मात्र, तरी देखील कोणत्याही व्यक्ती/संस्था सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये /विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद एफएसआय वापर किंवा अन्य काही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळवाव्यात.

वरील मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहीत धरून आमचे आशिल सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळवण्यात येते.

**अनुसूची**
**(मालमत्तेचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव-हाशिवरे, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड येथे स्थित भूमापन क्रमांक व उपविभाग ८/२, एकूण क्षेत्र ००-१०-४० (हे.आर.चौ.मी.) आकार रु. पै. १.४४/-

ठिकाण : अलिबाग
दिनांक : १९/०२/२०२६

**झुंजारराव आणि कं. करीता**
**सही/-**
**विक्रांत झुंजारराव**

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

**कोकण मर्कंटाईल को- ऑप. बँक लिमिटेड** मल्टी स्टेट बँक — Since 1973
**नोंदणीकृत कार्यालयः** १ ला मजला, हार्बर क्रेस्ट, माझगाव टी.टी. मुंबई ४०००१०.
दूरध्वनी : २३७२३७५३, २३७२९९६९, २३७२९९७०, २३७२९९७१, २३७३४२०२, २३७३४३११.
फॅक्सः २३७४८५८९ । वेबसाईट : www.kokanbank.net

## शुद्धिपत्रक

दिनांक १७.०२.२०२६ रोजी कृषीवल (रायगड) या वृत्तपत्रात प्रकाशित ताबा सूचनेमध्ये कर्जदार यांचे नाव हे **"श्रीमती सबा बशीर अहमद - कर्जदार/गहाणवटदार"** ऐवजी **"श्रीमती सेन सबा बशीर अहमद - कर्जदार/गहाणवटदार"** असे वाचावे.
इतर नोटीसीमध्ये कोणताही बदल नाही.

कोकण मर्कं. को- ऑप. बँक लि. करिता
सही/-
प्राधिकृत अधिकारी

ठिकाणः नवी मुंबई
दिनांकः १९.०२.२०२६

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल खालील वर्णनाची मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक श्री. नितीन किसन मानकर, रा.माणगाव बुद्रुक ता.सुधागड जि.रायगड यांचेकडून कायम खरेदी करणार असून, तशी बोलणी आमचे अशिल व मिळकत मालक यांचेमध्ये सुरू आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे माणगाव बुद्रुक, ता. सुधागड, जि. रायगड**

| गट नं. | क्षेत्र हे.आर | आकार रू. पैसे |
|---|---|---|
| १७० | ०-३५-४० | १.३९ |
| | पैकी मिळकत मालकाचे क्षेत्र ०-१८-२० हे.आर. | ०.५१ |

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीचे मालक याने आमचे अशिलास दिली असून, मिळकत मालक आमचे अशिलाचे लाभांत खरेदीखत करून देणार आहे. तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १० (दहा) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक : १८/०२/२०२६

सही/-
**ॲड. समिर अनंत आंबोलकर**
वरद कृपा निवास, बल्लाळेश्वर नगर पाली,
ता. सुधागड, जि. रायगड
मो.नं. ९२०९२९६७२५/९४०३३०५२५०

## जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक १) निराबाई जणार्धन पाटील, २) प्रशांत जणार्धन पाटील, ३) पराग जणार्धन पाटील, ४) संध्या रामदास म्हात्रे, ५) रंजना अनिल बैकर, आणि ६) प्रगती अशोक कोठेकर यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या संदर्भात आम्ही विद्यमान मालकांचे मालकी हक्क तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून ती विकण्याचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या आशिलांना दिलेला आहे. मात्र, तरी देखील कोणत्याही व्यक्ती/संस्था सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये /विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळवाव्यात.

वरील मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहीत धरून आमचे आशिल सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळवण्यात येते.

**अनुसूची**
**(मालमत्तेचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव-हाशिवरे, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड येथे स्थित भूमापन क्रमांक व उपविभाग ९/२, एकूण क्षेत्र ००-१३-७० (हे.आर.चौ.मी.) आकार रु.पै. १.८१/-

ठिकाण : अलिबाग
दिनांक : १९/०२/२०२६

**झुंजारराव आणि कं. करीता**
**सही/-**
**विक्रांत झुंजारराव**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळिवण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे सोगांव, ता. अलिबाग, जि. रायगड, येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत त्या जमिनीचे विद्यमान मालक १.राजेंद्र नारायण पेठे, २. जाईली रविंद्र जोशी, ३. केदार रविंद्र जोशी, रा.सोगांव, ता.अलिबाग, जि.रायगड यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | एकूण क्षेत्र (हे. आर) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| सोगांव, ता.अलिबाग | ४२/१ | जिरायत २-०८-९० वरकस १-०४-०० ला.यो.क्षेत्र ३-१२-९० पो.ख.क्षेत्र ०-०१-६० एकूण ३-१४-५० | ५१-०० |

वर नमूद केलेली मिळकती पैकी ०२-००-०० इतके क्षेत्र सदर नोटीसचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेली मिळकत ही विद्यमान मालक यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस पूर्ण कायदेशिर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निवार्ळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारस हक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्रीव्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काची आहे व तिचेवर कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांचे लाभात सोडून दिला आहे असे गृहीत धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : १८/०२/२०२६
मो.क्रं. ९८५०२६८३५०

**ॲड. अभिजीत प्रकाश बागवे**
रा.प्लॉट नं ६४, म्हाडा कॉलनी, अलिबाग
ता.अलिबाग, जि.रायगड पिन ४०२२०१

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे वरसोली, ता.अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत संबंधित मिळकतीचे विद्यमान मालकांकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याची टोकन रक्कम देण्यात आलेली आहे.

मिळकतीचे वर्णन

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार(रु.पैसे) | मालकांची नावे |
|---|---|---|---|---|
| वरसोली | १५/६ | जिरायत ०-०८-१० पो.ख.०-००-२० एकूण ०-०८-३० | २.९४ | श्रीमती ज्ञानेश्वरी उर्फ अश्विनी उमेश सुर्वे |

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्कांच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. सदर मिळकती संदर्भात आमचे अशिलांनी मिळकतीचे विद्यमान मालक यांचेसोबत खरेदी-विक्री संदर्भात बोलणी करुन सदर मिळकत खरेदी करण्याचा निर्णय घेतलेला आहे. सदरील व्यवहाराची टोकन रक्कम अदा केली आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा त्याचे कोणत्याही भागावर कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, रस्त्याच्या वहिवाटीचे हक्क, वारसा हक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहीत लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कोणाचेही कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांच्या आहेत व त्यांच्यावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हितसंबंध व हक्क नाही. अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभात सोडून दिला आहे. असे गृहीत धरुन आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागहून मुदतीनंतर आलेली कोणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

सही/-
अलिबाग
दि. १६-०२-२०२६

**ॲड. जयेंद्र तातुराम गुंजाळ**
मु. परहूर, पो. कामार्ले,
ता. अलिबाग, जि.रायगड
मो.नं. ७२७६१२९७९९

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळिवण्यात येते की आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीच्या विद्यमान मालकांकडुन कायम खरेदी करण्याचे ठरविले असुन तशा आशयाची बोलणी आमचे अशिल व विद्यमान जमिन मालकांचे दरम्यान झालेली आहे व सदरची मिळकत आमचे अशिल हे मिळकत मालकांकडून कायम खुश खरेदी करण्याकरिता घेण्याचे ठरविले आहे त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:-

**मौजे :- मापगांव ता. अलिबाग, जि. रायगड**

| मालकाचे नाव | स.नं./हि.नं. | क्षेत्र. हे.आर | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| शर्मिला उदय घरत सुषमा राजेंद्र राऊत | २२३/१ | ०-२०-०० | ४-०० |

सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून आमच्या मालकी वहीवाटीची असल्याबद्दलचा भरवसा वरील मालकाने आमच्या पक्षकारास दिलेले आहे. तेव्हा कोणत्याही व्यक्तीचा सदर मिळकतीस किंवा मिळकतीच्या एखाद्या भागास वारसा, गहाण, दान, बक्षिस भाडेपट्टा, पोडगी अन्न, वस्त्र, न्यायालयाची जप्ती, वहीवाट ताबे कब्जा व साठेकरार वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग आदि कोणत्याही प्रकारे हक्क हितसंबंध असल्यास व त्याची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून येणाऱ्या १५ दिवसांचे मुदती खालील सही करणार यांच्याकडे कळवावी.

येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न असल्यास सदरची मिळकत निर्वेध व विनाजोखीम आहे असे समजुन आमचे अशिल सदरचे मिळकतीची विक्री व्यवहार पुर्ण करतील व मागावुन येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

ठिकाण :- महाड
दिनांक :- १६/०२/२०२६

सही/-
**ॲड. श्री. संतोष जे. पालांडे**
निल कॉम्पलेक्स गाळा नं २ महाड तहसिल
ऑफीस जवळ महाड रायगड

**पी.पी.खारपाटील एज्युकेशन सोसायटी ठकुबाई परशुराम खारपाटील इंग्रजी माध्यम शाळा, चिरनेर मु.पो.-चिरनेर, ता.उरण, जि. रायगड**

वंचित व दुर्बल घटकांच्या विद्यार्थ्यांसाठी RT.E २५% आरक्षणांतर्गत ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरू
शैक्षणिक वर्ष सन-२०२६-२०२७
इयत्ता-१ ली साठी
(१४ जागा) प्रवेश संख्या वर्गानुसार २५% जागा
कालावधी १७ फेब्रुवारी २०२६ पासून २८ फेब्रुवारी २०२६ पर्यंत
आवश्यक कागदपत्र वंचितसाठी
१) जन्माचा दाखला
२) आधारकार्ड
३) जातीचा दाखला
४) घरपट्टी
५) पासपोर्ट साईज फोटो
आवश्यक कागदपत्र दुर्बलसाठी (open):
१) जन्माचा दाखला
२) आधारकार्ड
३) सन २०२५-२६ चे एक लाखापेक्षा कमी असलेला उत्पन्नाचा दाखला
४) घरपट्टी
५) पासपोर्ट साईज फोटो
६) निवासी पुरावा राष्ट्रीय कृत बँकेचे पासबुक
**सूचना :-** पालकांनी खालील साईटवर ऑनलाईन प्रवेश अर्ज भरणे.
https:/student.maharashtra.gov.in/adm_portal अधिक माहितीसाठी इंग्रजी माध्यम शाळा कार्यालयात संपर्क साधा.

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**पी.पी.खारपाटील एज्युकेशन सोसायटी**
**ता.उरण, जि.रायगड.**

दि. १८/०२/२०२६

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल श्रीमती. मनिषा अजय कदम वगैरे यांनी खालील मिळकती बाबत पनवेल येथील दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात स्पेशल मुकदमा ४५६/२०१८ प्रलंबित आहे. सदरचा दावा ठरवाकरिता, दिनांक १५/०२/२०१८ रोजीचे खरेदीखत रद्द करून मिळणे करिता, निरंतर ताकीद हुकुमाकरिता दाखल केला आहे.

**जाहीर नोटीस बाबत स्थावर मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नाव | भुमापन नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|---|
| कोयनावेळे | ४१/अ | ४६ | ०-०३-७० |
| (जुना मौजे-घोटकॅम्प येथील भुमापन नं.८४, हिस्सा नं. ३/४६, भुखंड नं.२७) | | | |

(त्याच प्रमाणे त्या मिळकतीमध्ये केलेले बांधकाम अगर सदनिका यांचा समावेश असेल)

मेहरबान न्यायालयाने मनाई हुकुमाचे अर्जावर आदेश करून मिळकतीमध्ये तिऱ्हाईत इसमांचे हक्क प्रस्तापित करण्यास प्रतिवादींना मनाई केली आहे.

सदर दावा प्रलंबित असताना, वरील मालमत्तेचा खरेदी, विक्री, दान, गहाण, भाडेपट्टा, हस्तांतरण किंवा तृतीय पक्षाचा हक्क निर्माण केल्यास, तो व्यवहार प्रलंबित दाव्याच्या अंतिम निकालास अधीन (Subject to final decision of court) राहील. म्हणून, आमचे अशिलांनी पनवेल येथील सह.दुय्यम निबंधक, पनवेल ४ यांचे कार्यालयात प व ल ४-२७५६/२०२६ कडे शंभर पानाचा नोटीस ऑफ लीस पेंडन्सी दस्त नोंदविला आहे.

सर्व संबंधित व्यक्तींनी याची नोंद घ्यावी व कोणताही व्यवहार स्वतःच्या जोखमीवर करू नये. असा कोणताही व्यवहार केल्यास त्याचे परिणामांची जबाबदारी त्यांचेवर राहील. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

अलिबाग
दिनांक : १८/०२/२०२६

**ॲड. महेश म.गुंजाळ,**
२/१२, भालचंद्र स्मृती, विद्यानगर,
अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९८२२०१३३५०

## जाहीर नोटीस

माझे अशिल गिरीश राम पाटील यांनी खाली नमूद केलेली शेतजमिन मिळकत जमिन मिळकतीचे मालक दर्शना दत्तात्रेय भोईर वगैरे यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेण्याचे निश्चित केले आहे.

| गावाचे नाव | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| मौजे खांडस, ता.कर्जत जि.रायगड | ४९/७ जुना स.नं.३५२/७ जुना स.नं. १३९/७ | ०.४५.०० | ०.३७ |

वरील वर्णनाच्या शेत जमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, वहिवाट व इतर अन्य कोणतेही हक्क हितसंबंध असेल तर संबंधीत व्यक्ति किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरूपात खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही असे समजून विक्रीचा व्यवहार पुर्ण केला जाईल याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक : १९/०२/२०२६

**ॲड. उमेश आनंद भगत**
अधिवक्ता
मु.पो.चिंचवळी ता. कर्जत
जि. रायगड
मो.नं.९०४९४८६८०५

| रायगड जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, अलिबाग-रायगड जिल्हाधिकारी कार्यालय इमारत, दुसरा मजला, हिराकोट तलावाजवळ, अलिबाग, जिल्हा:- रायगड ४०२ २०१ कार्यालय फो.नं. ०२१४१/२२४२२५ | सत्यमेव जयते | RAIGAD DISTRICT CONSUMER DISPUTES REDRESSAL FORUM, RAIGAD-ALIBAG. COLLECTOR OFFICE BUILDING, 2nd FLOOR, NEAR HIRACOTE TALAV, ALIBAG, DIST- RAIGAD 402201 Office Tel. No. 02141/224225 |
|---|---|---|
| F-MAIL ID:- confo-rg-mh@nic.in | | Website:- www.confonet.nic.in |
| जा.क्र.जिग्रातनिआ/राप/जाहिर नोटीस/२०२६/२५२ | | दिनांक:- १७/०२/२०२६ |

तक्रार क्रमांक. ८४/२०२३ ते ९५/२०२३

श्री.प्रकाश जगन्नाथ सापने
श्री.अक्षय प्रकाश सापने — ग्राहक तक्रार क्रमांक:- ८४/२०२३
श्री.भास्कर जानु कोंडीलकर — ग्राहक तक्रार क्रमांक:- ८५/२०२३
श्री. शत्रुघ्न हरिभाऊ निघुकर — ग्राहक तक्रार क्रमांक:- ८६/२०२३
श्री. सचिन धर्मा नागांवकर — ग्राहक तक्रार क्रमांक:- ८७/२०२३
श्री. परेश काशिनाथ पाटील — ग्राहक तक्रार क्रमांक:- ८८/२०२३
श्री. व्यंकटेश कमळाकर कडु — ग्राहक तक्रार क्रमांक:- ८९/२०२३
श्री. राजेश हरिश्चंद्र ओटी — ग्राहक तक्रार क्रमांक:- ९०/२०२३
श्री. नरेश कमळाकर पाटील — ग्राहक तक्रार क्रमांक:- ९१/२०२३
श्री. संतोष बाळाराम भोईर — ग्राहक तक्रार क्रमांक:- ९२/२०२३
श्री. अविनाश रामकृष्ण पाटील
श्री. आदित्य अविनाश पाटील — ग्राहक तक्रार क्रमांक:- ९३/२०२३
श्री. विकास नरहरी पाटील — ग्राहक तक्रार क्रमांक:- ९४/२०२३
श्री. उमेश दत्तात्रेय म्हात्रे — ग्राहक तक्रार क्रमांक:- ९५/२०२३ .. तक्रारदार

**विरुद्ध**

१. गोल्डन मोटर्स तर्फे भागीदार
श्री. संतोष सुरेश वेंगुर्लेकर उर्फ
श्री. संदिप सुरेश कांदळकर
रा. रूम नंबर ८३८, ४था मजला बिल्डींग नं. ११.
अभ्युदय नगर, काळाचौकी मुंबई
आणि
ए/६०४, बालाजी सिपली, सुकापुर,
नवीन पनवेल, जिल्हा रायगड — सामनेवाला क्र. १

२. गोल्डन मोटर्स तर्फे भागीदार
श्री. विक्रांत रविंद्र तेलोरे
रा.आर.बी.९/२४७/३२
सेंट्रल रेल्वे कॉलनी परेल मुंबई
आणि
पुष्पक सोसायटी, २०१, पाली देवद रोड,
सुकापूर, नवीन पनवेल, जि. रायगड — सामनेवाला क्र.३

### जाहिर नोटीस

वर नमूद तक्रारदार यांनी सामनेवाले यांच्या विरुद्ध ग्राहक संरक्षण कायदा २०१९ कलम ३५ अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. यातील विरुद्ध पक्ष यांना नोटीस पाठविली असता स्विकारत नाहीत/ पत्ता बदलला/मिळून येत नाही. म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

विरुद्ध पक्ष यांनी वर नमूद पत्त्यावर दि १८/०३/२०२६ रोजी ठिक सकाळी १०.३० वाजता वेळेत स्वतः अगर तर्फे प्रतिनिधी मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जबाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत. जर विरुद्ध पक्ष हे हजर न राहिलेस ग्राहक तक्रार आयोगाचा एकतर्फी आदेश पारित करणेत येऊन पुढील आदेश करण्यात येईल यांची दाखल घ्यावी.

मे.अध्यक्ष, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, रायगड-अलिबाग यांचे आदेशानुसार.

ठिकाण:- अलिबाग- रायगड
दिनांक:- १७/०२/२०२६

सही/-
**प्र.प्रबंधक**
**जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग**
**रायगड**

दिनांक: १८/०२/२०२६

## नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीप्रमाणे नमुद मौजे खानाव, ता.अलिबाग, जि.रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक वसंत विठ्ठल पाटील, यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ.स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे

**मौजे खानाव, ता. अलिबाग, जि. रायगड**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ (हे.आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| खानाव ता.अलिबाग | ३६/३ | जिरायत क्षेत्र ०-२७-१० पो.ख. ०-०३-८० एकुण क्षेत्र ०-३०-९० | ४.५० |

दिनांक : १८/०२/२०२६
अशिलांची सही

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता: फ्लॅट नं.१०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट
जे.एस.एम कॉलेज जवळ, अलिबाग-रायगड
मोबा. ९७६७०१०९०२


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग




मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

# नौदलाचे महत्त्व जाणणारे राजे

कर्नल अनिल आठल्ये (निवृत्त)

छत्रपती शिवाजी महाराजांनी अत्यंत सुसज्ज अशा नौदलाची केलेली उभारणी हे त्यांचे फार मोठे कार्य आहे. सिद्दी, ब्रिटिश आणि पोर्तुगीज यांना शह देण्यासाठी त्यांनी योग्य ठिकाणी सागरी किल्ले उभारले. छोट्या–मोठ्या नौका, जहाजांची बांधणी केली. तो काळ असा होता की, शिवाजी महाराजांच्या प्रबळ नौदलाचा ताफा समोरून जात असताना पोर्तुगीजांच्या नौदलाने कोणतीही हालचाल केली नाही. ब्रिटिशांनी तर कान्होजी आंग्रे यांच्याकडे समुद्रातून मालाची ने–आण करण्यासाठी अखेरपर्यंत कर भरला. छत्रपती शिवरायांच्या या सुसज्ज नौदलाविषयी जाणून घेऊया...



**नौदल ही कोणत्याही साम्राज्याची स्वतंत्र ताकद आहे. ज्याच्याकडे नौदल आहे, तो लाटांवर राज्य करतो.**
**– रामचंद्रपंत अमात्य, छत्रपती शिवरायांचे मुख्य प्रधान**

फेब्रुवारीच्या १९ तारखेला आपण शिवजयंती साजरी करतो. छत्रपती शिवाजीराजांचे नाव घेताच विजापूरच्या आदिलशाहीशी आणि मुघलांशी त्यांनी दिलेल्या लढ्याची आठवण होते. किंबहुना छत्रपतींच्या त्याच संघर्षाकडे संपूर्ण लक्ष केंद्रित केले जाते. छत्रपती शिवरायांनी आणखी अनेक अवघड गोष्टी साध्य करून दाखविल्या; मात्र त्याकडे फारसे लक्ष जात नाही. शिवरायांनी उभारलेले आधुनिक नौदल आणि जहाजबांधणी उद्योगाचे त्यांनी केलेले पुनरुज्जीवन ही त्यापैकीच एक गोष्ट होय. आग्नेय आशियाशी भारतीयांचे फार पूर्वीपासून व्यापारी संबंध होते आणि व्यापाऱ्यांच्या माध्यमातूनच भारतीय संस्कृतीचा दूरवर प्रसार झाला. दक्षिण भारतातील चोला आणि पल्लव वंशाच्या राजांनी पूर्व आणि दक्षिणेकडील समुद्रावर अक्षरशः हुकूमत गाजवली. मध्यपूर्वेशी आणि युरोपशी भारताचा व्यापार मोठ्या प्रमाणावर होता. विशेषतः रोमन साम्राज्याच्या काळात व्यापार विस्तार मोठा होता.

गुजरातमधील लोथल येथे प्राचीन बंदर आणि जहाजबांधणीची जी जागा आढळून आली आहे, ती आपल्याला इसवी सनाच्या एक हजार वर्षे मागे घेऊन जाते. जहाजबांधणीच्या कलेत भारतीय लोक प्राचीन काळापासून निपुण आणि अग्रेसर होते, हे यावरून लक्षात येते. भरुच, कल्याण, चौल आणि सोपोर येथील बंदरे संपूर्ण मध्यपूर्व आशियात त्याकाळी प्रसिद्ध होती. परंतु समुद्रमार्गे होणाऱ्या व्यापारातील भारतीयांचे प्रमाण आणि जहाजांची संख्याही चौदाव्या शतकानंतर कमी होत गेली. उत्तरेकडून भारतावर मुस्लिम सुलतानांनी केलेल्या स्वाऱ्या हे त्याचे प्रमुख कारण होते. भारतीयांनी भूमी गमावल्यानंतर सागरी व्यापार आणि जहाजांची संख्या कमी झाली आणि ही पोकळी नंतर अरबांनी भरून काढली. अरबस्तानातून येणाऱ्या व्यापाऱ्यांच्या वसाहती लवकरच भारताच्या पश्चिम तटावरील बहुतांश महत्त्वाच्या बंदरांजवळ उभ्या राहू लागल्या.

अशा काळात सागरी शक्तीची जाणीव असलेले जे मोजके राज्यकर्ते त्याकाळी झाले, त्यापैकी शिवाजी महाराज हे एक होत. त्यांनी दौलतखान आणि मयंक भंडारी यांची नौदलाचे संयुक्त प्रमुख म्हणून नियुक्ती केली. लढाऊ नाविक दलाला पाठबळ देण्यासाठी अनेक सागरी किल्ले बांधले. मुंबईपासून १५० किलोमीटर दक्षिणेला महाराजांनी आपला मुख्य नाविक तळ उभारला. ही जागा पोर्तुगीज, ब्रिटिश आणि सिद्दीच्या नौदल तळांपासून सुरक्षित अंतरावर होती. मालवणपासून दोन किलोमीटर पाण्यात असलेल्या खडकावर उभारलेला हाच तो सिंधुदुर्ग किल्ला होय. १० नोव्हेंबर १६६४ रोजी या किल्ल्याच्या कामाला सुरुवात झाली आणि १६६७ मध्ये किल्ला बांधून तयार झाला. स्थानिक मच्छिमारांना शिवाजी महाराजांनी नौदलात भरती करून घेतले. त्यांना सढळहस्ते निधी दिला. त्यानंतरच्या काही वर्षांत एकंदर ५८ किल्ले शिवरायांनी वापरात आणले. विजयदुर्ग आणि अलिबागजवळील कुलाबा हे त्यातील महत्त्वाचे किल्ले होत.

फेब्रुवारी १६६५ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या नाविक दलाच्या ताकदीची चाचणी घेण्याचे ठरविले. दोन मोठ्या जहाजांसह ८८ नौकांच्या ताफ्यासह चार हजारांचे सैन्य घेऊन मराठ्यांच्या नौदलाने बसरूर या बंदरावर हल्ला चढविला. हा ताफा बसरूरकडे निघाला असताना गोव्याजवळ पोर्तुगीजांच्या नौदलातील सैनिकांनी पाहिला.



परंतु अत्यंत प्रबळ असे मराठा नौदल पाहून पोर्तुगीजांनी शहाणपणाने या ताफ्यापासून दूरच राहणे पसंत केले. १६८० पर्यंत मराठा नौदल खूपच शक्तिशाली बनले होते. मराठा नौदलाकडे त्याकाळी ३०० टन वाहनक्षमता असलेली ४५ मोठी जहाजे होती, तर १५० छोट्या नौका आणि सुमारे ११०० गलबते या ताफ्यात होती. ब्रिटिश व्यापाऱ्यांचा भारतातील कावा ओळखणाऱ्या मोजक्या भारतीय राजांपैकी छत्रपती शिवाजी महाराज हे एक होत. ब्रिटिश हे सामान्य व्यापारी वा सावकार नव्हेत. त्यांच्या पाठीशी तेथील राज्यकर्त्यांची प्रचंड ताकद आहे. ते इतके धूर्त आहेत की, तुमच्या जवळपासचे काहीही ते तुमच्या नकळत चोरून नेऊ शकतील. त्यांच्याशी व्यवहार करताना पुरेशी सावधगिरी बाळगा, असे पत्र शिवरायांनी त्यांच्या एका प्रमुख अधिकाऱ्याला लिहिले होते.

मुंबईजवळ जंजिरा येथे ब्रिटिशांनी सिद्दीला दिलेला आश्रय हे ब्रिटिश आणि मराठे यांच्यातील पहिल्या संघर्षाचे कारण ठरले. सिद्दी हा नावालाच विजापूरच्या सुलतानाचा मांडलिक होता. परंतु जेव्हा त्याला मराठ्यांकडून धोका जाणवला, तेव्हा त्याने सुरतच्या मुघल शासकाची मदत मागितली. सुरतमध्ये ब्रिटिशांचे व्यापारी हितसंबंध असल्यामुळे ते मुघलांशी चांगले संबंध ठेवू इच्छित होते. या परिस्थितीचा सिद्दीने पुरेपूर फायदा घेतला आणि आपल्या सागरी ताकदीचा आधार घेऊन मराठ्यांच्या ताब्यातील अनेक इलाख्यांवर हल्ले केले. जेव्हा मराठ्यांच्या नौदलाशी सिद्दीची गाठ पडली, तेव्हा तो पुरता घाबरला आणि मुंबई बंदराजवळ त्याने आश्रय घेतला. हे ठिकाण तोपर्यंत ब्रिटिशांचे पश्चिम किनारपट्टीवरील मुख्य व्यापारी केंद्र बनले होते.

परदेशी ताकदीला आणि सिद्दीला शह द्यायचा असेल, तर मुंबईकडे येणारा त्यांचा मार्ग बंद करायला हवा आणि त्यासाठी तसा एक किल्ला बांधायला हवा, हे शिवरायांनी ओळखले. १६७२ मध्ये शिवरायांनी मुंबईच्या दक्षिणेला असलेले खांडेरी हे छोटे बेट ताब्यात घेतले. हे बंदर मुंबईकडे सागरी मार्गाने येणाऱ्या शत्रूला थोपविण्यास योग्य होते आणि त्याच्या साह्याने ब्रिटिशांना शह देता येईल, हे शिवाजी महाराजांनी ओळखले. अत्यंत काळजीपूर्वक सर्व जुळवाजुळव करून त्याच वर्षी सप्टेंबरमध्ये शिवरायांनी या बेटावर किल्ला बांधण्यास सुरुवात केली.

दौलतखान आणि मयंक भंडारी या शिवरायांच्या दोन प्रमुख नौदल अधिकाऱ्यांनी या बांधकामाची सूत्रे सांभाळली. हे बेट म्हणजे मुंबई द्वीपसमूहाचाच एक भाग आहे आणि त्यामुळे ती आमच्या अखत्यारीत येतात, असा दावा ब्रिटिशांनी केला. ब्रिटिश आणि सिद्दी यांनी मराठा सैन्यावर एकत्रितपणे हल्ला करण्याची धमकी दिली. त्यावेळी शिवाजी महाराज दक्षिणेच्या मोहिमेवर होते आणि त्यामुळे या मुद्द्याकडे गांभीर्याने पाहण्यास मराठ्यांना वेळ नव्हता. सात वर्षांनंतर जेव्हा शिवाजी महाराजांना या परिसराकडे लक्ष देण्यास सवड मिळाली, तेव्हा या बेटावरील किल्ल्याच्या बांधणीचे काम २ सप्टेंबर १६७९ रोजी पुन्हा सुरू करण्यात आले. ठाण्याजवळील सष्टी बंदरावर आणि बसीनच्या किल्ल्यावर ताबा मिळविणाऱ्या पोर्तुगीजांनी या घटनाक्रमाकडे सोयिस्करपणे दुर्लक्ष केले. ब्रिटिशांवर पुरेसा दबाव आणण्यासाठी शिवाजी महाराजांनी मुंबई बंदराची घेराबंदी जमिनीवरील फौजेच्या साह्याने करण्याचे ठरविले. मुंबईवर हल्ला करण्यासाठी कल्याण परिसरात त्यांनी चार हजार जणांचे प्रबळ सैन्य गोळा केले. परंतु सष्टी बंदर पार करण्यासाठी महाराजांना पोर्तुगीजांच्या परवानगीची गरज होती. पोर्तुगीजांनी ती नाकारली. परंतु सुरतेवर मराठ्यांनी केलेल्या प्रचंड हल्ल्याच्या आठवणी ताज्या असल्यामुळे मुंबईमध्ये घबराट पसरली. अखेर मराठ्यांनी पाचशे जणांचे दल खांडेरी बंदरावर उतरविले आणि किल्ल्याच्या बांधकामास सुरुवात केली. यातील दोनशे लोक बांधकाम मजूर होते तर तीनशे जण सैनिक होते. या तुकडीची रसद तोडून त्यांना शरण येण्यास भाग पाडण्याचे ब्रिटिशांनी ठरविले. याकामी चार मोठी जहाजे मुंबईहून सोडण्यात आली. परंतु या तुकडीला रसद पोहोचविण्याचे काम मराठ्यांनी छोट्या नौकांच्या साह्याने रात्रीच्या अंधाराचा फायदा घेऊन सुरूच ठेवले.

१९ सप्टेंबर रोजी ब्रिटिशांनी या बेटाचा ताबा घेण्याचा प्रयत्न केला; परंतु दक्ष असलेल्या मराठा सैनिकांनी तो हाणून पाडला. अखेर ऑक्टोबरमध्ये ब्रिटिशांनी या तुकडीची रसद रोखण्यासाठी आणखी काही जहाजे समुद्रात पाठविली आणि त्याचा परिणाम मात्र जाणवू लागला. २२ सप्टेंबरला उभय नौदलांमध्ये मोठा संघर्ष झाला आणि आकाराने लहान असलेल्या मराठा नौदलाचे मोठे नुकसान झाले. या सागरी युद्धात मराठ्यांच्या तीन मोठ्या जहाजांना जलसमाधी मिळाली, तर तीनशे सैनिकांचा मृत्यू झाला. रसद तोडण्याचा ब्रिटिशांचा डाव तीन महिने सुरू होता.

डिसेंबर १६७९ मध्ये ब्रिटिशांनी बेटावरील तुकडीला निरोप पाठविला आणि शरण येण्यास सांगितले. परंतु शिवरायांनी त्यांच्या सैनिकांना अखेरच्या क्षणापर्यंत निकराची झुंज देण्याच्या सूचना दिल्या होत्या. जानेवारी १६८० मध्ये शिवरायांनी ब्रिटिशांच्या राजापूर येथील वखारीवर कारवाई केली आणि तेथील ब्रिटिशांना कैद केले. अखेर ८ जानेवारी १६८० मध्ये ब्रिटिशांना तह करण्यास भाग पडले. या तहांतर्गत ब्रिटिश आणि मराठा यांच्यात ३० जानेवारी रोजी एक करार झाला आणि खांदेरी बेटाची ब्रिटिशांनी केलेली कोंडी अखेर फुटली. खांदेरी बेटावरील मराठ्यांचा किल्ला ही ब्रिटिशांना भविष्यात कायमची डोकेदुखी ठरणार होती. मराठ्यांनी बचावात्मक पद्धतीने मिळविलेला हा मोठा विजय ठरला. या संघर्षानंतर अवघ्या दोन महिन्यांनी शिवाजी महाराजांचे देहावसान झाले. नौदलाच्या माध्यमातून ब्रिटिशांशी दिलेली झुंज ही त्यांनी केलेली अखेरची लढाई ठरली, हे लक्षात घ्यायला हवे. त्यांना आणखी आयुष्य लाभले असते, तर त्यांनी नौदल अधिक प्रबळ केले असते आणि किनारपट्टीकडे लक्ष केंद्रित केले असते, हे नक्की.

मराठ्यांनी मस्कतबरोबर व्यापार सुरू केला होता. प्रामुख्याने मिठाचा व्यापार ते करीत असत. सुपारीच्या व्यापारातही मराठ्यांची मक्तेदारी प्रस्थापित व्हावी अशी शिवाजी महाराजांची इच्छा होती. अत्यंत किफायतशीर अशा मसाल्यांच्या व्यापारावरही त्यांची नजर होती. दक्षिणेच्या मोहिमेनंतर शिवाजी महाराजांनी पश्चिमेकडील बहुतांश समुद्रकिनाऱ्यांवर हुकूमत प्रस्थापित केली होती. शिवरायांचा मृत्यू ही इतिहासाला मोठी कलाटणी देणारी घटना ठरली. कारण अत्यंत महत्त्वाकांक्षी मुघल सम्राट औरंगजेब याला दक्षिणेकडे येऊन मराठ्यांचा पूर्ण पराभव करणे आता शक्य असल्याचे वाटू लागले होते. तोपर्यंतच्या सर्व मुघल सम्राटांनी हे दुःसाहस टाळले होते. मुघल सम्राटांशी सातत्याने जीवन–मृत्यूचा संघर्ष सुरू असल्यामुळे मराठ्यांना ब्रिटिशांच्या धोक्याकडे लक्ष देण्यास पुरेसा वेळही मिळाला नव्हता. परंतु त्यानंतरच्या ७० वर्षांपर्यंत ब्रिटिश आणि मराठ्यांमध्ये तुलनेने शांततामय वातावरण राहिले. मराठ्यांची ताकद क्षीण होत असल्याचा फायदा ब्रिटिशांनी फारसा घेतला नाही. कारण तोपर्यंत कान्होजी आंग्रे या पराक्रमी दर्यावर्दीने मराठा नौदलाची सूत्रे हाती घेतली होती. त्याने मराठा नौदलाची ताकद अशा प्रकारे विकसित केली, की ब्रिटिश कान्होजींना कर देत होते आणि पश्चिमेकडील समुद्रातून मालाची ने–आण करण्यासाठी कान्होजींचा पास गरजेचा ठरला होता.

पश्चिम किनारपट्टीवर नौदलाची फेरउभारणी करण्याचे श्रेय निःसंशय छत्रपती शिवाजी महाराजांचेच!

**(लेखक राष्ट्रीय छत्रपती शिवाजी फेलोशिप मिळवणारे पहिले महाराष्ट्रीयन आहेत. तसेच मराठा स्ट्रगल फॉर एम्पायर या पुस्तकाचे लेखक आहेत.)**

# नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर फेडेक्स हबचे भूमिपूजन



**। पनवेल । ग्रामीण प्रतिनिधी ।**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर जागतिक कुरिअर आणि लॉजिस्टिक्स क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी फेडेक्स यांच्या हब उभारणीसाठी बुधवारी (दि.१८) उत्साहात भूमिपूजन सोहळा पार पडला. हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प अदानी एअरपोर्ट होल्डिंग्स लिमिटेड यांच्या सहकार्याने साकारला जाणार आहे.

या प्रकल्पाचे भूमिपूजन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर उभारला जाणारा फेडेक्स हब राज्यातील लॉजिस्टिक्स आणि कार्गो क्षेत्रासाठी 'गेमचेंजर' ठरेल. या प्रकल्पामुळे मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती होईल तसेच औद्योगिक विकासालाही चालना मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच, हा अत्याधुनिक हब जागतिक मालवाहतूक साखळीला बळकटी देणार असून नवी मुंबईला आंतरराष्ट्रीय लॉजिस्टिक्स नकाशावर महत्त्वाचे स्थान मिळवून देईल, असेही यावेळी नमूद करण्यात आले.

या कार्यक्रमाला सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंगल, फेडेक्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी राज सुब्रमणयम, आमदार गणेश नाईक, मंदा म्हात्रे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, अधिकारी व प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. नवी मुंबईच्या विकासाच्या दृष्टीने हा प्रकल्प मैलाचा दगड ठरणार असल्याची चर्चा कार्यक्रमस्थळी रंगली होती.




● पीएनपी शैक्षणिक संकुल वेश्वी येथील प्राथमिक शाळेत शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. विविध वेशभूषेत सहभागी विद्यार्थी व शिक्षकांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन केले.
( छायाचित्र :- समिर मालोदे)

# माझी वसुंधरा अभियानात रायगड जिल्हा परिषद राज्यात द्वितीय

## जिल्ह्यातील ८ ग्रामपंचायतींचे विविध गटांत यश

**। रायगड । प्रतिनिधी ।**

माझी वसुंधरा अभियानामध्ये रायगड जिल्हा परिषदेने राज्यात द्वितीय क्रमांक पटकविला आहे. ग्रामपंचायत गटात राज्यस्तर व विभागस्तरावर जिल्ह्यातिल ८ ग्रामपंचायतींनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे.

जिल्ह्यातील ८ ग्रामपंचायतींनी विविध गटांत यश मिळवत ५ कोटी ५० लाखांची बक्षिसे पटकावली आहेत.

माझी वसुंधरा अभियान ५.० हे राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये १ जून २०२४ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत राबविण्यात आले. स्थानिक स्वराज्य संस्थांनी अभियान कालावधीत केलेल्या कामाचे डेस्कटॉप मुल्यमापन व फिल्ड मुल्यमापन त्रयस्त यंत्रणांमार्फत करण्यात आले. या दोन्ही मुल्यमापनातील एकूण गुणांच्या आधारे माझी वसुंधरा अभियान ५.० मधील लोकसंख्यानिहाय विविध गटांतील पुरस्कार जाहीर करण्यात आले.



> **माझी वसुंधरा अभियानामध्ये रायगड जिल्ह्यातील विविध गावांनी अतिशय उत्कृष्ट कामगिरी केली आहे. स्वच्छता, प्रदूषण, स्वच्छ पाणी याबाबत सातत्याने चांगले काम करण्यात येत आहे. यापुढेही अशाच प्रकारे काम सुरू राहणार असून शासन स्तरावरून नागरिकांना चांगल्या सुविधा देण्याचे काम करण्यात येत आहे. विजेत्या ग्रामपंचायतींचे अभिनंदन.**
> **– डॉ. नेहा भोसले, मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद**

१ ते १.५ हजार लोकसंख्या गटांत खालापूर–शिरवली ग्रामपंचायतीने राज्यात प्रथम क्रमांक व भूमी थीमॅटिकमध्ये राज्यात उच्चतम कामगिरीचा प्रथम क्रमांक अशी १.५० कोटीची बक्षीसे पटकवली आहेत.

तसेच ५ ते १० हजार लोकसंख्येत राज्यस्तरावर खालापूर तालुक्यातील वडगाव ग्रामपंचायतीने प्रथम क्रमांक व १ कोटीचे बक्षीस पटकवले आहे. याशिवाय ६ ग्राम पंचायतींनी कोकण विभाग स्तरावर प्रथम क्रमांक मिळवून प्रत्येकी ५० लक्षचे बक्षीस मिळवले आहे. जिल्ह्यात १० हजारपेक्षा जास्त लोकसंख्या गटात वासांबे ग्राम पंचायत, ५ ते १० हजार लोकसंख्येत चौक ग्रामपंचायत, ३ ते ५ हजार लोकसंख्येत तांबाटी ग्रामपंचायत, २ ते ३ हजार लोकसंख्येत तुपगाव ग्रामपंचायत, १.५ ते २ हजार लोकसंख्येत वडवळ ग्रामपंचायत व १ ते १.५ हजार लोकसंख्येत नारंगी ग्रामपंचायतीने यश मिळविले.

तसेच कोकण विभागस्तरावर सर्वोत्तम कामगिरी करणारे गटविकास अधिकारीचा पुरस्कार संदीप कराड , दिप्ती घाट व शुभदा पाटील यांना मिळाला आहे.

# जल अर्पण दिवस उत्साहात साजरा

**। रायगड । प्रतिनिधी ।**

जल जीवन मिशन अंतर्गत ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला कायमस्वरूपी शुद्ध व पुरेसे पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे या उद्देशाने मंजूर करण्यात आलेल्या पाणी पुरवठा योजना आता संचालन व देखभाल दुरुस्तीच्या टप्प्यात प्रवेश करत असून या योजनांचे जबाबदारीपूर्वक हस्तांतरण व्हावे आणि ग्रामस्थांनी त्यांची शाश्वत देखभाल करावी या हेतूने अलिबाग तालुकयातील वरंडे ग्रामपंचायत आंबेपूर येथे जल अर्पण दिवस साजरा करण्यात आला.



सदरील कार्यक्रमा दरम्यान सभेत पाणी पुरवठा योजनेची संपूर्ण माहिती ग्रामस्थांना देण्यात आली. योजनेची रचना, पाणी स्त्रोत, शुद्धीकरण प्रक्रिया, वितरण व्यवस्था तसेच भविष्यातील देखभाल दुरुस्तीबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले व योजना कायमस्वरूपी सुरळीत चालू ठेवण्यासाठी ग्रामस्थांकडून सामूहिक जबाबदारीची हमी घेण्यात आली. जलसंवर्धनाचा संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी शालेय विद्यार्थी व ग्रामस्थ यांनी गावातून प्रभात फेरी काढून घोषवाक्याव्दारे जनजागृती केली. पाण्याच्या नळाला व टाकीला जलबंधन बांधून जलसंपत्तीबद्दल आदर व सामूहिक जबाबदारीची भावना व्यक्त करण्यात आली. यावेळी परिसर रांगोळी व फुलांनी सजवून उत्सवी वातावरण निर्माण करण्यात आले. कार्यक्रमस्थळी उपस्थित ग्रामस्थांनी जल प्रतिज्ञा घेत पाण्याची बचत व योग्य वापर करण्याचा निर्धार व्यक्त केला. तसेच सुरक्षित पिण्याच्या पाण्याबाबत जनजागृती व्हावी यासाठी एफ.टी.के.व्दारे पाणी शुद्धीकरणाचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले व पाण्याची गुणवत्ता तपासणीची पद्धत समजवून सांगण्यात आली.शेवटी ग्रामीण पाणी पुरवठा विभागांमार्फत योजना हस्तांतरणांची प्रक्रिया पूर्ण करून ग्रामस्थांना अधिकृत हस्तांतरण दस्ताऐवज सुपूर्द करण्यात आले. कार्यक्रमांस गट विकास अधिकारी शर्मिला पाटील, विस्तार अधिकारी हेमलता वाडेकर, जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनचे सल्लागार आनंद धिवर, सुनील माळी, नेहा थळे, अदिती मगर, स्मिता पाटील, उपअभियंता निहाल चवरकर व ग्रामपंचायत अधिकारी, बीआरसी गट संसाधन केंद्र पाणी व स्वच्छता विभाग, शिक्षक, अंगणवाडी सेविका, आशा सेविका, ग्रामस्थ व विदयार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. जल अर्पण दिवसाच्या निमित्ताने जलसंवर्धन ,शाश्वत पाणी व्यवस्थापन व सामूहिक जबाबदारीचा संदेश प्रभावीपणे पोहोचल्याचे चित्र या उपक्रमातून दिसून आले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१–२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग–email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग– email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए–५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२–२२८८४५३८.
■ संस्थापक–संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)